TIGHT BINDING BOOK

TIGHT BINDING BOOK

UNIVERSAL LIBRARY
OU_192333
UNIVERSAL LIBRARY

प्रकाशमंडळ पुस्तक ५ व

# विवाहितांचें नंदनवन

लेखक
राजरत्न वा. वि. जोशी
बी.ए., एल्एल्.बी.
बडोदें

२० ऑक्टोबर
१९३८

किंमत
एक रुपाया

प्रकाशक :
दयार्णव रघुनाथ कोपर्डेकर
प्रकाशमण्डळ
५२९ सदाशिव, पुणें २

मुद्रक :
लक्ष्मण नारायण चापेकर
आर्यसंस्कृति मुद्रणालय
१९८(१७), सदाशिव
टिळक रस्ता, पुणें २

# विवाहितांचें नंदनवन

# समर्पण

एका संसारकुशलेस

वा. वि. जोशी

# प्रस्तावना

—(x)—

पांढरपेशा समाजांतील कुटुंबें आर्थिक ओढाताणीमुळें जितकीं रंजीस आलीं आहेत, तितकींच तीं कौटुंबिक असंतोषामुळें जिकिरीस आलीं आहेत. ज्या संसारसुखाच्या आशेवर भिस्त ठेवून मनुष्यमात्र सर्व ऐहिक आपत्ति निमूटपणें सहन करीत असतो त्या संसारसुखाच्या बाबतींतच हटकून त्याची सरसहा निराशा व्हावी असा प्रकार दिवसेंदिवस होत आहे खरा. संसारसुखाचा पाया आणि आरंभ म्हणजे वैवाहिक जीवन होय. पण तें वैवाहिक जीवनहि असावें तितकें समाधानी दिसून येत नाहीं. या वैवाहिक असंतोषाची झळ कुटुंबांतील इतर अनेक जिव्हाळ्याच्या नात्यांगोत्यांना करपवीत आहे, सामाजिक जबाबदाऱ्यांना वठवीत आहे आणि कौटुंबिक सुखाची व पर्यायानें सामाजिक स्वास्थ्याची राखरांगोळी करीत आहे. स्त्री-पुरुषांच्या लग्नाची वयोमर्यादा आपण वाढविली, त्यांच्या आकांक्षा वाढविल्या, स्वभावाचा कणखरपणा वाढविला आणि त्यांचें स्वभावमीलन होण्याचें महत्कार्य दुरापास्त करून निराशाहि तितक्याच परीनें वाढवल्या, नवीन निर्माणहि केल्या. नुसतीं वयें वाढलीं म्हणून त्यांच्या अंगीं संसार करण्याची पात्रता थोडीच येणार आहे! त्यांचें पुस्तकी ज्ञान वाढलें म्हणून त्यांना संसारशास्त्र अवगत झालें असें थोडेंच!

मानवी जीवनाच्या उत्कर्षाला आवश्यक असणाऱ्या इतर सर्व शास्त्रांप्रमाणें संसारशास्त्र हेंहि तितकेंच जरूरीचें आणि महत्त्वाचें शास्त्र होय. या संसारशास्त्रांत मनोविश्लेषणशास्त्र, मानसशास्त्र, आरोग्यशास्त्र, कामशास्त्र, सुप्रजाजननशास्त्र, शरीरशास्त्र, अर्थशास्त्र, नीतिशास्त्र, धर्मशास्त्र व शिक्षणशास्त्र या सर्व शास्त्रांच्या मूलभूत सिद्धान्तांचा समावेश तर झालेला असतोच याशिवाय त्यांचा प्रत्यक्ष आचारांत उपयोग कसा करावा हें सांगितलेलें असतें. म्हणून असें म्हणतां येईल कीं, या निरनिराळ्या शास्त्रांच्या नियमांची साकल्यानें आणि हेतुपुरस्सर प्रत्यक्ष व्यवहारांत उपपत्ति लावणारें जर कोणतें शास्त्र असेल

तर तें एकटें संसारशास्त्रच होय. दुसऱ्या कोणत्याहि शास्त्रांत नुसत्या घोकंपट्टीनें प्रावीण्य मिळवितां येतें. पण मिळवलेलें ज्ञान समर्पक रीतीनें अनुभवांत कसें उतरवावें याचा उहापोह करणाऱ्या संसारशास्त्रांत प्रावीण्य मिळविणें अत्यंत कठीण असतें. मोठमोठ्या शास्त्रीपंडितांचें, जगजेत्या सर्व सत्ताधाऱ्यांचें, राजकारणपटु धुरंधरांचें, समाजशास्त्रज्ञांचें, समाजसुधारकांचें किंवा महात्म्यांचें वैवाहिक जीवन विफल अगर कष्टमय झालेलें अनेक दाखल्यांनीं दाखवितां येईल, इतकें तें अवघड शास्त्र होय. संसारशास्त्र म्हणून कांहीं एक शास्त्र आहे आणि संसारांत पडूं इच्छिणाऱ्या व्यक्तींनीं तें पढलें पाहिजे, ही कल्पनाच आम्हांला सुचत नाहीं आणि पटतहि नाहीं. पूर्वीच्या काळीं एकत्र कुटुंबांत वाढणाऱ्या तरुण मंडळींना अनुकरणानें, उपदेशानें किंवा कौटुंबिक शिस्तीनें तें सर्व शास्त्र आपोआप अवगत होत असे. आज मोठालीं कुटुंबें मोडलीं. छोट्या कुटुंबांत शिस्तीची परंपरा राहिली नाहीं. अशा त्या कुटुंबांतहि जी काय शिस्त असेल तिचा फायदाहि शिक्षणासाठीं लहानपणापासून वसतिगृहांत जाऊन राहणाऱ्या तरुण मंडळींना लाभत नाहीं. समवयस्कांचे अफाट विचार हेच तरुण मंडळींचे आदर्श ठरतात, त्यांची बेछूट वागणूक हाच यांचा आचार होतो, त्यांची बेगुमान सुखलालसा हीच यांचा संयम ठरतो. यामुळें परिणाम असा झाला आहे कीं, तरुण मंडळी विवाहाकडे कौटुंबिक दृष्टीनें पाहीनाशीं झाली आहे आणि केवळ सुखाची अशी जी अपेक्षा ते बाळगतात ती पुरी होणें वा फार वेळ टिकणें शक्य नसल्यानें त्यांची कडेलोट निराशा होत आहे. दुसऱ्याशीं मिळतें घेण्यासाठीं स्वार्थत्याग करण्यास कुणीच तयार नाहीं, दुसऱ्यांच्या भावनांची जोपासना करण्याची कोणाला जरुरीच भासत नाहीं, अनुकूल प्रसंगासाठीं थांबण्याचा संयम संभाळतां येत नाहीं, आपल्या सुखेच्छा पुऱ्या करतांनाहि दुसऱ्याबद्दल माणुसकी ठेवण्याची आवश्यकता वाटत नाहीं, अशा या बेफाम आकांक्षांनीं फुरफुरलेलीं आपमतलबी पतिपत्नी एकमेकांच्या संगतींत सुखी कशीं होणार ! आणि किती वेळ राहणार ! कांहींच्यांत बेगुमान स्वार्थाचा थयथयाट दिसेल तर दुसऱ्या कांहीं मंडळींत वैवाहिक जीवनांतील राजरोस अपेक्षांबद्दल अज्ञान आणि भीति असलेली दिसेल. तीहि मंडळी तितकीच या सुखाला आंचवतात.

वैवाहिक जीवनाकडे संसारसुखाच्या दृष्टिकोनांतून पाहतांना जे काय विचार सुचले ते पुढील लेखांत एकत्र केलेले आहेत. हे लेख विवाहित स्त्रीपुरुषांच्या प्रश्नांचा उहापोह करणारे आहेत व ते प्रश्नहि पण आज प्रचलित असलेलेच होत. सामाजिक प्रश्न समाजाबरोबर सारखे पालटत असतात. तेव्हां ह्यांतील प्रमेयें त्रिकालाबाधित सत्यें होणें शक्य नाहीं हें लेखक स्वतः कबूल करीत असतांना तशीं तीं आहेत अगर तीं असलीं पाहिजेत अगर तशीं असतील तेवढींच लिहिलीं पाहिजेत, असा वेडा हट्ट वाचक अगर टीकाकार धरणार नाहींत अशी आशा आहे. निरनिराळ्या प्रश्नांची चर्चा करतांना जे मुद्दे मांडले त्या मुद्यांनींच तो प्रश्न निःशेष चर्चिला गेला आहे, असें मानणेंहि योग्य होणार नाहीं; उलट जे दरेक व्यक्तीला सुचतील, आढळतील आणि पटतील, असे ढोबळ आणि उथळ नित्य प्रचारांतले मुद्दे मुद्दाम वगळून सहसा ज्यांच्याकडे कुणाचें लक्ष जात नाहीं असेच लहानमोठे मुद्दे ह्यांत चर्चिलेले आहेत. कांहीं मुद्दे स्पष्ट मांडले असतील तर कांहीं नुसते सूचित केले असतील, तर कित्येक ठिकाणीं उघड आणि ढोबळ मुद्द्यांच्या कांठापर्यंत वाचकांना आणून मधेंच सोडलें असेल. आंवळा सर्व बाजूंनीं चोंचावला म्हणजे त्यांत जेवढा जास्त पाक शिरतो तेवढा तो आंवळ्याच्या फोडी करून टाकल्यानें शिरत नाहीं. दरेक प्रश्नाला निरनिराळ्या मुद्द्यांच्या चोंचावणीनें यथेच्छ आणि बऱ्याच वेळेला त्याच त्याच ठिकाणीं चोंचे मारल्यासारखेंहि दिसेल. विचाराला चालना मिळावी, रोजच्या प्रश्नांकडे निराळ्या दृष्टिबिंदूनें पाहण्याची इच्छा व्हावी, रुक्ष अशा जीवनांत ज्याच्या त्याच्या ऐपतीप्रमाणें व इच्छेप्रमाणें ज्याला त्याला स्वर्गीय आनंदाचा पाक ओततां यावा या उद्देशानें घरसोडीचें केलेलें हें अपुरें विवेचन क्षम्य ठरेल. समाजशास्त्रावर ग्रंथ लिहिण्याची माझी इच्छा नाहीं व अशा ग्रंथांचा उपयोगहि होत नाहीं, ही जाणीव सतत ठेवून दरेक प्रश्न अगदीं नवीनपणें, अलग आणि कोणत्या तरी दाखल्यांत अगर रूपकांत सांगण्याचा मुद्दाम प्रयत्न केला आहे. अधिक प्रतिभासंपन्न अधिकारी-लेखणीनें हा विषय चोखाळण्यासारखा आहे.

स्त्रीपुरुषांच्या लग्नांचे वयपरत्वें निरनिराळे कोणते विवाहप्रकार संभवतात यांचें वर्णन करणाऱ्या 'चौरंगी लग्नांचे अनेकविध ढंग' या लेखांत,

त्या दरेक विवाहप्रकारांत स्त्रीपुरुषांच्या ठिकाणीं ज्या निरनिराळ्या मनोभूमिका तयार होतात त्यांचें मनोविश्लेषणात्मक पृथःकरण केलेलें आढळेल. पतिपत्नींची लग्नानंतरची पहिली निर्धास्त भेट कशी घडवून आणावी हें **'मधुचंद्र'** सांगेल, तर त्या पहिल्या भेटीच्या प्रसंगीं उभयतांनीं स्वभावाचा कायमचा मिलाफ घडवून आणण्यासाठीं काय काय उपाय योजावेत याची माहिती **'सुखाचा संधिकाल'**ांत मिळेल. **'वैवाहिक जीवनाचा जिवंत झरा'** ह्यात नैसर्गिक आकांक्षांची जोपासनाहि करणें किती उचित आहे हें कळेल, तर **'वैवाहिक सुखाचें अधिष्ठान'** यांत त्या अपेक्षा पुऱ्या करण्याचीं मुख्य अंगें उपांगें वर्णन केलेलीं आढळतील. मनाच्या गाफीलपणाच्या भावनेनें कित्येकदां मन बेहोष होऊन बरळूं लागतें. या मनःस्थितीचा आणि याच्या इष्टानिष्टतेचा विचार **'पतिपत्नींतील रहस्य-कथन खुल्या दिलानें व्हावें कीं होऊं नये'** या प्रकरणांत केलेला आहे. पुरुषांचें अथाङ्ग, गंभीर आणि पराकाष्ठेचें सहनशील मनहि कोणत्या आघातांनीं विकल होतें याची ओळख **'हिमालयाचे हुंदके'** करून देईल. उभयतां पतिपत्नींच्या प्रेमाचें फळ व कुटुंबाच्या उत्कर्षाचें साधन म्हणजे संतति, त्या संततीबद्दलच्या सर्व व्यावहारिक कल्पना **'वंशवेलीचीं फळें'** या लेखांत मांडलेल्या आढळतील. आणि समाजरचनेला शोभा, स्थैर्य आणि सोज्वळपणा आणणाऱ्या लग्नसंस्थेचें महत्त्व **'समाजरचनेंतील सुवर्णमंदिर'** या लेखांत आढळेल.

अविवाहितांची विवाहसंस्थेकडे पाहण्याची दृष्टि कोणती असते व असावी यांचा उहापोह करणारे लेख असेच स्वतंत्र पुस्तकरूपानें छापण्याचा विचार आहे.

प्रकाशन, प्रेस व प्रसिद्धी ह्या सर्व जिकिरीच्या मार्गावरून ह्या पुस्तकास कूचकदम सपाट्यानें घेऊन गेल्याबद्दल माझे आप्त श्री. अनंत हरि लिमये, एम्. ए., यांचे आभार मानणें जरूर आहे.

बडोदें, ३-१०-३८
विजयादशमी

वा. वि. जोशी

# — वाचकांस —

प्रकाशमंडळाचें हें प्रकाशन आज दीपावलीच्या मंगलप्रसंगीं महाराष्ट्र-वाचकांस सादर करण्यांत आम्हांस आनंद होत आहे. मंडळाचें हें पांचवें प्रकाशन असून गेल्या चार प्रकाशनांस वाचकवर्गानें जी सक्रिय सहानुभूति दाखविली तिच्याच जोरावर आम्हांस हें पुस्तक प्रकाशित करतां आलें. सुदैवानें मंडळाला लेखकहि चांगल्या प्रतीचे मिळाले. **विवाहितांचें नंदनवन** या पुस्तकाचे लेखक राजरत्न वा. वि. जोशी यांच्या प्रभावी लेखणींतून आजपर्यंत स्त्रियांसंबंधींचे अनेक प्रश्न चार्चिले गेले. परंतु समाजाचा पाया जो विवाहपद्धति तिचें साकल्यानें विवरण करून तरुण पिढीला त्यांनीं या पुस्तकांत नंदनवनाचा मार्ग दाखविला आहे. या मार्गांतील 'रस्ते' साफसूफ करण्याचें कार्यच काय तें आमच्याकडे आहे. आणि तें कितपत यशस्वी झालेलें आहे हें या मार्गावर प्रवास करणाऱ्या लोकांनींच ठरवावयाचें आहे. श्री. जोशी यांनीं आम्हांस सदरहू पुस्तक दिल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहों. त्यांचीं आणखीहि कांहीं पुस्तकें मिळविण्याची आमची मनीषा आहे. लेखकाबरोबरच मुखपृष्ठावरील चित्र काढणारे चित्रकार श्री. सी. गं. जोशी यांनीं पुस्तकाचें बाह्यांग सजविल्याबद्दल त्यांचे आम्ही आभारी आहों. मंडळावर लोभ ठेवणाऱ्या परंतु प्रसिद्धिपराङ्मुख असलेल्या आमच्या असंख्य चाहात्यांचे आभार मानणें हेंहि आमचें कर्तव्य आहे. मंडळाचें यापुढील प्रकाशन 'फॅसिझम' हें असून तें श्री. मानवेंद्रनाथ रॉय यांच्यासारख्या विचारवंताच्या लेखणींतून उतरलेलें आहे. त्याचा मराठी अनुवाद **जीवनाचा पाया** या आमच्या प्रकाशनाचे लेखक श्री. बा. कृ. गलगली यांनीं केलेला आहे. मंडळाच्या आगामी प्रकाशनांवरहि महाराष्ट्रवाचक लोभ दाखवितील अशी आम्हांस आशा आहे.

द. र. कोपर्डेकर

# अनुक्रमणिका


| प्रकरण | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | चौरंगी लग्नांचे अनेकविध ढंग | १३ |
| २ | मधुचंद्र | २६ |
| ३ | सुखाचा संधिकाल | ३३ |
| ४ | वैवाहिक जीवनांतील जिवंत झरा | ४६ |
| ५ | वैवाहिक सुखाचें अधिष्ठान | ५४ |
| ६ | पतिपत्नींतील रहस्यकथन खुल्या दिलानें व्हावें कीं होऊं नये ! | ६७ |
| ७ | हिमालयाचे हुंदके ! | ७२ |
| ८ | वंशवेलीचीं फळें | ७९ |
| ९ | समाजरचनेंतील सुवर्णमंदिर | ८८ |

# विवाहितांचें नंदनवन

## १

## चौरंगी लग्नांचे अनेकविध ढंग

नवराबायकोच्या वयांतील अंतर आणि त्या उभयतांचीं लग्नाच्या वेळचीं वयें अशा दोन प्रकारांनीं एकंदर विवाहाचे जे चार निरनिराळे नमुने तयार होतात ते बालविवाह, प्रौढविवाह, वृद्ध-कुमारीविवाह आणि वृद्धा-कुमार-विवाह हे होत. ह्यांशिवाय लौकिकदृष्टीनें प्रथमविवाह आणि पुनर्विवाह असाहि एक भेद निर्माण झाला आहे; म्हणजे एकंदर विवाहाचे सहा निरनिराळे प्रकार झाले आहेत. पण तेवढ्याच संख्येवर भागत नाहीं. बालविवाह, प्रौढविवाह, वृद्ध-कुमारीविवाह, वृद्धा-कुमारविवाह हेहि प्रथमविवाह अगर पुनर्विवाह असूं शकतील आणि तसें पाहिलेंच तर विवाहाचे आठ नमुने आपणांला दिसतील. विवाह जमून येण्याच्या प्रकारांवरून जुन्या शास्त्रकारांनीं जे गांधर्व, ब्राह्म, राक्षस, पैशाच्च वगैरे आठ प्रकार नमूद केले आहेत, त्यांच्याशीं आपणांस कांहीं कर्तव्य नाहीं. त्यांतील बऱ्याचशा विवाहपद्धति कायद्यानें आज मना केल्या असून ब्राह्माशिवायची दुसरी कोणतीच पद्धत कायदेशीर गणली जात नाहीं. गांधर्वविवाह आणि प्रेमविवाह हाहि खरोखरीचा कायदेशीर विवाह होण्यापूर्वी रजिस्टर पद्धतीनें वा मंगळाष्टकी पद्धतीनेंच उरकून घ्यावा लागतो. अतएव लग्न-

विधीच्या प्रकारांवरून जे निरनिराळे विवाहप्रकार पूर्वी समजले जात असत, त्यांचा येथें ऊहापोह केलेला आढळणार नाहीं.

वधूवरांच्या वयोमानाप्रमाणें आणि वयांतील अंतराच्या मानानें जे निरनिराळे प्रकार होऊं शकतात ते असे— **बालविवाह,** कीं ज्यांत पतिपत्नींचें लग्न दोघांच्याहि अगदीं लहानपणीं झालेलें असतें. या बालविवाहांत पतिपत्नी समसमान असूं शकतील अगर एक दुसऱ्याच्या मानानें कांहीं थोडीं वर्षे लहान अगर मोठें असूं शकेल. **प्रौढविवाहांत** उभयतांचें लग्न मोठ्या वयांत, म्हणजे उभयतांना चांगलें समजूं लागल्यावर, झालेलें असतें. अशा पतिपत्नींत वयाचें अंतर कमीजास्त असेल अगर मुळींच नसेल; परंतु उभयतांच्या वयांतील अंतर इतक्या तऱ्हेचें असूं नये कीं ज्यामुळें त्यांचा जोडा केवळ वयाच्या दृष्टीनें विजोड ठरेल. नाहीं तर हा प्रौढविवाह, जरठ-कुमारीविवाह अगर वृद्धा-कुमारविवाह ह्यांच्या सदरांत जाऊन पडेल. **जरठ-कुमारीविवाहांत** पुरुष मोठ्या वयाचा असून, त्याच्या मानानें वधू बऱ्याच लहान वयाची असते. साधारणतः हें अंतर पंधरा वर्षांपेक्षां जास्त असेल तर तो जरठ-कुमारीविवाह म्हणतां येईल. **वृद्धा-कुमारविवाहांत** पत्नी वृद्ध असून तिच्या मानानें नवरा हा अल्पवयी असतो. या चार प्रकारच्या शक्य लग्नापैकीं वृद्धा-कुमारविवाह पांढरपेशा जातींत फारसा रूढ नाहीं; पण मागासलेल्या जातींत असे विवाह आढळून येतात. स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य जों जों जास्त लाभेल आणि नवऱ्याची मिळकत जों जों अधिकाधिक स्वतंत्र हक्कानें त्याच्या मालकीची होत जाईल, तसतशीं वृद्धा-कुमारलग्नें अधिकाधिक होऊं लागतील. या चार निरनिराळ्या लग्नांच्या नमुन्यांत उभयतां पतिपत्नींच्या चार निरनिराळ्या मनोभूमिका मूलतः सज्ज असतात. त्यांतून अनेकविध निरनिराळ्या मनोगंडांच्या फांद्या फुटत असतात, कीं ज्यांच्या सावलींत वैवाहिक सुख कधीं फोंफावतें तर कधीं खुरटतें. त्या निरनिराळ्या मनोभूमिकांची पाहणी केली तर पतिपत्नींच्या वयांत अंतर किती व कुणाकडे झुकतें असावें, लग्नास योग्य वय कोणतें, निरनिराळ्या प्रकारच्या लग्नांत विशेष लक्षांत ठेवण्यासारख्या आणि टाळण्यासारख्या गोष्टी कोणत्या, या प्रश्नांचीं उत्तरें देण्यापुरती सामग्री अनायासें प्रत्येकाच्या हातीं येईल.

प्रथम बालविवाहाबद्दल विचार करूं. गेल्या तीसचाळीस वर्षांत एकमेव दोषैक दृष्टिकोणाच्या आधारावरून बालविवाहावर जी सर्व बाजूंनीं गोलंदाजी होत आहे, तिच्यापुढें त्यांतील फायदे पार लोपून गेले आहेत; आणि असेंहि वाटतें कीं आपले बालविवाहित वाडवडील वैवाहिक सुखालाहि पारखेच झाले होते बालविवाहांत दोघांचीं वयें अगदीं लहान, तेव्हां त्यांचे स्वभाव एकदम आणि तेहि एकत्रांतच बनत. उभयतांच्या ठिकाणीं दुसऱ्याबद्दल आदर आणि प्रेम आपोआप उत्पन्न होई. सर्व प्रकारचें वैवाहिक जीवन थोड्याफार अज्ञानांतून चुकतचांचपडत तीं हळूहळू हस्तगत करीत असत. दोघेंहि अजाण वयांत एकमेकांच्या सोबतीनें एकदमच प्रवासाला निघालेलीं तेव्हां उभयतांत मनमोकळेपणा आपोआपच उत्पन्न होई. एकमेकांचीं मनेंहि स्वच्छ आणि संपूर्ण आसक्त. धंद्याच्या गरिबीच्या सुरवातीपासून एकत्र काम करणारे भागीदार ज्या सलोख्यानें विश्वासाची देवघेव करतील, एकमेकांवर अवलंबून राहतील, ज्या सहानुभूतीनें दुसऱ्याचे अपराध पोटांत घालतील, ज्या विनयानें स्वतःचे अपराध कबूल करतील, ज्या एकाग्रतेनें धंद्याचा एकमेव उत्कर्ष साधण्यासाठीं झटतील त्याच एकजीव भावनेनें, भक्तीनें, आदरानें, सहानुभूतीनें, विनयानें, बालविवाहित जोडपीं थेटपर्यंत संसाराचें गाडें उत्साहानें आणि आनंदानें वाहून नेत होतीं. नवऱ्याच्या अपमृत्यूनें स्त्रियांना येणारें वैधव्य, पुनर्विवाहाच्या बंदीमुळें होणारी त्यांची कुंचबणा आणि निःसत्त्व संततीची पैदास, या आपत्ति जर बालविवाहांतून उत्पन्न झाल्या नसत्या, तर आजहि बालविवाह हा एक आदर्श लग्नाचा नमुना ठरला असता; सरसहा रूढ असता ! आजहि या आपत्ति जर टाळतां आल्या तर बालविवाह हाच निःसंशय आदरणीय ठरेल.

उभयतांचे स्वभाव बनत असतांना तीं एकमेकांजवळ येतात, काळजीच्या भट्टींत त्यांचा एकत्र रस होऊन मिसळेपर्यंत तीं एकत्र तापलीं जातात, आपत्तींच्या घणांनीं ठोकठोकून त्यांचा इतका बेमालूम एकजीव होतो, कीं उभयतांच्या स्वभावांत दुजाभावच शिल्लक राहात नाहीं. पतिपत्नींतील सलोखा आणि समरसता यांचा परिपोष साधलेला बालविवाहांत जेवढा उत्कटतेनें आढळून येईल तेवढा कोणत्याहि प्रकारांत आढळून येणार नाहीं.

पत्नीला पतीच्या कर्तबगारीबद्दल आणि पतीला पत्नीच्या कष्टाळू साहाय्याबद्दल इतका अमर्याद आदर असतो, कीं त्यांच्यांत बेबनावच काय पण साधासुधा मतभेदहि डोकावूं शकत नाहीं. आणि उघडच आहे! दोघांचें मिळूनच एक मन प्रथमपासून बनत गेलेलें, त्या मनाला मतें फुटलीं तरी तीं एकाच जातीचीं आणि एकमेकांवर अवलंबूनच असलेलीं असावयाचीं. तेव्हां मतभेद जन्मालाच कसा येणार! उभयतांची शारीरिक व मानसिक वाढ होत असतांना परस्परांनीं पाहिलेली असते आणि त्या वाढींत एकमेकांनीं दुसऱ्यास मदत केलेली असते. उभयतांच्या निरनिराळ्या क्षेत्रांतहि दोघांचें समसमान साहाय्य—निदानपक्षीं उत्तेजन—असतें. उभयतांना दुसऱ्याच्या उत्कर्षाबद्दल अमोघ अभिमान आणि कौतुक वाटत असतें आणि हीं सर्व वैवाहिक सुखी जीवनाचीं लक्षणें बालविवाहाच्या छायेंत उभयतांना आपसुख लाभतात. पुरुष हा बाहेरच्या जीवनकलहाची सर्व जबाबदारी स्वतःच्या शिरावर घेई; त्याची पत्नी फार झालें तर उत्तेजन देई अगर त्यानें विचारल्यास तिच्या कल्पनेप्रमाणें सल्ला देई. त्याच्या उलट, पत्नी ही घरांतील आंतरव्यवस्थेची पूर्ण मालक असे; ती इतकी, कीं पुरुषालाहि तिच्या शिस्तीप्रमाणें वागावें लागे. दोघांचा सांस्कृतिक दर्जा एक, स्वभाववैशिष्ट्य दुजें नाहीं; तेव्हां कांहीं गोष्टींत दुसऱ्यास आज्ञा करण्याची आणि कांहीं गोष्टींत दुसऱ्यानें केलेल्या आज्ञा पाळण्याची देवाण-घेवाणप्रवृत्ति त्यांच्यांत आपोआप उत्पन्न होई आणि तीं उभयतां आनंदानें संसार करीत. आनंदानें याचा अर्थ असा नव्हे, कीं त्यांच्यावर सांसारिक आपत्ति वा दैवाधीन विपत्ति कोसळत नव्हत्या. उभयतांतील सलोखा हाच वैवाहिक जीवनाचा आनंद आणि आधार, हा बालविवाहांत ऐनजिनसी उभयतांच्या हातीं लाधत असे.

**प्रौढविवाहांत** उभयतां वधूवर हीं मोठ्या वयाचीं आणि जाणतीं असतात. पांढरपेशा समाजांत प्रौढविवाह हे सरसहा रूढ होत आहेत खरे, परंतु वधूवरांच्या वयांतील अंतर मात्र दिवसेंदिवस तितकेंच एकसारखें वाढत आहे. मुलीचें वय लग्नाच्या वेळीं सरासरी विशीच्या आंतबाहेर असतें. मात्र वराचें वय तिशीच्या आसपास अगर तिशी ओलांडून गेलेलें अधिकाधिक उदाहरणांत आढळून येऊं लागलें आहे. वधूवरांतील अंतर

हें कमींत कमी दोन वर्षें आणि जास्तींत जास्त सात वर्षें असावें, हा जुन्या काळचा नियम स्वभावांतील समरसता साधण्याच्या दृष्टीनें सर्वथैव उचित होता असेंच म्हणावें लागेल. आज तरुणाला नोकरीचाकरी मिळण्यास आणि स्थिरस्थावर होण्यास तिशी तरी गांठावी लागते आणि तोंवर तो लग्न करण्यास तयारच होत नाहीं. मुलीचें लग्नाचें वय थोड्याफार हौसेनें व नंतर लग्न न जमण्याच्या अडचणीनें वाढतें, तर मुलाचें लग्नाचें वय आर्थिक अडचणींमुळें वाढत आहे. आजकाल होणाऱ्या लग्नांत हें वयाचें अंतर पांच वर्षांपेक्षां जास्त आणि पंधरा वर्षांच्या आंत दिसून येऊं लागलें आहे. वास्तविक सात वर्षांपेक्षां जास्त अंतर असलेला जोडा विजोडच होय आणि असेच विजोड जोड दिवसेंदिवस अधिकाधिक दिसून येऊं लागले आहेत. दोघांचे आचारविचार ओतलेल्या धातूप्रमाणें कायमचे आणि कणखर बनलेले! पोरकट उंच उडणाऱ्या आकांक्षांचीं पंखें परिस्थितीनें कापल्यामुळें, निराशेनें त्या लुल्यापांगळ्या होऊन जमिनीसरशी फरफटत चालणाऱ्या! अशा स्थितींत एकत्र येणारें जोडपें मनानें, ध्येयानें आणि शरीरानें कितपत समरस होऊं शकेल! आजचा प्रौढ वर मनानें व शरीरानें लग्नाच्या वेळीं खरोखर तितका तरुणहि राहिलेला नसतो. तारुण्याच्या मोसमाचाहि काल कांहीं ठराविक असतो. त्यांत वैयक्तिक आरोग्याच्या दृष्टीनें फार झालें तर वर्षादोन वर्षांची चालढकल चालेल येवढेंच. स्त्रियांचा सोळापासून पंचविशीपर्यंतचा काल आणि पुरुषांचा विशीपासून तिशीपर्यंतचा काळ हा ऐन तारुण्याचा काळ म्हणून समजला जातो. आजची ऐन तारुण्यांतील वधू तारुण्य ओसरून गेलेल्या तरुणास माळ घालून वैषयिक निराशा मात्र पदरीं बांधून घेते एकाची भरती येण्याची ऐन वेळ तर दुसऱ्याची ओहोटी सुरू होण्याचा तोच काल, ह्यांचा मेळ तरी कसा पडायचा! अगदीं विषयसुखाच्या दृष्टीनें पाहिलें तरी त्यांच्यांत जास्त अंतर असणें हें घातुक आणि अयोग्यच. तशांत आजचा तिशीचा तरुण बिकट परिस्थितीशीं झुंजून कमजोर आणि पोखरलेला असतो हें नवीनच गंडांतर! उभयतांचे स्वभाव एकमेकांशीं जमण्याची आशा तितकीच कमी! वधूनें आपल्याकडून नवऱ्याच्या स्वभावाशीं जुळतें घेण्याची कितीहि शिकस्त केली तरी काय उपयोग!

उभयतांमधील सलोखा हा आपापसांत होणाऱ्या देवघेवीनें साधावयाचा असतो. आजच्या अतिप्रौढ तरुणांचा स्वभाव अशा कायमच्या ओतीव सांच्यांतून निघालेला असतो, कीं पत्नीसाठीं म्हणून तो बदलणें त्याला शक्य नसतें, तसा बदलण्यास तो तयार नसतो.

प्रौढविवाहांत वधूवरांचें वय जेवढें मोठें, तेवढी त्यांच्यावरची जबाबदारी मोठी. ती जबाबदारी उभयतांच्या स्वभावाची अगोदर पारख करण्याची, त्या स्वभावांशीं जुळतें घेण्याचा निश्चय करण्याची आणि त्याप्रमाणें वागण्याची. वधूचें काय अगर वराचें काय, लग्नाचें वय जों जों वाढूं लागतें तों तों लग्नाबद्दलची त्यांची कासावीस जास्त जास्त होऊं लागते. सौंगड्याबद्दलच्या मनांत आंखलेल्या आकांक्षा, प्रपंचाबद्दलच्या ठरविलेल्या कल्पना, सांपत्तिक प्रतिष्ठेबद्दलच्या धरलेल्या आशा ह्या एका पाठीमागून एक गरजवंताच्या वेडेपणानें त्यांच्यापासून सारख्या गळून पडूं लागतात. त्या सर्व आशा, आकांक्षा, कल्पना कायमच्या जर गळून पडल्या असत्या तर गोष्ट निराळी! पण विवाहसुख हस्तगत होतांच त्या सर्व इट्टानें एकदम सामोऱ्या उभ्या राहतात आणि फसलेल्या व्यक्तीस असा जाब विचारतात, कीं 'ह्या लग्नापासून तूं काय मिळविलंस? त्याऐवजीं लग्न न करतां तसंच राहण्यांत काय दुःख होतं?'

याच क्षणापासून त्यांच्यांत असंतोष उत्पन्न होतो. दुसऱ्या व्यक्तीनें आपल्या ह्या सर्व आकांक्षा पुऱ्या केल्याच पाहिजेत अशी आकांक्षा उत्पन्न होते. अर्थात् ती अशक्य अपेक्षा दुसऱ्याकडून पुरी न झाल्यानें त्या व्यक्तीचा राग व नंतर तिटकारा येतो. संसारसुखाला ती मंडळी हात धरून घराबाहेर कायमचे हाकलून देतात. शिकलेलीं माणसें हीं तरी विचारी असावींत म्हणावें, तर अनुभव मात्र उलट! लग्नाच्या बाबतींत शिकलेलीं माणसेंच अशा बेफाम घाईनें आणि बेगुमान उतावळीनें लग्नें जमवून टाकतात, कीं सोडत खेळणारांनाहि तीं लाजवितील! मुद्दाम पुढेंपुढें ढकलीत नेलेल्या संसारसुखाला, मैत्रीला, हस्तगत करण्यासाठीं व्याकुळ झालेले जीव जास्तजास्तच हपापतात, अगदीं पतंगाच्या घातुक धडाडीनें लग्नसोहळ्यांत उडी घेतात; पण हा सर्व पोरखेळ त्यांच्या जिवाचा खेळखंडोबा केल्याशिवाय राहात नाहीं. तेव्हां उभयतांनीं दुसऱ्याचे स्वभाव

पारखावेत, आपल्या आकांक्षा दुसऱ्याच्या आशांशीं ताडाव्यात, आपल्या कल्पना दुसऱ्याच्या ध्येयाच्या कसावर घासून पाहाव्यात आणि अनुकूलता दिसत असेल तरच लग्नाला तयार व्हावें. दुःखी गृहस्थाश्रमापेक्षां एकलकोंडें अविवाहित जीवन बरें !

प्रत्यक्ष प्रीतिविवाह नसला तरी प्रौढ वधूवरांनीं आपापल्या आकांक्षा दुसऱ्यांशीं स्पष्ट बोलून दाखवाव्यात. त्यांच्या आवडीनिवडी एकमेकांशीं स्पष्ट जाहीर झालेल्या बऱ्या. सांपत्तिक स्थितीहि खरीखुरी एकमेकांस सांगितलेली उत्तम. उभयतां वधूवर शिकलेलीं असलीं आणि कमावतीं असलीं तर उभयतांच्या पैशाचा संसाराकडे विनियोग कसा करायचा ह्याहि बाबतींत स्पष्ट चर्चा व ठराव होणें जरूर असतें. घरसंसार चालविण्याची जबाबदारी पुरुषावर असते तर खरीच, पण शिकलेल्या आणि कमावत्या स्त्रीशीं लग्न करून तिचा जादा खर्च स्वतःच्या कमाईतून चालविणें नवऱ्याला कठीणच वाटतें, जडच जातें. कमावत्या स्त्रीनें आपली कमाई संसाराकडे खर्च करतांना आपण नवऱ्यावर कांहीं उपकार करीत आहोंत अशी भावना ठेवूं नये. स्त्रिया कमावत्या झाल्या, कीं त्या मानानें त्या हट्टीहि होतातच; किंबहुना त्या आपलें म्हणणें हट्टानें तडीस नेऊं शकतात.

कमावत्या स्त्रीला स्वतःची कमाई ही अगदीं स्वतंत्र ठेवण्याची अनिवार इच्छा असते, तर पुरुषाला संसारखर्चांत पत्नीकडून जास्त रक्कम मिळवण्याची इच्छा असते. उभयतांच्या गरीब नातेवाईक मंडळींना मदत अगर मनमुराद देणग्या देण्याच्या वेळीं भांडणें जुंपल्याशिवाय राहात नाहींत. आपापली स्वतंत्र मिळकत सांठवून स्वतःची श्रीमंती वाढविण्याकडे दोघांचीहि सारखीच वृत्ति असली म्हणजे त्यांच्यांत बेबनाव धुमाकूळ घालूं लागतो. दुसऱ्याच्या स्वभावावर नियंत्रण घालण्याची जों जों एकमेक युक्ति योजूं लागतात, तों तों त्यांच्यांतील विश्वासाचा सलोखा नाहींसा होतो. दोन कमावते पण एकत्र राहणारे भाऊ जसे जिकिरीनें मुद्दाम हालांत दिवस काढतात, तसा कांहींसा प्रकार नवराबायको दोघेंहि कमावतीं असलीं म्हणजे दिसून येतो. उभयतांनीं संपत्तीबद्दलच काय, पण संततीबद्दलहि थोडीफार आगाऊ चर्चा करणें जरूर असतें. पुरुषाला संततीच्या जोपास-

नेचा खर्च दिसत असतो; स्त्रीला संततीची वाढ आणि हौस दिसत असते. म्हणून बेबनाव उत्पन्न होऊं नये यासाठीं संततीबद्दलहि चर्चा होणें जरूर असतें. वडील मंडळींचे ऋणानुबंध आणि त्या प्रमाणांत त्यांना दाखवावा लागणारा आज्ञाधारकपणा याहि तितक्याच जिकिरीच्या बाबती आहेत. त्यांची स्पष्ट कल्पना वधूस करून देणें हें वराचें कर्तव्य होय.

उभयतां वधूवरांत वयाचें अंतर असेल त्या मानानें त्यांच्या निरनिराळ्या मनोभूमिका उत्पन्न होत असतात. उभयतांचें वय आणि शिक्षण समसमान अगर थोडया अंतरानें मागेंपुढें असेल तर उभयतां अगदीं मित्रांच्या सलोख्यानें आणि मनमोकळेपणानें वागतील. त्यांचा सांस्कृतिक दर्जा एकाच पातळींत वावरणारा आणि वयहि एकाच पंचकडींत डोकावणारें असेल तर त्यांच्या मनाचा मिलाफ तडाखेबंद होईल. सांस्कृतिक दर्जा निरनिराळा असेल पण वय जर जवळ जवळ असेल तरी त्यांच्या मनाचा मिलाफ होण्याला फारसा अवधि लागत नाहीं, अडचण पडत नाहीं. घरांत आणि घराबाहेर असे स्त्रीपुरुषांनीं आपापल्या कार्यांचे निरनिराळे मुद्दाम भेद केले नाहींत तरी ते आपोआप निर्माण होतात. घरांतल्या बाबती स्त्रीच्या हवालीं असाव्यात व पुरुषांची मदत व सहानुभूति घरबाबतींपुरती मिळवावी एवढीच तिची नवऱ्यापासूनची अपेक्षा असते. प्रापंचिक बाबतींत विद्येचा अगर सुसंस्काराचा उपयोग करण्याची वेळ कधीं येत नाहीं. व्यवहारज्ञान, कष्टाळूपणा, आज्ञाधारकपणा, एकमेकांना मदत करण्याची वृत्ति इत्यादि साध्या गुणांवर गृहप्रपंच उत्तम चालवितां येतो. व्यावहारिक दृष्टीनीं उभयतांचा संसार सुखाचा होतो. पुरुषाचीहि अपेक्षा नसते कीं स्त्रीनें घराबाहेरच्या बाबतींत त्याला मदत करावी. पुढें पुढें तो घराबाहेरच्या व्यवसायाच्या गोष्टी घरांत बोलेनासा होतो. उभयतांमधील अंतर जसजसें जास्त तसतसा उच्चनीच भाव कमीअधिक प्रमाणांत त्यांच्यांत उत्पन्न होतो. तीस वर्षांच्या पुरुषाला अठरावीस वर्षांची आपली पत्नी लहान पोरीप्रमाणेंच वाटणार आणि त्या झोकांतच तो तिच्याशीं विचारविनिमय करीत असतो. बरोबरीच्या नात्यानें त्यानें तिचा सल्ला घेण्याचा आव आणला तरीहि अनुभवाच्या अभावीं तो पोरकट असावयाचा ही जाणीव त्याला कधींहि विसरतां येत नाहीं. तो तिला नेहमीं धाकांत

आणि ताब्यांत ठेवण्यास पाहतो आणि तीहि पण आपोआप त्याच्या धाकांत राहते. वयाच्या अंतरानेंच ती अर्धीमुर्धी गांगरलेली असते. अनुभवाच्या अभावीं ती स्वतःस अप्रगल्भ समजते. वडीलपणानें पतीनेंच निर्णय द्यावा, मार्ग सांगावा आणि त्याप्रमाणें वागणें हेंच आपलें कर्तव्य, असा तिचा न्यूनगंड तिला अगदीं सनातनी पतिव्रता बनवितो. अशी ही सेव्यसेवक, उच्चनीच, श्रेष्ठकनिष्ठ मनोभूमिका उभयतांच्या मनांत उत्पन्न झाली म्हणजे ती अखेरपर्यंत टिकतेहि. ही अशी भूमिका उत्पन्न होणें संसारसुखाला अत्यंत विघातक होय. जरठ-कुमारीविवाह ज्या अनेक घातुक आक्षेपार्ह घटनांना जन्म देतो त्यांतली ही एक प्रमुख घटना होय.

जरठ-कुमारीविवाहांत सर्वसाधारण कमींत कमी अंतर इतकें असावें लागतें, कीं वधू ही वराची मुलगी शोभेल. म्हणजे सरासरी अठरा वर्षांहून अधिक अंतर वधूवरांत असेल व वर मोठा असेल, तर तें लग्न जरठ-कुमारीविवाह या सदरांतच येईल. मुलीचे वडील आणि स्वतः मुलीहि संपत्तीच्या अभिलाषेनें अशा लग्नांना संमति देतात. पुत्रप्राप्ति आणि पहिल्या बायकोच्या संततीचा संभाळ ह्यांसाठीं लग्न करणें जरूर असल्याची खोटी सबब विवाहेच्छु म्हाताऱ्यांकडून पुढें मांडण्यांत येते. लग्नाच्या बाजारांत निराश झालेल्या अतिप्रौढ कुमारिकाहि जरठ-कुमारी-विवाहाला आपण होऊन तयार होतात. लग्न ही हरेक व्यक्तीची स्वतंत्र आचाराची बाबत होय. त्यावर नियंत्रण कोणाचेंच चालूं शकणार नाहीं. परंतु ज्या संसारसुखासाठीं एवढा लग्नाचा खटाटोप करावयाचा तें तरी पदरांत पडतें कीं नाहीं याचा विचार करावयास नको का! आणि या दृष्टीनें जरठ-कुमारीविवाह सर्वथैव त्याज्यच होयं. 'बिबी आली उमरींत आणि मिया गेले कबरींत' या एका म्हणींत त्यांच्या वैषयिक आयुष्याची पूर्ण निराशा व्यक्त होते. एकाचें तारुण्य सुरू व्हावयास आणि दुसऱ्याचें म्हातार-पण सुरू व्हावयास सुरवात होणार; अशा धावपळीच्या शाळूसोबतींत विषय-सुखाचें अल्पस्वल्प माप तरी स्त्रीच्या पदरीं कसें पडणार! बरें, इतर संसार-सुखाकडे पाहावें तर तेंहि वाळूच्या घड्याळांतील वाळूप्रमाणें एकसारखें खरत जाणारें! म्हाताऱ्याची तरुण बायको वैषयिक बाबतींत सदैव भुके-लेली, सांसारिक बाबतींत सदैव घाबरलेली, अशी दुःखीकष्टीच असाव-

वयाची. म्हातारा नवरा तिला लहान मुलीप्रमाणेंच काय, पण अगदीं नातीप्रमाणें वागवितो. तो तिला जितक्या आस्थेवाईकपणानें जपतो, तितकीच ती दुर्बल आणि परावलंबी होत जाते. जितक्या तत्परतेनें तो तिच्या हौशी पुरवितो, तितक्याच झपाट्यानें तिच्या मनांत निरुत्साह उत्पन्न होऊं लागतो. जितक्या कसोशीनें आपल्या मनाचें आणि शरिराचें वाढतें दौर्बल्य तो तिच्यापासून लपवून ठेवण्याचा प्रयत्न करतो, तितक्याच शिताफीनें तीहि आपली प्रखर क्षुधा आणि वज्रलेप असंतोष त्याच्यापासून झांकून ठेवते.

त्यांचा संसार म्हणजे एक आंधळी कोशिंबीरच म्हणानात ! त्यांत थोडेंफार सुख लाभलें तर नशीब ! म्हातारा पुष्कळ वर्षें जगला तर सुवासिनीचें आयुष्य आणि ऐपतीप्रमाणें डामडौल भोगावयाला मिळतो खरा, पण तें सर्व आळवावरचें पाणी; त्यांत शाश्वती नाहीं, तेज नाहीं आणि जीवहि नाहीं. हिचें जीवनचरित्र विकास पावत असतांना म्हाताऱ्याच्या विजोड संगतीनें तें ग्रासलें जातें. म्हाताऱ्याच्या डामडौलीचा पोकळ वांसा नसला तरी त्यांत पत्नीला आत्मीय भावना कधींच वाटत नाहीं. गृहस्थाश्रमास सुरवात केल्यापासूनच्या अगदीं गरिबीच्या दिवसांत थोड्याफार अडचणीनें जिनसांचा थोडाफार संग्रह करणारीं जोडपीं त्या साध्यासुध्या जिनसांतूनहि आत्मीयतेचे आणि स्वार्थत्यागाचे निघणारे निनाद म्हातारपणापर्यंत एकसारखे ऐकत असतात. ऐश्वर्याच्या दिवसांतहि ते निनाद त्यांना तितकेच प्रिय वाटत असतात. दोघांनींहि आयुष्य पहिल्यापासून एकदम सुरू करावयाचें, त्यांत भल्याबुऱ्या अनुभवांचा सारखाच अनुभव घ्यावयाचा, कमावलेल्या वैभवांत दोघांनींहि सारख्याच मालकीच्या दृष्टीनें पाहावयाचें आणि दैवानें हिरावून घेतलेल्या मौल्यवान् घटनांकडे सारख्याच विषण्णतेनें डोळेझांक करावयाची, अशा एकजीव घडलेल्या वैवाहिक जीवनाची गोडी निराळीच ! जरठ-कुमारीविवाहांत स्त्रीला सगळेंच शिळें वाटत असतें. बाहेरचें ऐश्वर्यहि अगदीं उष्ट्या ताटांतील उष्ट्या पक्वान्नाप्रमाणें त्यांना आंतून नकोसें वाटतें. त्या ऐश्वर्यांत तिच्या स्वतःच्या कर्तबगारीचा, कमाईचा, स्वार्थत्यागाचा, आवडीनिवडीचा अगर हौसेचा असा कोणताच ऋणानुबंध तिला दिसत नाहीं. तें सर्व

ऐश्वर्य नीरस आणि परकें वाटूं लागतें. पुरुषालाहि आपण संसार करीत नसून पोरखेळ खेळत आहोंत, उपरत होत जाणारा गृहस्थाश्रम पाळीत नसून विपरीत भातुकलीचा खेळच खेळत आहोंत असें वाटतें. वयानें लहान असलेल्या बायकोशीं समरस होतां यावें म्हणून तो पोरासारखे पोरचाळे करतो, तेव्हां तर त्याच्या आचरटपणामुळें तिचा त्याच्याबद्दलचा तिटकारा वाढत जातो. वयास न शोभणाऱ्या आणि ताकतीस न झेपणाऱ्या चाळ्यांनीं पुरुष झपाट्यानें थकत जातो. या दोघांचा कोणत्याच गोष्टींत कधींच मेळ पडत नाहीं. एक विचार, एक आचार, एक आकांक्षा, या सर्वांची एक-वाक्यता होण्यासाठीं उभयतांनीं कितीहि धडपड केली तरी वयांतील अंतर त्यांना सारखें चकवीत राहतें.

वृद्धा-कुमारविवाह हा जरठ-कुमारीविवाहाइतकाच अपयशी आणि घातुक. स्त्री वयानें मोठी आणि तिच्या मानानें पुरुष लहान अशी जरी त्याची व्याख्या आपण बनविलेली असली, तरी त्यांच्या वयांतील अंतर किती असलें म्हणजे त्याला वृद्धा-कुमारविवाह म्हणावा ह्याचा विचार करण्याचें रहातेंच. स्त्रियांच्या ठिकाणीं वैषयिक सिद्धता आणि तिची परि-समाप्ति ही पुरुषाच्या मानानें पुष्कळच लहान वयांत होत असते. जरठ-कुमारीविवाहांत जेवढें उभयतांत अंतर असतें, तितकेंहि अंतर वृद्धा-कुमारविवाहांत असण्याचें कारण नाहीं. साधारणतः पुरुषापेक्षां स्त्री पांच वर्षांपेक्षां जास्त वयाची असेल तर ती विषयसेवनाच्या दृष्टीनें दहा वर्षें मोठी आहे असें समजावें. पुरुष स्त्रीपेक्षां पंधरा वर्षांनीं लहान असेल तर निसर्गनियमानें तो तिच्या मुलाच्याच वयाचा समजाव-याचा. आईमुलगा या नात्याची कल्पना पुढें मांडण्याचें कारण एवढेंच, कीं निसर्गतः वृद्धा-कुमारविवाह किती अनुचित आणि किळसवाणा असतो याची कल्पना वाचकांना यावी. स्त्रियांचीं मनेंहि लौकर परिपक्क होतात. आणि साधारणतः पस्तीसचाळीस वर्षांची बाई विचारानें आणि शरिरानेंहि म्हातारी झाली असें गणण्यास हरकत नसते. विषयेच्छाहि त्याच वयांत कमी होऊं लागते. चाळिशीच्या सुमारास प्रजोत्पादनहि थांबतें हा निसर्गाचा नियम. तेव्हां मनानें आणि शरिरानें म्हाताऱ्या होणाऱ्या स्त्रीचे विचार आणि आचार तरुणाच्या फोफा-

वणाऱ्या आचारविचारांशीं समरस होतील, हें मानणेंच व्यर्थ. असे हे अनुचित विवाह आपणांकडे पांढरपेशा समाजांत सहसा होत नाहींत, पण मागासलेल्या जातींत व पाश्चात्य राष्ट्रांत थोडेफार घडून आल्याचीं उदाहरणें आढळतात. विवाह सोडून दिला तर वृद्धा-कुमारप्रेमसंबंध मात्र वाटेल तितके आढळून येतील. म्हाताऱ्या पुरुषास जशी तरुण स्त्रियांची आवड, तशी पोक्त स्त्रियांना अगदीं तरुण पुरुषाची हौस, ही अगदीं अनादि कालापासून वाटत आली आहे. अनेक प्रकारच्या लोभामुळें तरुण पुरुष म्हाताऱ्या स्त्रियांच्या भजनीं लागलेले आढळतात. विवाह काय अगर प्रेमसंबंध काय, दोन्हीं प्रकारांत मनोविश्लेषण सारखेंच. एकांत समाजानें मान्य केलेला लग्नाचा शिक्कामोर्तब असतो, दुसऱ्यांत तो नसतो, येवढेंच. वृद्धा-कुमारसंबंधापासून सुख किती लाभत असेल तें त्यांचें त्यांनाच माहिती ! स्त्री ही वयातीत, तेव्हां विषयसुखाबद्दल फारशी आशा नकोच ! विचारांच्या ऐक्याबद्दल म्हणाल, तर स्त्री त्या तरुणाला अगदीं एखाद्या लहान मुलाप्रमाणें समजून आपल्या ताब्यांत ठेवील, त्याला ती आज्ञा करील आणि त्यानें तिच्या आज्ञा पाळल्या पाहिजेत असा ती हट्ट धरून बसेल. अनेक प्रकारच्या अपयशी आणि दुर्दैवी विवाहप्रकारांत यासारखा दुसरा अनिष्ट विवाहप्रकार नाहीं.

केवळ उभयतांच्या वयांतील कमीजास्त अंतरावरून जे चार निरनिराळ्या प्रकारचे विवाहप्रकार संभवतात, त्यांचें दिग्दर्शन आणि दरेकाचें विशिष्ट मनोविश्लेषण येथें केलें आहे. पुनर्विवाह अगर मिश्रविवाह हे व्यक्तींच्या सामाजिक परिस्थितीमुळें निराळे प्रकार म्हणून गणतां येतील एवढेंच. मिश्रविवाह काय अगर पुनर्विवाह काय, यांच्याभोंवतीं सामाजिक बहिष्काराचें आणि आप्तस्वकीयांकडून होणाऱ्या असहकाराचें वातावरण बरेंच उद्वेगजनक आणि निराशामय असतें. ते दोन्ही विवाह त्यामुळें दुःखपर्यवसायी थोड्याफार प्रमाणांत होतातच. असे लोकविरुद्ध विवाहप्रकार वरचेवर आणि संख्येनें अधिक घडूं लागले म्हणजे समाजाचे गैरसमज दूर होतात, त्यांचा बहिष्कार थंडावतोहि. या दोन प्रकारच्या विवाहांत उभयतां पतिपत्नींच्या मनोभूमिकांचें विश्लेषण असें निराळें करतां येण्यासारखें नसतें. पतिपत्नींच्या वयांतील अंतरावर भिस्त ठेवून त्यांनाहि

या चौरंगी विवाहाच्या कुठल्या ना कुठल्या तरी एका प्रकारांत दाखल करतां येईल.

राहतांपैकीं निव्वळ विवाहप्रकार चार राहिले. बालविवाह, प्रौढविवाह, जरठ-कुमारीविवाह आणि वृद्धा-कुमारविवाह. हे चौरंगी विवाहप्रकार तितके शास्त्रशुद्धहि नाहींत. प्रौढविवाह हा जरठ-कुमारी व वृद्धा-कुमार-विवाह यांपैकीं कोणत्याहि प्रकारचा असूं शकेल. बालविवाहसुद्धां वृद्धा-कुमार विवाहप्रकारांत मोडण्याजोगा असेल. या चौरंगी विवाहाचे जितके अनंत रंग, तितकेच दरेक प्रकारांत गोंवलेल्या पतिपत्नींच्या मनोविश्लेषणाचेहि अनेक ढंग सांपडतील.

## २
# मधुचंद्र

लग्नाच्या अगोदरच काय, परंतु लग्नानंतरहि पतिपत्नींना एकमेकांची संपूर्ण ओळख करून घेण्याची संधि आपण योग्य वेळीं देत नाहीं. दोन अनोळखी स्त्रीपुरुष लग्नाच्या निमित्तानें कायमचे एकत्र येतात. अशा वेळीं परस्परांची संपूर्ण ओळख करून घेण्याबद्दल उभयतां अत्यंत उत्सुक असणारच. तथापि लग्नानंतर त्यांना एकमेकांच्या निर्बंध संगतींत वैवाहिक आयुष्याचे पहिले भरदार मोसमाचे दिवस घालविण्यास आपण मुळींच संधि देत नाहीं. या घटनेकडे जरा बारीक दृष्टीनें पाहिलें तर त्यांत आपली पुष्कळशीं वैवाहिक दुःखें अजाणपणें पेरलेलीं दिसून येतील.

प्रौढ वधूवर एकमेकांची शारीरिक आणि मानसिक संपूर्ण ओळख करून घेण्यास उत्सुक असलीं तर त्यांत नांवें ठेवण्यासारखें काय आहे ! केवळ विषयवासनेच्या तृप्तीसाठींच तरुण स्त्रीपुरुष लग्नाला तयार होतात. लग्नाच्या निमित्तानें विषयवासनेची आकंठ तृप्ति राजरोसपणें प्रत्यहीं करतां येईल, अशा ठराविक आशाजनक आश्वासनाची लालूच उभयतांच्या मनांत असतेच असते. ही प्रामाणिक नैसर्गिक प्रेरणा ज्यांच्या अंतःकरणांत उसळ्या मारीत नसेल, त्यांनीं खरें पाहिलें तर लग्नाच्या भानगडींत न पडलेलेंच बरें ! निदान दुसऱ्याला तरी स्वतःबरोबर निराशेनें दुःखी केल्याचें पातक लागणार नाहीं. परंतु संसारांतील वैषयिक प्रवृत्तीच्या अतिरेकाचा निषेध करतांना, आमच्या शास्त्रकारांनीं आणि शास्त्रकारांच्या ध्येयात्मक वैषयिक संयमाचा खरा अर्थ न समजणाऱ्या वडील मंडळींनीं, जो त्या नैसर्गिक आणि आवश्यक वैषयिक प्रवृत्तीचाच निषेध करण्याचा अतिरेक

केला, तोच आज आमच्या विकृत मनोरचनेचा जनक आहे. लग्न म्हणजे संस्कार, त्याचा हेतु ऐहिकापेक्षां पारमार्थिक सुखच साधण्याचा असला पाहिजे, असें बोधामृत अगदीं बाल्यावस्थेपासून आमच्या कानींकपाळीं पडत असल्यानें एक तर आम्हांला खऱ्या व आवश्यक वैषयिक प्रवृत्तीचे उमाळे दडपून टाकण्याची अनिष्ट खोड जडते, नाहीं तर आमच्या खुजट, कोंदट आणि विकृत मनांत अशा प्रवृत्ति जागृतच होईनाशा होतात. तरुण पिढीचें बंड या ढोंगी सनातनी उपदेशाविरुद्ध आहे. नवमतवादावर सर्वांचा जो अकारण दोष आहे, तो त्याच्या निरुत्तर सत्यकथनाबद्दलच होय. तेव्हां लग्न-संस्थेच्या अनेक स्तुत्य उद्देशांत विषयवासनेची निर्वेध तृप्ति हाहि एक उद्देश असतो आणि असला पाहिजे, येवढें कबूल करण्यांत पातक मानण्याचें कांहींच कारण नाहीं. वयांत आल्यापासूनचें मोठ्यांतलें मोठें औत्सुक्य जर स्त्रीपुरुषांना कशाबद्दल वाटत असेल तर तें वैषयिक गोष्टीबद्दल, तिच्या घटनात्मक योजनेबद्दल आणि तृप्तीच्या साधनांबद्दल. आणि लग्न होतांच दुसऱ्याच्या शरिराची संपूर्ण ओळख करून घेण्याची लालसा उत्पन्न होणें स्वाभाविकच ठरतें. तसेंच दुसऱ्याचा स्वभाव, आवडीनिवडी, आकांक्षा, भावना, खोडी यांचीहि संपूर्ण ओळख करून घेण्याबद्दल एकमेकांच्या मनांत तितकेंच औत्सुक्य असतें. मात्र या सर्व वाजवी औत्सुक्यावर आम्ही आमच्या अडाणी चालीरीतींनीं विरजण घालतों. त्यांची ओळख होण्याचे योगायोग जेवढे लांबणीवर टाकतां येतील तेवढे टाकीत असतों. हें दृश्य पाहिलें म्हणजे तरुणांची कींव व वृद्धांची चीड आल्यावांचून राहत नाहीं.

लग्नाच्या अगोदर फार झालें तर एकमेकांची दृष्टादृष्ट झालेली असते येवढेंच ! दुसऱ्याबद्दलची खरी माहिती काढण्यासाठीं मित्रमैत्रिणींच्या कानांशीं लागणारी तरुण मंडळी शेवटीं थट्टेचा विषय होतात. खुद्द लग्नांत वऱ्हाडी मंडळींचा येवढा गराडा त्यांच्याभोंवतीं पडलेला असतो कीं मनांत उतूं जाणाऱ्या दोन्ही औत्सुक्यांची तहान हातांपायांचीं बोटें न्याहाळून पाहण्यावर भागवून घ्यावी लागते. लग्नसमारंभ पार पडला तरी हवापालट करण्याच्या उद्देशानेंच विशेषतः लग्नाला आलेले लांबलांबचे लोंचट वऱ्हाडी घरांत येवढी गर्दी उडवून टाकतात कीं वधूवरांना एकान्त मिळणें अशक्यच होतें. लग्नानंतर पहिल्या दहाअकरा दिवसांत कुरकुर करणाऱ्या सासूकडून,

टिंगल करणाऱ्या नणंदेकडून, वैषम्यानें चेष्टा करणाऱ्या आसपासच्या कुमारिकांकडून, हट्टी लहान दिरांच्याकडून नवीन वधूबद्दल जी माहिती वराच्या कानांवर आदळत राहील, तेवढी त्याची वधूची ओळख आणि ओळखीची मर्यादा. अशीं हीं स्तुतिस्तोत्रें ऐकून वराचें मन विटलें नाहीं, 'फसलों रे फसलों' म्हणून त्यानें ऊर बडवून घेतलें नाहीं व बायकोला टाकून देण्याची भीष्मप्रतिज्ञा लग्नाच्या मांडवांतच केली नाहीं, म्हणजे वधूचें नशीब ! आणि त्यांत जर का लग्नांतलीं रुसणींफुगणीं, शर्तीभंग, मानापमान यांचा वैराग्नि धुमसत मागें राहिला असला म्हणजे मग विचारायलाच नको ! ती नववधू शंभर टक्के अवलक्षणी, वाईट पायगुणांची, वेडी, द्वाड, अशी सर्व सर्व कांहीं ठरावयाची ! नवऱ्यास बायकोची प्रत्यक्ष ओळख नसते तेव्हां तो तरी या सर्व जिव्हाळ्याच्या नातेवाइकांचें म्हणणें खोटें म्हणणार कसा ! आणि त्यांनीं तिच्यावर लादलेले दुर्गुण केवळ कुभांड आहेत याची खात्री तरी त्याला कशी पटणार !

तेव्हां पुष्कळ वेळां पहिल्या भेटींत नवरा आपल्या बायकोला 'आईचा मान संभाळला पाहिजे, घरीं आलेल्या आपल्या बहिणीचें ऐकलें पाहिजे, दिराच्या खस्ता खाल्ल्या पाहिजेत, तुझे आईबाप वाईट आहेत, तेव्हां त्यांचें तोंड पाहतां कामा नये' अशा प्रकारच्याच धमक्या भरीत असतो. सर्वच घर नवीन आणि तेंहि प्राणघातक कुत्सित वाग्बाणांनीं चौफेर सज्ज झालेलें, अशा स्थितींत नवऱ्याकडून लादण्यांत येणारे खोटे आरोप नाकबूल करण्याचें धैर्य तिला होत नाहीं, व आपलें खरें म्हणणेंहि कोणी कबूल करणार नाहीं हें ती भांबावलेली नववधू पक्कें जाणून असते. पहिली भेट सोडली आणि त्यांचा नेहमींचा नीरस संसार घेतला, तरी त्यांतहि हेंच दिसेल कीं, उभयतां पतिपत्नींना असा निर्वेध एकान्त यत्किंचितहि मिळत नाहीं, कीं ज्या वेळीं सगळ्या भोंवतालच्या जगाचें अस्तित्व विसरून जाऊन तीं उभयतां मोठमोठ्यानें मनमुराद गप्पा मारूं शकतील, हसूंखिदळूं शकतील, क्रीडा-विहार करूं शकतील. पतिपत्नींना दिवसा बोलत बसण्याची आपल्यांत जवळ जवळ बंदीच असते. मोकळीक असलेल्या घरांतूनहि त्यांचें एकमेकांशीं बोलणें तुरुंगांत भेट घेतल्याप्रमाणें इतरांच्या ऐकण्याच्या टप्प्यांत झालेलें अतएव जुजबी आणि भावनाहीन असेंच

असतें. बरें, दिवसानंतर पतिपत्नी भेटतात त्या वेळची स्थिति पाहिली तरी बहुतेक कुटुंबांत स्वतंत्र आणि इतरांच्या ऐकण्याच्या टप्प्यापासून दूर अशा खोल्या जवळ जवळ नसतातच. चहाड्या खाणारीं, खिळखिळीं आणि फटी पडलेलीं खिडक्यादारें, कान टवकारून उभ्या असलेल्या पडक्या आणि अर्ध्या भिंती, आणि बोलणें-बसणें स्पष्ट दाखविणारे झिरझिरीत पडदे, यांच्या आडोशांतील एकान्त तिसऱ्या वर्गाच्या वेटिंग रूममधील एकान्ताच्या तोडीचाच म्हणावा लागेल ! तेव्हां त्याचा उपयोग संकोची स्त्रीपुरुष किती भीत भीत घेतात, तें एकटें त्यांनाच विचारावें ! याचा परिणाम असा दृष्टोत्पत्तीस येतो कीं, चार चार मुलें झालेलीं जोडपीं एकमेकांच्या संपूर्ण ओळखीलाहि पारखीं असतात. शरीरधर्म निसर्गाच्या हवालींच आहेत, म्हणून वंशवृद्धि होत राहते येवढेंच. परंतु वैवाहिक जीवनक्रमाचें यशापयश संततीच्या संख्येवरून ठरविणें वेडेपणाचें होईल. पूर्वीची पिढी अगदीं डौलानें आणि अभिमानानें सांगते कीं, 'आम्ही नवराबायको नातवाच्या मुंजीची अक्षत घेऊन पहिल्यांदा बरोबर अशीं बाहेर हिंडलों, आणि नातीच्या लग्नांत पहिल्यांदा अशी ओसरी-माजघराच्या उंबरठ्यांत तब्बल पंधरा मिनिटें कार्याची वाटाघाट केली.' धन्य त्यांच्या नैसर्गिक पार्थिव जीवनक्रमाची ! आणि धन्य त्यांच्या मेलेल्या मनांची ! तेव्हां नवीन पिढींतील नवराबायको अष्टौप्रहर गळ्यांत गळे घालून बसतात असा त्यांनीं ओरडा न करावा तर काय करावें ! तथापि वस्तुस्थिति पाहिली तर नवराबायकोंना जेवढा निर्वेध एकान्त मिळावयास पाहिजे तेवढा तो मिळत नाहीं, अशीच घरोघर अवस्था. तेव्हां वृद्धांच्या या आरडाओरडीकडे फारसें लक्ष देण्याचें कारण नाहीं. उलट, लग्न होतांच उभयतां स्त्रीपुरुषांना एकमेकांच्या शरिराची, मनाची, गुणावगुणांची प्रत्यक्ष आणि संपूर्ण ओळख होणें जरूर असतें, हें सत्य कांगावखोर वृद्धांच्या गैरवाजवी वाक्प्रहारांतून खालीं शिल्लक राहतेंच.

अशी संपूर्ण ओळख होण्यासाठीं उभयतांना अगदीं शंभर टक्के निर्वेध एकान्त मिळाला पाहिजे. लग्नाच्या वऱ्हाडी मंडळींच्या हुल्लडींत अगर घरच्या मंडळींच्या नित्याच्या कचकचींत, हा निर्वेध एकान्त थोडाच मिळणार आहे ? तेवढ्यासाठीं युरोपियन लोकांत मधुचंद्राचे दिवस कुठल्या

तरी एकान्त आणि दूरच्या ठिकाणीं जाऊन उभयतां नवोढा वधूवरांनीं आनंदांत घालविण्याची जी एक उत्कृष्ट चाल आहे, त्या चालीचें अनुकरण आपल्या लोकांत होणें जरूर आहे. शोभेची दारू, फुकट्यांचा भोजन-खर्च, वाजंत्रीखर्च, गार्डनपार्ट्या इत्यादि अनावश्यक बाबतींत उधळपट्टीनें होणारा खर्च ज्यांना सहज मानवतो त्यांना पांचपन्नास रुपयांपर्यंतचा मधुचंद्राचा खर्च कांहीं परवडणार नाहीं असें थोडेंच ? वेळीं अनावश्यक खर्चाला फाटा दिला आणि मधुचंद्राच्या खर्चाला दोन पैसे जास्त वेंचले तर वधूवरांच्या दृष्टीनें तो खर्च उपयुक्त आणि फायदेशीर होईल. कदाचित् नंतरच्या एकंदर जिकिरीच्या कष्टी संसारयात्रेंत मधुचंद्राच्या त्या क्षणिक पण चुटपुट लावणाऱ्या सुखातिशयाच्या अनुभवांनीं गजबजलेल्या नंदनवनाकडे मागें वळून पाहण्यांत त्या उभयतांना आंतून गुदगुल्या होत राहतील; आपत्तीच्या प्रत्यहीं बोंचणाऱ्या खडेकांटयांच्या वेदना सह्य वाटतील. पतिपत्नींची एकमेकांची संपूर्ण ओळख झालेली असेल तरच त्यांचें आत्यंतिक प्रेम जडेल. दुसऱ्याच्या प्रेमाचें, विश्वासाचें, स्फूर्तीचें आपण सर्वस्व आहोंत ही जाणीव उभयतांच्या मनांत असणें यापरती मौल्यवान् अभिमानाची दुसरी चीज वैवाहिक आयुष्यांत नाहीं. तिच्यापुढें तिजोरींत रचून ठेवलेलीं भारी किमतीचीं रत्नेंहि टचाटच् पिचून जातात, सार्वभौमाचें वैभव फिकें पडतें. अशी ही जाणीव उत्पन्न होण्याच्या ज्या कांहीं नैसर्गिक घटना आहेत, त्यांतलीच मुद्दाम घडवून आणलेली ही मधुचंद्राची योजना होय.

केवळ उभयतांची प्रत्यक्ष आणि संपूर्ण ओळख अगोदर (अगोदर म्हणजे गैरसमजांनीं विषवायु पसरून टाकण्याच्या अगोदर) झालेली नव्हती, म्हणूनच कित्येक सुखी होणारे संसार कुभांडाच्या आगीनें जळून खाक झाले आहेत. कुणा सासूनें तर कुणा नणंदेनें, कुणा शेजारणीपाजारणीनें तर कुणा ढोंगी मित्रानें, नवऱ्याचे कान पूर्वींच भारून टाकल्यानें कितीतरी मुग्ध सुवासिनींना भरल्या घरांतून उठवून पोटासाठीं वणवण भटकावयाला लावलें आहे; तर कित्येक कोंवळ्या जीवांनीं निराशेच्या भरांत आत्मघात करून दुसऱ्यास दुःखसागरांत लोटून दिलें आहे. जेथें पुरी पुरी ओळख असते, तेथें गैरसमज उत्पन्न होणें शक्य नसतें, आणि संसा-

रांतील शेंकडा नव्याण्णव बेबनाव केवळ गैरसमजानें उत्पन्न झालेले असतात. वृद्धपणीं आपल्या तारुण्याकडे आणि कोपिष्ट स्वभावामुळें आपण केलेल्या पत्नीच्या छळांकडे पाहण्याचें धैर्य माणसाला होत नाहीं, त्यांना लाज वाटते. त्यांचे ते गैरसमज कालांतरानें दूर होणारे असतात खरे परंतु त्या त्या वेळीं ते आपला प्रभाव असा गाजवून जातात कीं, उभयतांनीं त्याची जन्मभर खंतच खावी. बरें, गैरसमज कमी होण्याची संधिच आली नाहीं, उलट त्यांच्यावर खोट्या अफवांचीं लुकणें चढत चाललीं, म्हणजे तर जे अनंत जीवात्मे तळतळाट देत संसाराच्या फुफाट्यांत जन्मभर होरपळत पडतात त्यांची वाट काय!

दिलसफाई, स्वभावांचा मिलाफ व विश्वासाची देवघेव होण्याला थोडी-बहुत धुंदी चढावी लागते, आणि विषयवासनेच्या पहिल्या घोटाची, कैफाची, अशी कांहीं हळवी वेळ असते कीं, एक दुसऱ्याच्या पुरा कह्यांत गेलेला असून त्याची आज्ञा पाळण्यांत तो स्वतःस कृतकृत्य समजूं लागतो. या बेफाम धुंदीच्या अनुभवांत प्रत्येकजण आपलें स्वतंत्र व्यक्तित्व विसरून जाऊन दुसऱ्याच्या व्यक्तित्वांत पुरा मिसळून जातो. तेव्हां त्यांच्या स्वभावांतील विसंगतता, व्यक्तिगत खोड्या, या आपोआप गळून पडतील, इतकेंच नव्हे तर त्या दुसऱ्यानें नजरेस आणून देतांच अगदीं आनंदी आज्ञाधारकपणानें टाकून देण्याची त्यांची तयारी असते. ही धुंदी आयुष्यांत केव्हां ना केव्हां तरी दरेकाला चढतेच, आणि या धुंदीचा उपयोग निर्घृण पशुवृत्ति वाढविण्याकडे जो आज होत असतो, त्याऐवजीं परस्परांची दिलसफाई आणि स्वभावमिलाफ होण्याकडे करतां आला तर वैवाहिक सुखी जीवनाची हमीच घेतल्यासारखें होणार आहे. आईच्या आज्ञेंत वागून बायकोचा छळ करणारा, परगांवीं नोकरीच्या निमित्तानें एकट्या राहूं लागतांच बायकोच्या ताब्यांत जातो आणि आईचा छळ करूं लागतो हा जो सासवासुनांचा उन्हाळापावसाळा खेळ कधीं कधीं पाहण्यास मिळतो त्यांत तरी हेंच तत्त्व असतें. पुरुष हा स्त्रीच्या वश व्हावा, राहावा, असा निसर्गाचाहि नियम दिसतो. आणि वैवाहिक आयुष्य म्हणजे जर उभयतांनीं एकजीव होऊन आयुष्य घालविणें हेंच असेल तर त्यांचा जेवढा लवकर निर्भेळ एकजीव होईल तेवढा आपण प्रयत्न केला पाहिजे. वडील

मंडळींना हें पसंत पडणार नाहीं. मुलगा बायकोच्या ताब्यांत गेलेला आईबापांना खपावयाचा नाहीं; परंतु एकमेकांची संपूर्ण आणि प्रत्यक्ष ओळख न झाल्यामुळेंच मोडलेल्या संसाराच्या ढिगांकडे पाहिलें म्हणजे या ओळखीचे अपवादात्मक अतिरेक पत्करले असेंच वाटतें. मधुचंद्र ही एक आवश्यक घटना सरसहा अंमलांत येईल आणि तो आवश्यक धार्मिक क्रियेच्या महत्त्वानें आचरणांत येईल तो सुदिनच!

# ३
# सुखाचा संधिकाल

कोणत्याहि गोष्टीची पहिली तोंडओळख ही अवघडच ! ती खुद्द गोष्ट आनंददायक असली तरीसुद्धां तिच्या प्राप्तीच्या उत्कंठेचा काल तितकाच अवघड जातो. हा जर सर्वसाधारण बाबतींबद्दलचा सिद्धान्त, तर पतिपत्नींची पहिली भेट ही किती अवघड बाब उभयतांना वाटत असेल, ह्याची कल्पना केवळ अनुभविकांनाच येईल. नवख्या वधूवरांनींहि त्या अवघड बाबीची ओळख करून घेतली तर बरेचसे गैरसमज आणि बराच असंतोष त्यांना टाळतां येतील.

प्रीतिविवाह हाच एकच्या एक अभिप्रेत धरून त्याच्या अनुरोधानें संसारशास्त्राचे सिद्धान्त सांगणें हेंच योग्य. आज प्रीतिविवाह खऱ्या अर्थानें कुठेंच सांपडत नाहीं, ही वस्तुस्थिति खरी आहे. पैसा, रूप, नांवलौकिक, उत्कर्षाचा संभव, नोकरी लागण्याची शक्यता, याच आगांतुक गोष्टींकडे लक्ष देऊन वधूवरांचे पालकच काय पण खुद्द वधूवर आज शेंकड्यावारी दिसून येणाऱ्या विजोडप्यांच्या जोड्या तडाखेबंद जमवीत आहेत. तथापि आदर्श म्हणून प्रीतिविवाहच घेतला पाहिजे आणि तो लवकरच रूढ होईल हेंहि तितकेंच निश्चित. म्हणून प्रीतिविवाहाच्या अडणीवरच या संसार-शास्त्राचें सर्व अवडंबर बसविणें जरूर आहे. असें तें कसें बसवितां येईल, उभयतां वधूवरांनाच तें कसें रुचेल आणि पचेल, त्यांच्या महत्त्वाकांक्षेला तें कसें साजेल आणि पटेल, कुटुंबसंस्थेंत तें कसें निभावेल आणि टिकेल, ह्या अनुरोधानें नव्या संसारशास्त्राचें विवेचन करणें जरूर आहे. तथापि या संबंधींच्या बऱ्याचशा बाबती आजकालच्या अडलेल्यानडलेल्या, अगर

चालचलाऊ सोयिस्कर लग्नपद्धतीनें स्वेच्छेनें, परेच्छेनें वा निरिच्छेनें एकत्र जखडलेल्या, जोडप्यांना लागू पडण्यासारख्या आहेत. प्रेमविवाह असो अगर विवाहाचें प्रेम असो, कोणत्याहि निमित्तानें का असेनात, उभयतां पतिपत्नी गृहस्थाश्रमाच्या दालनांत एकटींच एकटीं प्रथम जेव्हां एकमेकांस भेटतात, तेव्हांची त्यांची मनोवृत्ति बऱ्याच अंशीं एकाच तऱ्हेची असावयाची. म्हणून अशा त्या मनोरचनेचें वर्णन जसें दोन्हींकडे सारखेंच लागू पडेल, तसे तद्विषयक नियम समसमानतेनें लागू पडतील.

तसेंच पाहिलें तर अगदीं पहिली भेट म्हटली तरी तत्पूर्वी उभयताची साधारण तोंडओळख तर असतेच. प्रीतिविवाहांत ती ओळख किती प्रकारची आणि कोठवर असेल हें उभयतांना मिळालेल्या स्वातंत्र्यावर व एकान्तावर अवलंबून असेल, तर जोरजुलुमाच्या सनातनी विवाहांत इतरांच्यामार्फत म्हणून अपरोक्ष आणि थोडा धीर चेपलाच तर प्रत्यक्ष तोंड-ओळखहि एकमेकांत असणारच. पूर्वीची ओळख असलेले स्नेही एकत्र भेटतांच एकदम ते एकमेकांशीं सलगीनें वागूं लागतात; पण नवीन स्नेह्यांना सुद्धां सलगीचा टप्पा गांठावयास फारसा अवधि लागत नाहीं. दोघांचे एक विचार, दोघांचेहि एक आचार, दोघांच्याहि सदृश आकांक्षा आणि त्या गांठण्यासाठीं जरूर त्या समसमान उत्कट प्रवृत्ति, इतकी सामग्री असतांना दोन सजातीय स्नेहीसुद्धां एकमेकांचे जिवलग मित्र बनतील; तर मग एका नाजुक नात्यानें एकत्र आणलेले निर्धास्त स्त्रीपुरुष संकोचाचा उंबरठा चुटकीसरसा केव्हांच ओलांडतील, हें न सांगतांहि अनुमानानें समजण्यासारखें आहे. पण पतिपत्नींची पहिली भेट म्हणजे दोघांना एकत्र आणून सोडण्याची सर्कशी घटना नव्हे. दोन स्त्रीपुरुष— तींहि तरुण— एकत्र येतात— आणि तींहि निर्धास्त अशा एकान्तांत—तेव्हां या घटनेंत खात्रीनें पुष्कळच अद्‌भुतरम्यता आहे हें कोणीहि कबूल करील.

अगदीं तिऱ्हाईत माणसाची पहिल्यानें ओळख होतांना जो कांहीं आपला बरावाईट ग्रह होतो, तो अगदीं कायमचा असतो. आणि कित्येक वेळेला सकृद्दर्शनीं झालेला आपला ग्रह हाच दृढतर मैत्रीच्या, आणि तिच्या योगानें तो ग्रह दूर होण्याच्या शक्यतेच्या, आड येत असतो. बरें, आपण जो दुसऱ्याबद्दलचा आपल्या स्वतःचा ग्रह करून घेतों, तो तरी

कुठें पायाशुद्ध असतो ? त्या इसमाला शिष्टाचाराचे बारकावे माहीत नसल्यानें तो आपल्याला खोडसाळ दिसतो. त्याला संभाषणाची कला अवगत नसल्यानें तो आपणाला विक्षिप्त वाटतो. त्याच्या निकडीच्या आतुरतेमुळें आपणाला तो लोचट वाटतो. आणि तो इसम येण्याच्या वेळेला आपण इतर कारणांनीं जर अगोदरच चिसाळलेले असलों, तर त्याचा साहजिक नम्रपणा आपल्याला अट्टल बदमाषाच्या ढोंगी विनयाप्रमाणेंहि भासतो.

दोन अनोळखी इसम पहिल्यानें भेटले म्हणजे त्यांचे परस्परांबद्दल ग्रह काय होतील, हें निश्चित सांगतां येत नाहीं. तसेंच स्त्रीपुरुष एकत्र पहिल्यानेंच भेटले तर त्यांचेहि एकमेकांबद्दल काय ग्रह होतील हें निश्चित सांगतां येत नाहीं. अनपेक्षित आचार आणि अघटित विचार हे नेहमींच अविश्वास आणि असंतोष उत्पन्न करीत असतात. तिऱ्हाईत माणसें एकमेकांबद्दल वाटेल ते ग्रह करून बसलीं तरी त्यांत मोठेंसें बिघडत नाहीं. सर्वसाधारण मित्रांचा डाव गंजिफांच्या डावासारखा गल्लत लावून वाटेल त्या तऱ्हेनें आणि वाटेल तितक्या वेळीं लावतां येतो, मोडतां येतो, जोडतां येतो; पण स्त्री-पुरुषांचा एकत्र जमलेला जोडा कधींच मोडतां येत नाहीं. यासाठींच सकृद्दर्शनीं होणारे ग्रह आणि त्या ग्रहांमुळें होणारे परिणाम हे उभयतांना जन्मभर सारखेच भोंवतात.

दोघेंहि एका विचारानें, एका अपेक्षेनें आणि एकाच उल्हासानें एकत्र येतात आणि त्या सर्वांचें समाधान संपूर्ण झालें नाहीं तरी बरेंचसें समाधान अगदीं पहिल्या भेटींत होणें जरूर असतें. त्यांत जर का चुकामूक झाली तर त्यायोगेंच बेबनावाचें बीज अगदीं पहिल्या भेटींतच रोवलें गेलें म्हणून समजावें ! दुसऱ्याची आपण संपूर्ण ओळख करून घ्यावी आणि आपली—विशेषतः स्वभावाची, आवडीनिवडीची—दुसऱ्याला ओळख करून द्यावी, हा उभयतांचा विचार, ही परस्परपरिचयाची आकांक्षा; वैषयिक लालसा दुसऱ्याच्या मदतीनें परिपूर्ण व्हावी ही अपेक्षा; आणि एका मोठ्यांतल्या मोठ्या कुतूहलाच्या विषयाचा नवाच अनुभव लाभणार याबद्दलचा उल्हास; हीं सर्व परस्परांच्या मनांत अगदीं उचंबळत असतात. आपल्या मनांत येणारे बेत कोणते ते बोलून दाखविण्याची आणि पुरे करण्याची संधि केव्हां आणि कोणती, त्यांत दुसऱ्याचें साहाय्य कोठवर आणि कसें

मिळवावें, याची तर ज्याची त्यानें आपल्या मनाशीं सांगड लावली पाहि-
जेच; पण दुसऱ्याचा स्वभाव आणि त्याच्या अपेक्षा यांचीहि प्रत्येकानें खातरजमा केली पाहिजे.

वैवाहिक जीवनांतील आनंद एकाकी कुणी कधींच मिळवूं शकणार नाहीं; दुसऱ्याच्या मदतीनें तो मिळवावयाचा असतो; दुसऱ्याच्या सह-कार्यातच तो उत्पन्न होतो. संसारसुखाचा लाभ घेणें म्हणजे कांहीं पक्वान्ना-वर यथेच्छ ताव मारणें नव्हे! पक्वान्न हें निर्जीव असतें; त्याची गोडी सर्व काळ सर्वांनाच सारखी मिळण्यासारखी असते. अगदीं मनाजोगता जोडीदार अगर जोडीदारीण मिळाली तरी त्यांच्यापैकीं कोणीहि एक दुस-ऱ्याची तटस्थ वृत्ति ठेवून अगर दुसऱ्याच्या वृत्तीची पर्वा न ठेवतां वैवा-हिक आनंद मिळवूं म्हणेल तर त्याला तो कधींहि प्राप्त होणार नाहीं. दुसऱ्याचें सहकार्य हें तर लागतेंच, आणि तें सहकार्यहि पुष्कळ प्रयत्नांनीं मिळवावें लागतें.

अगदीं नुसत्या स्वभावाच्या ओळखीची गोष्ट घेतली तरी दुसऱ्याला खुलविल्याशिवाय, विश्वासांत घेतल्याशिवाय, सहानुभूति दाखविल्याशिवाय, मनमोकळेपणानें कोणी कधीं बोलेल काय? करितां उभयतांनीं मनमोकळे-पणानें एकमेकांशीं वागलें पाहिजे, हळुवार उत्तेजनानें आणि वेळीं लटक्या स्तुतीनें भावनांची जोपासना केली पाहिजे. या स्वभावाच्या ओळ-खींत बऱ्याच जणांना आपल्या स्वभावाचें एकसारखें वर्णन करण्याची खोड असते. त्या योगानें त्यांचा स्वभाव दुसऱ्याला समजला तरी दुस-ऱ्यांचा स्वभाव त्यांना कधीं समजतच नाहीं. आपल्याच स्वभावाच्या स्तुति-स्तोत्रांत गर्क असावयाचें आणि दुसऱ्याची माहितीहि विचारावयाची नाहीं अगर ऐकून घ्यावयाची नाहीं, हा तर उघड उघड बेफिकीरपणाच काय पण दुसऱ्याच्या भावनांचा तो उद्दाम उपमर्दच होय. आपल्याबद्दलच बोलणाऱ्या माणसाचा त्याचे स्नेहीसुद्धां तिटकारा करतात. पतिपत्नींच्या संकोची नात्यामुळें इतरांप्रमाणें त्यांपैकीं एकाला वाटणारा तिरस्कार दुसऱ्यास उघड उघड बोलून दाखवितां येत नाहीं एवढेंच. आत्मप्रौढीच्या कैफांत माणूस पुष्कळ वेळां दुर्गुणांबद्दलहि अभिमानाची भाषा बोलत असतो. आपल्याला जडलेल्या खोड्या, असलेल्या आवडीनिवडी ह्यांबद्दलची फुशा-

रकी मारणें वेडेपणाचें होय. त्यांतील बऱ्याचशा, निदान कांहींतरी, दुसऱ्या व्यक्तीला आवडणाऱ्या नसतील आणि अशा त्या दुसऱ्याला नावडत्या असणाऱ्या खोड्यांबद्दल अजाणपणें उच्चारलेली अभिमानाची भाषा असेंच नाहीं का दुसऱ्यास सांगणार, कीं तुला त्या आवडोत कीं न आवडोत, तुला त्या शिरसावंद्य मानल्याच पाहिजेत. पतिपत्नींनीं आपापल्या स्वभावांची आणि आवडीनिवडींची अशी एकत्र आणि सुंदर मांडामांड करावयाची असते, कीं दोघांमधील सलोखा हा रतिमात्रहि ढांसळणार नाहीं. आपल्या खोड्या, आवडीनिवडी, स्वभावांतील दोष, दुर्गुण, हीं होतां होईतों माणसांनीं स्वतः न बोललेलीं बरीं. दुसऱ्यांपासून खास लपवून ठेवण्यासारख्या गोष्टी असतील तर त्या ह्याच आणि दुसऱ्याच्या संगतीचा निर्वेध आनंद भोगण्यासाठीं, स्वतःच्या संगतीपासून दुसऱ्यास आनंद देण्यासाठीं जर कांहीं हटकून टाळावयाच्या बाबती असतील तर त्याहि ह्याच होत. संभाषणकलेचा व शिष्टाचाराचा असा एक नियम आहे, कीं दुसऱ्याचें मन उल्हसित करावयाचें, व त्याला भाबडें बनवून शक्य तितकी माहिती त्याच्या तोंडून वदवावयाची. होतां होईतों दुसऱ्याचें भाषण ऐकायचें, हा श्रेष्ठ आचार होय.

बोलण्याच्या भरांत पुष्कळ वेळां माणसाला भान राहत नाहीं. विशेषतः शारीरिक सुखाच्या उत्तेजक रोमांचांच्या फेरींवर फेरी झडूं लागल्या म्हणजे शरिराप्रमाणें मनहि गाफील होऊन जातें, न बोलण्याच्या गोष्टीहि माणूस बोलून जातें, न उच्चारण्यासारख्या गोष्टी जाणण्यासाठीं दुसऱ्याच्या खनपटीला बसतें आणि पहिल्याच भेटीला एकत्र मिसळणाऱ्या अंतःकरणांत भलत्याच संशयाचें विष कालवून ठेवतें. विवाहापूर्वींचीं प्रेमरहस्यें उघड अगर संदर्भानेंहि पतिपत्नींनीं कधींच बोलूं नयेत. त्यांतल्या त्यांत पहिल्याच भेटींत असलीं बोलणीं काढणें अगर चालूं देणें हें पहिल्याच घासाला माशी लागण्याइतकें अपशकुनी होय. गुप्त रहस्यांचीं थडगीं उकरून विशादांचीं अगर तिरस्कारांचीं भुतें एकमेकांच्या मनांत धिंगाणा घालूं लागतील असे प्रसंग होतां होईतों टाळावेतच. फार काय, पण प्रसिद्ध अशा विवाहोत्तर प्रेमरहस्यांची रुजवात पतिपत्नींनीं करावयाची असेलच तर एकमेकांचीं तोंडेंहि पुन्हा न पाहण्याच्या शेवटच्या क्षणींच करावी. अमक्यातमक्या

मुलींची माझी ओळख आहे, अमक्या इतक्या जणींनीं माझ्याशीं प्रेमयाचना केली होती, अमक्या ठिकाणीं माझें लग्नाचें जमलें होतें, इत्यादि फुशारक्या नवऱ्यानें मारणें काय किंवा बायकोनें आपल्या स्नेह्यांची भरमसाट स्तुति करणें अगर अमक्यातमक्यांनीं आपणाला मागणी घातली होती अशा थापा मारणें काय, तें एकाकी संबंधाच्या सोंवळ्या नीतिकल्पनेस आणि प्रेमाच्या शुद्धस्वरूपी भावनांस सारखेंच विघातक. पतिपत्नींनीं परस्परांशीं असें वागावें, कीं प्रेमव्यापारांतील कायिक, वाचिक व मानासिक सर्व अनुभव जणूं परस्परांशींच आणि पहिल्यानेंच तीं उभयतां अनुभवीत आहेत. बोलण्या-चालण्यांतील गाफीलपणा व वर्तनांतील पुढाकारवृत्ति हीं सहज दुसऱ्याच्या मनांत शंका उत्पन्न करतील आणि ती अशाबद्दल, कीं न जाणीं, इतरत्र कांहींतरी अनुभव याला मिळालेला असावा. स्त्रिया जातीनेंच लाजाळू, संकोची, माघार घेणाऱ्या. प्रेमपंकीं आलेल्या अनुभवांना त्या मोठया शिताफीनें कायमच्या लपवून ठेवूं शकतात. भीति असते भड-भडया पुरुषांची! आणि स्त्रियांतहि भडभडया स्त्रिया नसतील असें थोडेंच आहे! अशांनीं मिठाची गुळणी घेऊन जीभ बंद केली तरी प्रेम-व्यापारांतील अनुभवशीर माहिती दाखविणारें कौशल्य स्वतः रहस्यभेद जरी करूं शकलें नाहीं तरी संशयाचें पिशाच्च तें सहज उठवूं शकेल. करितां उभयतांनीं परस्परांचीं मनें शक्य तितकीं विशुद्ध आणि आगंतुक संभ्रमांपासून अलिप्त राहतील अशा शिताफीनें वागणें जरूर असतें.

आपलीं रहस्यें जशीं दुसऱ्यांना सांगूं नयेत, तशीं दुसऱ्याचींहि त्यांच्या तोंडून ऐकण्याची इच्छा करूं नये. पहिल्या भेटींत, अगदीं थट्टामस्करी करतांनासुद्धां दुसऱ्याची नीतिमत्ता कवडीमोल ठरेल, दुसऱ्याचें सोंवळें वा कोंवळें पावित्र्य ओंवळें होईल, अशा कल्पनांना संदर्भानेंहि शिवूं नये. आचरट बोलणारीं माणसें अगदीं पहिल्याच भेटींत आपणांस खूप थट्टा-मस्करी करतां येते अशा दिमाखानें अगर लैंगिक बाबतींत आपण पुढारलेले आहोंत अशा फुशारकीनें स्वतः कल्पित गोष्टी रचून स्वतःबद्दल वेडेंवाकडें बोलतील आणि दुसऱ्याला खालीं पाहावयास लावणारे वेडेवाकडे सवाल विचारतीलहि. दोघेंहि नफ्फट असतील तर कांहींच धोका नाहीं. पण विधात्यानें जणूं विसदृशस्वभावी पतिपत्नींची सांगड घालण्याचा विडाच

उचललेला दिसतो ! अशा परिस्थितींत एकाच्या आचरटपणानें दुसऱ्याच्या हृदयांत कायमची खोल जखम होते. परस्परांची दृढ मैत्री झाल्यावर आचरट बोलण्यांतील सत्य किती आणि खोटें किती ह्याचा कयास दुसऱ्यास बांधतां येतो; मग दुसरें माणूस तें वायफळ बोलणें एका कानानें ऐकून दुसऱ्या कानानें सोडून देतें. पण पहिल्या भेटींत स्वभावाची कुठें पारख होऊं लागणार, अशा वेळीं उभयतांनीं संयम राखून आपल्या स्वभावांतील उत्तमोत्तम लक्षणें व विचार यांचेंच प्रदर्शन दुसऱ्यापुढें मांडलें तर विश्वास आणि विश्वासापोटीं वसत असलेलें संसारसुख निश्चितपणें त्यांना वृद्धिंगत करतां येईल.

नवरा-बायकोंच्यांत वयाचें अंतर असतेंच आणि तेवढेंच त्यांच्या संस्कृतींतहि असतें. अगदीं एका सांस्कृतिक दर्जाचीं, एका वयाचीं, एका वातावरणांत वाढलेलीं पतिपत्नी असणें जवळ जवळ अपवादात्मकच. वय आणि संस्कृति यांचें जें अंतर उभयतां पतिपत्नींत असतें तें पहिल्या भेटींतच नाहींसें होणें जरूर असतें. लहान मुलाला उंच होतां आलें नाहीं तर त्याच्याशीं खेळणारा मोठा मनुष्य गुडघ्यावर उभा राहून ठेंगणा होईल, नाहीं तर मुलाला तरी खुर्चीवर उभा करील. मूल आणि वडील माणूस यांचीं तोंडें एका पातळींत आणण्यासाठींच ही खटपट असते. तोच नियम पतिपत्नींनाहि लागू पडतो. उभयतांपैकीं वयानें व विद्येनें श्रेष्ठ असेल त्यानें आपण होऊन लहान झालें पाहिजे. दुसऱ्याच्या भावना आणि आकांक्षा यांशीं समरस होतां येईल अशा स्वतःच्या कल्पना ठेवल्या पाहि-जेत. आपल्यापेक्षां कनिष्ठ असणाऱ्या व्यक्तीला हरभऱ्याच्या झाडावर चढ-वून आपल्या उंचीला सहजच आणतां येतें. हा प्रयोग श्रेष्ठ अगर ज्येष्ठ जो असेल त्यांनीं करून पाहावा. प्रचलित पद्धतीप्रमाणें संस्कृति, वय, दर्जा आणि शक्ति ह्यांत पुरुषच श्रेष्ठ असतो. तेव्हां या मुद्याबद्दलची सर्व जबाबदारी पुरुषावरच येऊन पडते. अगदीं शरीरबलाबद्दल जरी घेतलें, तरी दोघेंहि आपापल्यापरी सारख्याच ताकतीचीं आहेत असें वातावरण त्यांच्यामध्यें निर्माण व्हावें लागतें. लहान मुलांशीं कुस्ती खेळणारा मोठा माणूस स्वतः पडून मुलाचा जय करून देऊन त्याला खुलवीत असतोच ना? एक अतिशय सशक्त आणि दुसरा अतिशय अशक्त अशांची जोडी

असतांनाहि सशक्तानें आपलें शरीरसामर्थ्य अशक्ताच्या सामर्थ्याबरोबर आणलें तरच संस्कृतीच्या वा शक्तीच्या एका पातळींत उभीं रहाणारीं उभयतां पतिपत्नी एकमेकांस तुल्यबल समजतील, विचारांची देवघेव समसमान हक्कानें करूं शकतील आणि त्यांच्या संगतीपासून उभयतांना समसमान आनंद होईल.

दुसऱ्याच्या खोड्यांबद्दल आणि अवगुणांबद्दल कानउघाडणी करावयाची असेल तरी पहिली भेट ही कांहीं त्या गोष्टीला योग्य संधि नव्हे. पतिपत्नी म्हणजे कांहीं आरोपी व फौजदार नव्हत, कीं ज्याची पहिली ओळख एकाच्या दरडावण्यांत आणि दुसऱ्याच्या विनवण्यांत सुरू व्हावी. बरेचसे पुरुष पहिल्याच भेटीला आपल्या पत्नीला जवळजवळ दमदाटीच देण्याचा घाट घालतात आणि कशाबद्दल, तर आमच्या येथें असुकअसुक गोष्टी साफ चालावयाच्या नाहींत अशाबद्दल ! ह्या ज्या निषिद्ध गोष्टी म्हणून पत्नीच्या अंगीं बळेंच चिकटविण्यांत येतात, त्यांतील बऱ्याचशा गैरसमजुतींतून आणि पुष्कळशा निराधार अफवांतून उत्पन्न झालेल्या असतात. ज्या कांहीं खऱ्या असतील त्यांच्याबद्दल कानउघाडणी करण्याची वेळ मात्र पहिली भेट खात्रीनें नसावी. बऱ्याचशा निषिद्ध गोष्टी वागणुकीच्या पद्धतीसंबंधीं असतात आणि त्या कांहीं दिवस पुढें ढकलल्या तरी चालण्यासारख्या असतात. दोघांचीं मनें एकमेकांसमोर प्रथमच खुलीं होण्याचा प्रसंग, त्यांच्यांत समरसता उत्पन्न होण्याची संधि, विश्वास वाटण्याची वेळ आणि दोन्ही स्वभाव एकजीव होण्याचा प्रसग हीं सर्व पहिल्या भेटींतच जमतात; तेव्हां त्या भेटीचा उपयोग उभयतांना एकजीव होण्यासाठीं जेवढा करून घेतां येईल तितका थोडाच !

रीएन्फोर्सड् कॉंक्रीट ओततांना एकापाठोपाठ घमेलीं एकसारखीं ओतीत असतात, त्यांचा एकजीव होण्यासाठीं गवंडी लोक करण्यांनीं सारखे पोकळ खाडेखड्डे दाबून बसवीत असतात आणि त्यांवर पहिले चोवीस तास पाण्याचें थारळें जमवून ठेवतात. तेवढ्या त्या कालांत कमचीसिमेटाचा एक अखंड दगड बनतो, कीं ज्यावर पुढें पोलादी पहारीहि बोथट होतात. अगदीं हीच क्रिया पतिपत्नींच्या पहिल्या भेटींत थोडीफार होत असते, निदानपक्षीं व्हावयास पाहिजे. बेबनावाचे, संकोचाचे सर्व शब्द

आणि प्रकार उभयतांनीं खड्यासारखें निवडून काढून टाकले पाहिजेत. दोघांचा एकजीव व्हावयाचा असला तर तो पहिल्या भेटींतच अर्धामुर्धा जमून जातो आणि असा खरोखर एकजीव झाला म्हणजे गैरसमजुती, मतभेद, परिस्थिति या सर्वांच्या पहारी त्यांच्यापुढें बोथट होतात. कॉंक्रीटचें काम करणारा ज्या शिताफीनें आणि घाईनें पहिल्या सपाटयांत त्याचा एकजीव होण्यासाठीं धडपडत असतो, तितक्याच शिताफीनें आणि घाईनें पतीपत्नींनीं उभयतांमधील संघटन वाढविलें पाहिजे. एकमेकांच्या ठिकाणीं असलेल्याच काय पण त्यांच्या जवळच्या नातेवाइकांच्या ठिकाणीं असलेल्या दुर्गुणांचा, खोड्यांचा, वैगुण्यांचा उल्लेखहि पहिल्या भेटींत होऊं देऊं नये.

लग्नांत झालेलीं अगर लग्नानंतर झालेलीं उभयपक्षांतील भांडणें, सासवासुनांची झालेली कुरकूर अगर कागाळ्या मनांत बाळगून त्यांची शहानिशा पहिल्याच भेटीला करूं पाहणारी मंडळी कांहीं कमी नसतात. त्यांतील बरींचशीं भांडणें लोभानें वा गैरसमजुतीनें झालेलीं असतात आणि पतिपत्नी आपापल्या पक्षास चिकटून राहून त्यांचें अट्टाहासानें समर्थन करतात. जन्मदात्या कुटुंबांतून तीं अजून फुटून निराळीं झालेलीं नसतात, जन्मदात्या कुटुंबाला तीं विसरूं लागलेलीं नसतात व तीं एकजीव झालेलीं नसतात. पतिपत्नी आचारविचारांनीं एकजीव झालीं, कीं असलीं भांडणें तीं दोघें तिऱ्हाईतपणें पाहूं शकतात, सत्यासत्याचा स्वतंत्रपणें निर्णय देऊं शकतात. पण तशी स्थिति पहिल्या भेटीच्या वेळीं नसते. उभयतांना आपल्या वंशाबद्दल, आपल्या आईबापांबद्दल, त्यांच्या चालीरीतींबद्दल, त्यांच्या वागणुकीबद्दल, त्यांच्या स्वतःच्या आचारविचारांबद्दल भलताच अभिमान बाळगून दुसऱ्याशीं वितंडवाद करण्याची अगर धमकी देण्याची वेळ पहिली भेट नव्हे खास. पुरुष नेहमींच अशा धमक्या देतो आणि स्त्री सासरच्या मंडळींच्या वागणुकीबद्दल नेहमींच गाऱ्हाणीं सांगत असते. हीं अनुचित भांडणें भांडण्याची दुर्बुद्धि पहिल्याच भेटीच्या वेळीं उभयतांना आठवली तर त्यांच्या वैवाहिक सुखाचा घडा तिथेंच फुटला म्हणावयाचा!

पहिल्या भेटींत स्वभावाची ओळख करून घेण्यापेक्षांहि दुसऱ्याच्या शरिराची ओळख करून घेण्याची उत्कंठा उभयतांच्या मनांत विशेष तीव्र असते. ही वैषयिक आतुरता तृप्त होण्यासाठीं निसर्ग शरिराच्या रोमरोमां-

तून अनेकविध प्रेरणा एकसारख्या देत असतो. निसर्गानें बऱ्याचशा प्रवृत्ति उपजत बुद्धीच्या हवालीं करून दिल्या असून त्या आपोआप तृप्त होण्याची योजना शरिरांतच करून ठेवली आहे, म्हणून त्याबद्दल विस्तारानें लिहिण्याचें कारण नाहीं आणि येथें तें युक्तहि नाहीं. तथापि पहिल्या भेटीनंतर लगेच जी गोष्ट ऐकूं येते, तिच्यावरून उभयतांना विषयसेवनाचें जरूर तें शास्त्रीय ज्ञान तितकेंसें नसावें असें वाटतें. पहिल्याच भेटीनंतर असंतोषाच्या गोष्टी उभयतांनीं आपापल्या मित्रमैत्रिणींच्या कानांत कुजबुजल्या तर त्यांत 'पति पशुवृत्ती आहे' आणि 'पत्नी आंबलेली आहे' अशी कुरकुर हटकून निघते. स्त्रियांचें मन त्यांच्या जातीय प्रतिनिधींच्या लेखणीच्या छायेंत ललितवाङ्मयाच्या अंगणांत मोकळें वावरूं लागलें तेव्हांपासून त्यांचें नेहमींचें कुरकुरीचें म्हणणेंच असतें, कीं वैषयिक बाबतींत पुरुष निव्वळ पशुवृत्ती असतात. बऱ्याचश्या असंतुष्ट गृहस्थाश्रमी लोकांच्या तोंडून पत्नी विषयपराङ्मुख असल्याचें नेहमीं निघतें. असा वैषयिक बाबतींतील असंतोष थोड्याफार अंशानें बऱ्याचशा जोडप्यांतून दिसून येतो, आणि त्या असंतोषाची सुरवातहि अगदीं पहिल्या भेटीपासूनच होत असते. त्यांची तक्रार सर्वथैव खरी आहे. मात्र दोष दुसऱ्याचा नसून ज्याचा त्याचाच असतो. स्त्रीपुरुषांची शरीररचना, त्यांची विषयसेवनाची क्षमता, पात्रता आणि परिपूर्तता यांविषयीं शरीरशास्त्राचे अगदीं शास्त्रीय असे सिद्धान्त कांहीं कांहीं आहेतच. विषयसेवनाची बाबत उपजत बुद्धीवर सोंपवून चालावयाचें नाहीं. इतर प्राणी आणि मनुष्य यांच्यांत बुद्धीच्या देणगीनें भलताच फरक करून ठेवलेला आहे. पशुकोटींत आपोआप होणाऱ्या व्यापारांचें बुद्धीच्या योगानें निरोधन व उत्तेजन करतां येतें. तेव्हां केवळ स्वयंस्फूर्तीच्या अगर उपजत बुद्धीच्या करामतीनें विषयसेवनाचें साफल्य आपल्या पदरीं पडेल असें मानणें चुकीचें होणार आहे.

जुने शास्त्रकार आणि आजचे सनातनी, स्त्रियांना पुरुषांच्या आठपट काम असतो असें म्हणोत बिचारे! परंतु शास्त्रीय दृष्ट्या स्त्रीपुरुषांच्या ठिकाणीं विषयेच्छा समसमान असते. विषयसेवनाच्या प्रवृत्तींचा विचार केला तर पुरुषांच्या ठिकाणीं ती लवकर जागृत होऊन तितक्याच लवकर विराम पावते. त्याच्या उलट, स्त्रियांची वैषयिक आतुरता जागृत होण्यास

त्या मानानें अधिक अवधि लागतो व ती शांत होण्याससुद्धां जास्त कालावधि लागतो. विषयप्रवृत्तीच्या अगदीं उघड उघड शारीरिक प्रतिक्रिया घेतल्या तरी पुरुषांच्या ठिकाणीं त्या एकाएकीं प्रकट झाल्या तर स्त्रियांच्या ठिकाणीं त्या उत्पन्न व्हावयास बराच वेळ लागतो. हा फरक पडतो शरीररचनेमुळें आणि विषयसेवनतृप्तीच्या नैसर्गिक गुंतागुंतीच्या योजनेमुळें; आणि हीच बाबत वैषयिक असंतोषाच्या मुळाशीं असते. विषयप्रवृत्ति उभयतांच्या ठिकाणीं एका काळीं उत्पन्न होणें आणि तिची तृप्ति दोघांनींहि तितक्याच आतुरतेनें विवक्षित क्षणीं साधणें हीच विषयसुखाची परमोच्च कोटी होय. निसर्गतः स्त्रीपुरुषांच्या ठिकाणीं कांहीं कालाच्या अंतरानें पुढेंमागें ह्या प्रवृत्ति जागृत होतात हें खरें, पण विषयसुखाचें मुख्य साधन लक्षांत घेऊन उभयतांनीं सिद्धतेकडे अधिक लक्ष पुरविलें तर त्यांना निराश होण्याचें कांहींच कारण राहणार नाहीं. स्त्रीच्या प्रवृत्ति उशिरां जागृत होतात म्हणून तिला आपला पति अधीर आणि पशुवृत्ती वाटतो. त्या पतीलाहि स्त्री आंबलेली आणि विषयपराङ्मुख वाटते. स्त्रियांच्या ठिकाणीं ती प्रवृत्ति जागृत व्हावी ह्यासाठीं पुरुषानें अनेक प्रकारें उत्तेजन देत राहिलें पाहिजे. एतद्विषयक ग्रंथांतून शृंगारसाधनादि जे निरनिराळे प्रकार वर्णिलेले असतात, त्यांचा उद्देशहि ही प्रवृत्ति समसमान बलानें उभयतांच्या ठिकाणीं जागृत व्हावी आणि नंतर उभयतांनीं विषयसेवन करावें हा असतो. पतीनें ज्याप्रमाणें पत्नीच्या मनाला, भावनांना, शारीरिक आकांक्षांना निरानिराळ्या प्रकारें उत्तेजित करावयाचें असतें, त्याचप्रमाणें पत्नीनेंहि तितक्याच आस्थेनें आणि निःसंकोचानें पतीच्या त्या प्रयत्नांचें अर्ध्या वाटेवर येऊन स्वागत करावयाचें असतें. जीं पतिपत्नी उभयतां या बाबतींत चतुर असतात त्यांच्या पदरीं सुखाचें माप पुरेपूर पडतें.

या वैषयिक आयुष्याचा आरंभ पहिल्या भेटींतच होत असतो आणि ह्याच भेटींतील पहिल्यावहिल्या अनुभवांवरून एकमेकांबद्दल आदर-तिरस्कार, प्रेम-द्वेष, आपलेपणा-भीति हीं उत्पन्न होत असतात. केवळ हा विषयसेवनाचा शास्त्रसिद्धान्त डोळ्यांआड केल्यामुळें प्रेमाच्या ऐवजीं द्वेष, आदराच्या बदल्यांत तिरस्कार, आपलेपणाच्या ठिकाणीं भीति ह्या भावना

स्त्रीच्या ठिकाणीं पहिल्या भेटींतच उत्पन्न होतात. असा हा भावनांचा विपर्यास अगर विषयसेवनाची विकृत प्रतिक्रिया उभयतांच्या ठिकाणीं एकदां का उत्पन्न झाली, कीं विषयसेवन कष्टमय वाटूं लागतें, पुरुष दिवसेंदिवस जास्तच बेफिकीर पशुवृत्ति धारण करतो आणि स्त्री जास्तजास्तच विषयपराङ्मुख होत जाते. या दृष्टीनें उभयतांनीं पहिल्या भेटीसाठीं जय्यत तयारी ठेवावी हें उचित. या विषयावरील शास्त्रीय सिद्धान्त एतद्विषयक वैद्यक पुस्तकांत नमूद केलेले सांपडतील आणि उभयतां स्त्रीपुरुषांनीं त्या विषयांचें संपूर्ण ज्ञान करून घेणें जरूर आहे.

अश्लीलतेबद्दल आपण पुष्कळ आरडाओरड करतों आणि त्या हाकाटीनें अश्लीलतेची पांगापांग होण्याऐवजीं आजवर भीतीनें लपूनछपून बसलेलीं तिचीं सर्व अंगोपांगें वाङ्मयाच्या राजरस्त्यावरून धिटाईनें वावरूं लागलीं आहेत. खरें पाहतां लैंगिक बाबतीसंबंधानें लोकांच्यांत अधिक शास्त्रीय माहितीचा प्रसार झाला पाहिजे; पण तीहि सोंवळी बाबत आपण कामुक आणि विकृत भावना जागृत करणाऱ्या अश्लीलतेच्या पंक्तीला नेऊन बसवितों. आहारशास्त्र जितक्या कसोशीनें अभ्यासिलें जातें तितक्याच कसोशीनें विहारशास्त्र अभ्यासिलें पाहिजे. आहारांत काय अगर विहारांत काय, अज्ञान सारखेंच घातुक. हीं दोन्ही शास्त्रें सारख्या महत्त्वाचीं समजून त्यांचें संपूर्ण ज्ञान स्त्रीपुरुषांना असलें पाहिजे. मानवी शरीररचना, त्यातील जातीय भेद, विषयसेवनाची क्रिया-प्रतिक्रिया, त्यांची शरीररचनेकडून होणारी सिद्धता, प्रजोत्पादन, लैंगिक आरोग्य इत्यादि सर्व बाबतींचा दरेक विवाहेच्छु स्त्रीपुरुषांनीं बारकाईनें अभ्यास केलेला असावा; तरच त्यांना विषयसेवनाचें यथायोग्य सौख्य भोगतां येईल.

पहिली भेट ही अवघडच. पहिली भेट घेण्यास सज्ज झालेल्या स्त्रीपुरुषांस किती पूर्वतयारी करावी लागते, हें सर्व सूत्ररूपानें व तेंहि अत्यंत ठळक बाबतींत वर नमूद केलें आहे. त्यावरून तरी ही पहिली भेट किती महत्त्वाची आणि ती घेणें किती अवघड असतें याची कल्पना येईल. पतिपत्नी उभयतां अगदीं लहान वयाचीं असलीं तर निसर्गतः त्यांच्यांत संकोच कमी, संशय नसतो, चुकीची आठवण राहत नाहीं, जबरदस्त विषयाकांक्षा नसते, असंतोषहि नसतो अशी त्यांची स्थिति असते. पूर्वीच्या

पिढीत पहिल्या भेटीचा प्रश्न एवढा अवघड वाटत नसे. उलट त्या उभयतांच्या हातून होणाऱ्या पोरकट चुकांचें वडील मंडळींकडून जाहीर रीतीनें कौतुक करण्याचा तो एक प्रसंग असे; आणि तो एका संस्काराच्या नांवाखालीं राजरोसपणें साजरा करण्यांत येत असे. त्या वेळचीं बालपतिपत्नी हीं संस्कारानिमित्त जमलेल्या कुटुंबीयांच्या आनंदांत सामील होऊन स्वतः आनंदी आणि तितकींच मुग्ध असत. घरांत एक आनंदाचें वातावरण उत्पन्न झालें असतांना त्या आनंदांत तीं दोघें एकमेकांस भेटत. दोघांचाहि बौद्धिक विकास माफक, अशा स्थितींत तीं एकमेकांस अगदीं दोन अनोळखी लहान मुलाप्रमाणें भेटत; क्षणार्धांत त्यांची गट्टी जमे. दोघेंहि चुक्यांतून शिकत–शिकवीत असत. आजचे प्रौढ स्त्रीपुरुष तितक्याच प्रौढ आकांक्षाना पोटाशीं धरून एकमेकांस भेटण्यासाठीं मनानें व शरिरानें आतुर झालेले असतात. या आकाक्षा बरोबर सफळ होतात व होतील कीं नाहीं याची छाननी प्रत्येक बारीकसारीक बाबतीवरून त्यांचें मन सारखें करीत असतें म्हणून उभयतावर स्वतःच्या आकांक्षा पुऱ्या करून घ्यावयाची आणि दुसऱ्याच्या आकांक्षा तृप्त करावयाची अशी दुहेरी जबाबदारी पडत असते आणि ह्यामुळेंच पहिली भेट ही आज अवघड बाब होऊन बसली आहे.

आणि पहिल्या भेटीवरून झालेला ग्रह हाच कायमचा म्हणून समजावा. माणूस कितीहि विवेकी असलें तरी विषयप्रवृत्तीचा गाफीलपणा त्याचें खरेंखुरें स्वरूप तेव्हांच दुसऱ्यापुढें उघडें पाडतो. तथापि वर नमूद केलेल्या बाबती जर प्रत्येकानें आपण होऊन दुसऱ्यांशीं साहचर्य आणि सहकार्य करण्याच्या उदात्त आणि व्यावहारिक हेतूनें ध्यानांत ठेवून अंमलांत आणल्या, तर ही पहिली भेट अवघड असली तरी सुखी जीवनाचा मंगल उषःकाल म्हणून अखेर आल्हादकारकच वाटेल. संसारसुखाचा संधिकालहि हाच. एकमेकांशीं संधि होण्याची संधि एकमेकानें अत्यंत आतुरतेनें साधून घेतली पाहिजे.

# ४

# वैवाहिक जीवनांतील जिवंत झरा

लग्नसंस्थेवर जिकडूनतिकडून आघात होत आहेत आणि लैंगिक गोष्टींची चर्चा सर्वत्र उघड होत आहे. हीं कालमानाचीं लक्षणें गणलीं तरी ते असंतुष्ट वैवाहिक जीवनाचे निघणारे सूर आहेत. वैवाहिक जीवन जर आदर्श व सुखमय असतें, तर लग्नसंस्थेवर हल्ला चढविणारे सर्वजण अविवाहितच काय ते आढळले असते आणि अविवाहितांनींहि त्या संस्थेवर प्रहार करण्याऐवजीं त्यांत दाखल होण्याचीच हुल्लड माजविली असती. वैवाहिक जीवनांतील निराशा अनंत आणि अनेकविध असलेल्या आढळून येतात. कोणी बायकोच्या बारीकसारीक वाईट खोड्यांची यादी वाचील, तर कोणी एखादी स्त्री आपल्या नवऱ्याच्या क्लबांत कालक्रमणा करण्याच्या संवयीबद्दलची तक्रार करील.

परंतु अशा या बारीकसारीक तक्रारींच्या सर्व बाबती घेतल्या, तरी तेवढ्यांनींच त्यांचें वैवाहिक जीवन डागळलेलें असतें, असेंच कांहीं नाहीं. बायको स्वच्छतेनें आणि अधिक टापटीपीनें वागूं लागली, पुरुष कचेरीशिवायचा सर्व वेळ घरांत काढूं लागला, म्हणजे एकदम त्यांची कुरकुर बंद होईल आणि संसारसुखाचें रामराज्य त्यांच्या घरांत नांदूं लागेल असें थोडेंच असतें ! संतापी मुलांप्रमाणें मन हेंहि एकदां बिथरलें, खट्टू झालें, म्हणजे अगदीं वाऱ्याशीं सुद्धां भांडूं लागतें, अगदीं मनासारख्या घडून येणाऱ्या गोष्टींतहि चिडखोर तक्रारी उत्पन्न करतें. खरें म्हटलें तर दुःखी संसाराचीं कारणें फार दूरवर गेलेलीं असतात, तीं जाणण्याची आणि जाणल्यावर कबूल करण्याची तयारी फारच थोड्यांची असते. मनांतलें

बोलून दाखवितां येत नाहीं, वेळीं असंतोषाचें खरें कारणहि स्पष्टपणें समजत नाहीं, अशा वेळीं ज्या बारीकसारीक बाबती दिसतील, त्याच तीं उभयतां उगाळीत बसतात. लग्नाबद्दलची आपली कल्पना बदलली आहे. त्यांतून मिळणाऱ्या सुखाच्या आकांक्षा निराळ्याच आणि भलत्याच उंचीच्या ठरून गेल्या आहेत; परंतु नवल असें, कीं त्या आकांक्षा कोणत्या व त्या साध्य होण्यासाठीं उभयतां स्त्रीपुरुषांनीं कसें वागलें पाहिजे, हें आपण नुसतें समजूनहि घेत नाहीं.

लग्नांतील कौटुंबिक कल्पना जवळ जवळ नाहींशी होत चालली आहे. पूर्वी मुलगी पसंत करीत ती सासरच्या कुटुंबांतील एक घटक म्हणून आणि इतर मंडळींशीं, त्यांच्या आचारविचारांशीं व चालीरीतींशीं, जी समरस होऊं शकेल अशाच मुलींची निवड होत असे. नवऱ्या मुलाला वधू-पसंतीच्या बाबतींत मत नसण्याचें कारणहि हीच लग्नाच्या बुडाशीं असलेली कौटुंबिक कल्पना होय. जी कुटुंबांतील इतरांना पसंत, ती नवऱ्यालाहि पसंत असलीच पाहिजे. 'दहा जणांच्या घरांत दिली, नुसत्या चित्रावती खाल्यान् तरी पोरीचं पोट भरेल' ही मुलीच्या आईबापांची विनयाच्या बासनांत गुंडाळलेली महत्त्वाकांक्षा या कल्पनेचाच पुरस्कार करणारी होती. नवरा सुद्धां कुटुंबांतील एक सर्वसाधारण घटक; त्याला स्वतंत्र अस्तित्व नव्हतें, स्वतंत्र मतहि नसे. पूर्वीच्या काळीं वधूपसंतीचा खेळखंडोबा येवढा होत नव्हता, कुलशीलाचाच प्रामुख्यानें विचार होत असे, लग्नव्यवहारास बाजारी स्वरूप प्राप्त झालें नव्हतें, या ज्या जुन्या पण अभिमानाच्या गोष्टी त्या तंतोतंत खऱ्या आहेत. मात्र त्यांचें सर्व श्रेय लग्नाच्या कौटुंबिक स्वरूपास द्यावें लागतें. नवरा मुलगा पसंत करावयाचा, तोसुद्धां याच दृष्टीनें. आपण होऊन जो स्वतःच्या कुटुंबीयांस धरून राहील, कौटुंबिक जबाबदाऱ्यांना खांदा देईल, आचारविचारादींनीं इतरांशीं संग्रहात्मक वृत्ति ठेवील, तरच तो वरपसंतीच्या कसोटीस उतरावयाचा. कुटुंबाव्यतिरिक्त स्वतंत्रपणें मुलांमुलींचें सुख कितपत साधतें याचा विचार त्या काळीं गौण समजला जात असे.

कुटुंबसंस्थेंत भरती करण्याचे दरवाजे दोन. एक लग्नाच्या निमित्तानें दुसऱ्या कुटुंबांतल्या स्त्रिया आणण्याचा व दुसरा नैसर्गिक प्रजोत्पादनाचा.

आणि कुटुंबसंस्थेच्या टिकाऊपणासाठीं जन्माच्या अगर लग्नाच्या निमित्तानें कुटुंबांत शिरलेले जीव मूळच्या जीवघटकांशीं एकजीव होऊन जाणें अत्यंत जरूर होतें. याच एका गोष्टीवर विशेष भार दिला गेल्यानें त्याच दृष्टीनें लग्नसंस्थेचें नियंत्रण होत असलें आणि वधूवरपसंती होत असली तर नवल नव्हतें. दुसरें असें, कीं कुटुंबविस्तार हा लग्नांतला एक प्रधान आणि राजमान्य हेतूहि त्यांत समाविष्ट होता. नवीन येणारी मुलगी इतर घटकांशीं समरस होईल अशी पाहिजेच पाहिजे, पण ती प्रजोत्पादनक्षम अशीहि असली पाहिजे असा कटाक्ष असे. म्हणूनच वधूवरांना भावंडें असतील तरच त्यांना पसंत करावें असा स्मृतिकालीं व तदनंतर अगदीं परवांपर्यंत पसंतीचा एक अवश्य नियम होता. या कौटुंबिक नियंत्रणामुळें स्त्री-पुरुषांच्या आकांक्षाहि कौटुंबिक स्वरुपाच्याच असत. सर्वांशीं मिळूनमिसळून वागणारी, सुदृढ, पुष्कळ मुलें होणारी, कुटुंबाचा विस्तार आणि उस्तवारी करणारी स्त्री असली म्हणजे तिचा नवरा तिच्या सांस्कृतिक दर्जाबद्दल वा शारीरिक सौंदर्याबद्दल फारशी कुरकुर करीत नसे. इतरांची मर्जी संपादन करितां आली आणि चार मुलेंबाळें झालीं म्हणजे ती बायकोहि नवऱ्याच्या कुरकुरीची पर्वा करीत नसे.

बायका न आवडणें, आणि पुरुष बाहेरख्याली असणें, हे प्रकार त्या वेळींहि कांहीं कमी नव्हते. पण बायको आवडत नाहीं म्हणून तिला कुटुंबांतून घालवून देण्याची त्याची छाती होत नसे व चार मुलेंबाळें होऊन नावडत्या बायकांचेहि लौकिकदृष्टया यथास्थित संसार होत असत. बाहेरख्याली नवऱ्याशीं भांडण्याचें तिला धैर्य नसे व कारणहि नसे, आणि ती आपल्या सर्व परिवारांत येवढी गुरफटलेली असे, कीं पतीच्या असंतोषाची तिला कल्पना नसे आणि त्याची झळ तर तिला कधींच लागत नसे. वैवाहिक जीवनांतील वैषयिक बाजूची एक आबाळ तरी होत असे, अगर धर्माचरणाच्या खोट्या कल्पनांनीं तिची गळचेपी तरी होत असे.

आजचें वैवाहिक जीवन घेतलें तर त्यांतील कौटुंबिक कल्पनेची हकालपट्टी होऊन वैयक्तिक सुखलालसेच्या आकांक्षेनें त्याचें सर्व क्षेत्र व्यापून टाकलेलें दिसेल. वधूपसंतींत वराच्या मतासच प्राधान्य मिळणें हें त्या बदलणाऱ्या परिस्थितीचें लक्षण आहे. लग्नाचें कौटुंबिक गबाळ

स्वरूप जाऊन त्याला वैयक्तिक सुखलालसेचा नूर चढूं लागल्याचें तें चिन्ह आहे आणि वधूलाहि वरपसंतींत मत असावें या वाढत्या सर्वसंमत सवलतीनें वैयक्तिक सुखलालसेचें शिखरच गांठलें म्हणावयाचें ! प्रजोत्पादन व कुटुंबविस्तार हे लग्नाचे उद्देश वैयक्तिक सुखलालसेच्या दौडीपुढें फिके पडले. विषयसुखाची तृप्ति आणि अखंड स्त्रीपुरुषमैत्रीची प्राप्ति, हे दोन हेतुच शिल्लक राहिले आहेत. नैसर्गिक रीत्या होणाऱ्या प्रजोत्पादनावरहि त्यामुळें नियंत्रण घालण्याचे बेत संसाराचा उंबरठा पहिल्यानें ओलाडतांनाच जोडपीं नक्की करतात.

वैयक्तिक सुखेच्छेचा अतिरेक हाहि कौटुंबिक स्वाथ्याच्या कल्पनेच्या अतिरेकाइतकाच समाजधारणेच्या दृष्टीनें घातुक आहे. पण येवढें खरें, कीं लग्नसंस्थेला वैयक्तिक सुखलालसेच्या वावटळीनें घेरलें आहे आणि विचाराचे प्रवाह बदलेतोंपर्यंत या वैयक्तिक सुखतत्त्वांची मोजदाद घेतली पाहिजे. आपले आचारविचार त्यांच्या अनुरोधानें ठरविले पाहिजेत. त्या विचारप्रवाहांची दिशा आणि गति लक्षात न घेता, आपण जुन्या, असह्य वाटणाऱ्या आणि मनास न पटणाऱ्या बाबतींचाच पुरस्कार करीत राहिलों ! म्हणूनच वैवाहिक दुःखांचे कढ घरोघरीं येऊं लागले आहेत.

विषयोपभोग राजरोसपणे आणि आतृप्त सेवन करतां यावेत हा तर लग्नसंस्थेचा एक प्रधान हेतु आहे. प्रजोत्पादन हा त्या हेतूच्या सिद्धींतून अनपेक्षित आणि बऱ्याच वेळीं अनिच्छित वा इच्छेविरुद्ध उत्पन्न होणारा परिणाम आहे. केवळ प्रजोत्पादनासाठीं लग्नाची बेडी पूर्वी कुणीं घालून घेतली नसेल, निदान आज तरी कोणी बांधून घेणार नाहीं. विषयतृप्तीच्या सिद्ध्यर्थ आणि सामाजिक जीवनाच्या संरक्षणार्थ कायमचे असे एकाकी स्त्रीपुरुषसंबंध समाजानें रूढ केले, धर्मानें मान्य केले आणि हे संबंध म्हणजेच आजची लग्नसंस्था. लग्न लग्न म्हणचे तरी काय ! नैसर्गिक जरूरीचा आणि सामाजिक ध्येयाचा मेळ घालणारी स्त्रीपुरुषसंबंधाची घटना म्हणजे लग्नसंस्था ! विषयवासना ही निसर्गाची, चांगली म्हणा वाईट म्हणा, पण उपजत मिळालेली आणि कधींहि न सुटणारी एक देणगी आहे. ती भूक शमविणें ही शारीरीक स्वास्थ्यास एक आवश्यक परिस्थिति आहे. तिच्यांतून वंशवृद्धीचें जरूरीचें कार्य आपोआप पार पडावें अशी

सृष्टिक्रमाची योजना आहे.

या सर्व कल्पनांची गोळाबेरीज 'नैसर्गिक जरूरी' या सोंवळ्या शब्दांत केली गेली आहे. तेव्हां 'नैसर्गिक जरूरी'चा विचार सामाजिक ध्येयांच्या बरोबरीनें झाला, तरच त्या दोघांचा मेळ चांगला बसेल; लग्नसंस्थेंत दोन्ही उद्देशांचें साफल्य होईल. परंतु आपण सामाजिक ध्येयाच्याच एका डोळ्यानें लग्नसंस्थेकडे पाहात आणि नैसर्गिक जरूरीला गौणत्व देत आलों आहोंत. या आपल्या एकांगी आणि विकृत मनोरचनेमुळें या नैसर्गिक जरूरीचा सर्व वाजवी आणि प्रामाणिक व्यापारहि आपणांस पापमय वाटूं लागला आहे. याला आपली शिकवणच जबाबदार आहे. धर्माचें अशक्य सोंवळें ध्येय आणि ढोंगी आचारांचें वर्चस्व, यांनीं आजवर व्यक्तिमात्रांच्या विषयवासनांना दडपून टाकण्याचा जो पद्धतशीर निष्ठुर प्रयत्न चालविला होता त्याचमुळें लग्नसंस्थेच्या हेतूंतून नेमका नैसर्गिक विषयवासनेच्या तृप्तीचा हेतु तेवढाच वगळून प्रजोत्पादन, वंशवृद्धि, कुटुंबसंग्रह आणि मोक्ष असे निरनिराळे लग्नसंस्थेचे उद्देश समाजापुढें मांडण्यांत आले. विषयवासना ही पापमय वाटूं लागली ! तिची जोपासना करणें, तृप्ति करणें, हे दुराचार समजले जाऊं लागले.

मोठ्या कुटुंबांत तरुण स्त्रीपुरुषांना मनमोकळेपणानें वावरतां वागतां येणें शक्य नव्हतें, तेव्हा वडील मंडळींची मर्यादा ठेवण्याबद्दल बरेच कडक नियम अंमलांत आले. तिथि, वार, नक्षत्र, योग यांच्या चाळणींतून शक्य तितके कमी दिवस स्त्रीपुरुषांच्या भेटीसाठीं शिल्लक राहतील अशी आचाराची शिस्त निर्माण झाली! एकंदरींत आपण वैषयिक बाबतींचा येवढा कोंडमारा आजवर करीत आलों आहोंत, कीं ती बाब लग्नसंस्थेची आवश्यक घटना आहे ही साधी गोष्टहि आतां सिद्ध करण्याची जरूरी उत्पन्न झाली आहे. लग्नसंस्थेकडे अशा बेफिकिरीनें आपण पाहतों, कीं विषयवासनेची भूक तिच्या आडोशाला शमविण्याची आकांक्षा धरणेंहि मोठें पाप होय असें आपणांस वाटतें. या आपल्या मनोवृत्तीमुळेंच लग्नसंस्थेकडे आपण निराशेनें पाहतों. इतकेंच काय, तिच्या बिननिवाऱ्याच्या फाटक्या छपराखालीं कुडकुडत पडलेल्या दुःखी जीवांच्या तोंडावाटे निघणारे निराशेचे सुस्कारेहि आपण मुकाट्यानें ऐकून घेतों.

नपुंसकालाहि लग्नास बंदी नाहीं, त्याच्याशीं झालेलें लग्न रद्द होऊं शकत नाहीं, स्त्रीनें खुशाल तळमळत जन्म काढावा, असें आजचा कोर्ट-कचेऱ्यांतून अंमलात असणारा हिंदु कायदा म्हणतो; आणि हाहि न्यायच आहे असा हट्ट धरणारे आहेतच. लग्नापासून विषयसुख मिळविण्याची आकांक्षा धरणें ही बाबच आम्ही मान्य करीत नाहीं.

तरुण स्त्रीपुरुषांना विषयायेवढी जालीम भूक कशाचीच नसते. पण वडिलांची शिस्त नि भोंवतालच्या जगाची मर्यादा पाळतां पाळतां लपतछपत एकत्र भेटणारीं विवाहित जोडपींहि फाजील लज्जा, पापाची भीति, विषयाचें गाढ अज्ञान, यांनीं भेदरलेलींच असतात. सर्व व्यवहार पापमय आहेत, निदान चोरूनच केले पाहिजेत, अशा भावनेनें गांगरलेलें जोडपें दुसऱ्याच्या समोर उगीच वरडोळा करून एकमेकांकडे पाहण्याचा धीरसुद्धां करीत नाहीं. मग त्यांच्यांत वैषयिक आकर्षणाची देवघेव होण्याची गोष्टच कशाला!

तहानेनें व्याकुळ झालेल्याला उकळतें पाणी प्यायला द्यावें म्हणजे त्याचा प्राणांतिक हिरमोड होत असतो. प्रौढत्वामुळें विषयसेवनाबद्दल अगदीं आतुर झालेल्या वधूवरांचा वैषयिक बाबतींत जर का एकदां हिरमोड झाला तर तोहि तितकाच असह्य होतो. उकळतें पाणी थंड होईतोंवर तान्हे-लेल्याला वाट पाहतां येते, पण पहिल्यापासूनच मनें विटलेलीं आंबट जोडपीं एक तर पुन्हा मनमोकळेपणानें आणि अन्योन्यसहानुभूतीनें एकत्र येतच नाहींत; आणि आलींच तरी हीन पाशवी वृत्तीच्या शमनापुरतींच आणि तेवढ्यासाठींच येतील. 'बायकोंत रोमान्स नाहीं', 'नवऱ्यांत काडीइतकीहि माणुसकी नाहीं', असे उद्‌गार तरुण स्त्रीपुरुषांच्या तोंडून बाहेर पडतात, त्यांत देखील वैषयिक असंतोषच ध्वनित होत असतो. वधूची विषय-पराङ्‌मुखता, वराची बेफिकिर पशुवृत्ति आणि विषयसेवनाबद्दलचें दोघां-चेंहि सारखेंच अज्ञान, हींच त्या उद्गारांच्या बुडाशीं असतात. अशा अ-संतुष्ट पतिपत्नींचे संसार होतील आणि वर वर पाहणाऱ्या जगाच्या दृष्टीनें ते संसार व तीं दोघेंजण आदर्शवत्‌हि दिसतील, नाहीं असें नाहीं; परंतु या असंतोषाचा उभयतांच्या आयुष्यावर कायमचा आणि अनिष्ट परिणाम होत असतो इकडे कोणाचें लक्ष जात नाहीं.

एकमेकांबद्दल आकर्षण वाटण्याऐवजीं तिटकारा वाढत जावा, विषय-

सेवन हें एक नाइलाजाचें व वेळीं जुलमाचें संसारकार्य वाटावें, स्त्रीपुरुषांनीं उदास राहावें, स्त्रीनें देवधर्म, मुलेंबाळें, शेजारीपाजारी, गृहकृत्य यांत चूर असावें आणि पुरुषानें द्रव्यार्जनाच्या व्यवसायांत, आपल्या स्नेह्यांसोबत्यांत व क्लबांत दंग असावें, हा बाहेरून यशस्वी दिसणारा संसार उभयतांना कितपत आकर्षक आणि समाधानाचा वाटत असेल बरें ! आणि एकसारखी कळवळून लागून राहिलेली भूक कुठें तृप्त होईल या आशेनें जर तीं उभयतां अगर त्यांच्यापैकीं एक भोंवतालीं चोरून पाहूं लागलें व कोणी-तरी दुसरी अगर कुणीतरी दुसरा अशीं त्या निष्प्रेम संसारांत डोकावूं लागलीं नाहींत तरच नवल ! वैषयिक असंतोष बोलून दाखवितां येत नाहीं आणि ज्या इतर गोष्टी बेबनावाच्या अगर नापसंतीच्या म्हणून बोलून दाखवितां येतात, त्यांचाच पाढा स्त्रीपुरुष इतरांच्याजवळ वाचतात, म्हणून त्यांचीं दुःखें बारीकसारीक दोषांमुळेंच उत्पन्न झालीं आहेत असें मानणें बरोबर होणार नाहीं.

विषसेवनाची तृप्ति होऊन आसक्ति उत्पन्न झाली, म्हणजे दुसऱ्याचे शंभर अपराधहि शून्यवत् वाटूं लागतात. पण याच्या उलट तृप्ति नसेल तर तिटकारा उत्पन्न होतो आणि पोटांत न मावणारा संताप ओकून टाकण्यासाठीं तिटकारा सारखी वाट पाहात असतां कुसळाचें मुसळ नाहीं झालें तरच नवल ! नवऱ्याचा रागीट चिरचिऱ्या स्वभाव, बायकोची कुरकुर आणि आदळआपट, हीं तरी त्या असंतोषाचींच बाह्य लक्षणें नव्हेत काय ? विषयवासना ही नरभक्षक मानवांप्रमाणें असते. तृप्ति देणाऱ्या व्यक्तीला ती डोक्यावर घेऊन नाचेल, तर अतृप्ति होतांच त्याच व्यक्तीला फाडून खाऊन टाकण्यास ती कमी करणार नाहीं. वासनांची तृप्ति ज्यांच्यांत साधली आहे, तीं जोडपीं परस्परांवर अत्यंत आसक्त असतात, परंतु ज्यांच्यांत वासनांची उपासमार झालेली आहे, अशीं जोडपीं मनांतून एकमेकांचा इतका द्वेष करीत राहतात, कीं त्यांच्यांत चालढकल आणि सहानुभूति काडीइतकीहि उरलेली नसते. स्वभावांतील विसंगतता, बऱ्यावाईट खोड्या, शारीरिक व्यंगें, आर्थिक आणि सामाजिक हीन परिस्थिति, यादि गोष्टी वैवा-हिक जीवनांत बेबनावाचें विष कालवतात; नाहीं असें नाहीं. परंतु त्या सर्वांना मागें टाकणारी जर कोणती जबरदस्त आपत्ति असेल तर ती वैषयिक

निराशा होय.

विहीर, तलाव, नदी अगर कोणतेंहि जलाशय घ्या; त्यांत जिवंत पाण्याचे झरे एकसारखे ताजें पाणी आणून सोडीत असतील तोंवरच त्यांतील पाणी स्वच्छ आणि निरोगी राहतें. सभोंवारच्या कांठाकांठावरून प्रतिक्षणीं आंत ओतली जाणारी घाण, तळाशीं घट्ट बसलेला गाळ आणि त्यांतून उगवणाऱ्या विषारी वनस्पति, यांपासून कोणतें जलाशय अलिप्त असतें ? पण केवळ जिवंत झऱ्यांच्या जोरावरच त्यांतलें तें पाणी न नासतां स्वच्छ राहूं शकतें. कोणता मनुष्यप्राणी आपत्तीमधून सुटला आहे वा निराशांपासून अलिप्त आहे ? माणसाच्या आयुष्यांत प्रतिक्षणीं प्रत्येक निरनिराळ्या मर्मस्थानीं परिस्थितीचे घण पडत आहेत. आणि या आपत्ति वैवाहिक जीवनालाहि जाऊन भिडणार नाहींत असें थोडेंच आहे ! उभयतां पतिपत्नींतील गैरसमजाचीच नव्हे, तर सभोंवारच्या जगाच्या नीच उपद्व्यापांची घाण वैवाहिक जीवनांत एकसारखी ओतली जात आहे. एकमेकांबद्दल वाटणाऱ्या अविश्वासांनीं मनाचा तळ व्यापला जाऊन त्यांतून एकमेकांविषयींचा तिटकारा सारखा उगवत असतो. पण या सर्व आपत्तींचा नायनाट करण्याचें सामर्थ्य वैवाहिक जीवनांतील जिवंत झऱ्यासच असतें. त्या झऱ्यानें कितीतरी गढूळ झालेलीं मनें स्वच्छ केलीं आहेत ! कितीतरी गैरसमज सहजासहजीं घालविले आहेत ! मानवासाठीं शेवटचा एक आराम व आल्हाद वैवाहिक जीवनांत या झऱ्यानें उत्पन्न केला आहे. विषयवासनेची अवीट तृप्ति हाच तो वैवाहिक जीवनाचा जिवंत झरा. त्याची तहान प्राणिमात्राच्या नसानसांतून वाहत असते; त्याच्या पराक्रमी आयुष्यविभागाला व्यापून राहिलेली असते; आणि या 'नैसर्गिक जरुरी' वर लग्नसंस्थेची उभारणी झालेली असतां तिची जोपासना जेवढी काळजीपूर्वक करावी तेवढी थोडीच !

५

# वैवाहिक सुखाचें अधिष्ठान

वैवाहिक जीवनाचें यशापयश पतिपत्नींतील वैषयिक आकर्षण आणि विषयतृप्ति यांच्यावर अवलंबून असतें. सामाजिक आणि आर्थिक सुस्थितींत लोळणारीं जोडपींहि वैषयिक बाबतींत जर खट्टू झालेलीं असलीं तर तीं आंतून निखालस दुःखीच असतात. सामाजिक प्रतिष्ठेच्या कडेकोट बंदोबस्तांतून डोळा चुकवून थोडीशी स्वैराचाराची बाहेरची मोकळी हवा खाण्याचें धैर्य त्यांना होत नाहीं येवढेंच; नाहींतर अशा शेंकडा नव्याण्णव निराश स्त्रीपुरुषांना त्या वैषयिक कोंडमाऱ्यांतून बाहेर पडण्याची आंतून अनिवार इच्छा असते. कृश आणि रोगट पुरुषाची सुंदर आणि सशक्त बायको ऐश्वर्याच्या ऐषारामांत लोळत असूनहि सर्वदा कष्टीच असते; बाहेर बोलून न दाखवितां येण्यासारखे वैषयिक निराशेचे प्राणांतिक चटके तिला एकसारखे जे सहन करावे लागतात त्यांच्या वेदना तिच्या तिलाच माहीत. त्याच्या उलट जन्मरोगी आणि निःसत्त्व स्त्रीचा ताकदवान्, आनंदी नवरा पत्नीच्या आजाराच्या काळजीपेक्षां वैषयिक निराशेनेंच मनांतून अधिक जिकिरीस आलेला असतो. विजोडपीं कष्टी दिसतात, आपापसांत धुसफुस करीत असतात, याचें मुख्य कारण जर शोधूं गेलें तर शेंकडा पाउणशें उदाहरणांत हीच वैषयिक निराशा सांपडेल.

असे निराश स्त्रीपुरुष नेहमीं आदर्श शेजारीपाजारी अगर स्नेहीसोबती शोधीत असतात. लग्नसंबंधाबाहेर व्यवहार करणें म्हणजे पाप मानणारी भेकड मंडळी अनुरूप माणसांशीं नुसत्या कोरड्या गप्पागोष्टी मारूनच वैषयिक तहान भागवितील. त्यांच्या त्या स्नेहांत वरकरणीं अगदीं साधा-

भोळा भाव दिसेल, संबंधांत सरळपणाहि ते जन्मभर ठेवतील; पण त्यांच्या आसक्त मनाचें जर बारकाईनें पृथक्करण केलें तर त्या सोंवळ्या स्नेहसंबंधाचा दरेक स्वच्छ पांढऱ्या रेशमी धाग्याच्या पोटांत वैषयिक अपेक्षेच्या काळ्या सुताचा दोरा लपून राहिलेला दिसेल. आणि हे सुताचेच दोरे जर का परस्परांस ओळखून चाटून जाऊं लागले, परिस्थिति जर का अनुकूल बनूं लागली तर संकोचाचें सोंवळें पांघरूण झुगारून देऊन ती स्नेही मंडळी मनांतल्या पार्थिव आकांक्षा बेधडकपणें तृप्त करूं लागतात. सुस्वरूप अगर बांधेसूद मैत्रिणींच्या भोंवतीं नाचणारा विवाहित पुरुष अगर उमद्या स्वभावाच्या बळकट मित्राच्या पुढें पुढें करणारी विवाहित स्त्री यांच्या विचारांच्या सोंवळेपणाबद्दल कितपतशी ग्वाही देतां येईल ! धारिष्ट असलेले स्त्री-पुरुष वैवाहिक संबंधाच्या ठेंगण्या भिंती ओलांडून आवडीच्या माणसांबरोबर केव्हांच बाहेर फेरफटका करून येतात; भित्रीं माणसें त्या भिंतीच्या आड उभीं राहून बाहेरून मिळणाऱ्या सहसवेदनांच्या झुळकेवर आणि दुरून दिसणाऱ्या सहानुभूतीच्या मृगजळावर जगत असतात. चोरून खाण्याची मीमांसा जिकडे तिकडे सारखीच लागू पडते. चोरून खाणें ही सहज प्रवृत्ति नसून भुकेची प्रेरणा आहे. दुर्वर्तनी विवाहित स्त्री-पुरुषांची संख्या कांहीं कमी नसते. अशा ह्या मंडळींना विषयतृप्तीच्या बाबतींत तटतटीत उपोषणें पडलेलीं असतात. त्यांना तुमचीं नीतिबंधनें पटावींत कशीं आणि पटावींत तरी कां ?

आणि जेथें केवळ अभेद्य लग्नबंधनाच्या सांखळीनेंच दोन उदास जीव जन्मभर एकत्र जखडून ठेवलेले आहेत तेथें सुख व समाधान कितीसें सांपडणार ! संस्काराचा बागुलबुवा धाडसी स्त्रीपुरुषांना अशक्य अशा अतिमानुषीय नीतिनियमांच्या आटोक्यांत जसा ठेवूं शकत नाहीं, तसा तो भेकड व कष्टी जोडप्यांना समाधानाचा ठेवाहि हस्तगत होऊं देत नाहीं. फक्त नैसर्गिक प्रवृत्तींची जोपासना करणाऱ्या नीतिनियमांचेंच परिपालन होतें, त्यांची उपासमार करणाऱ्या नियमांचें हरहमेश उल्लंघन होत असतें. हीच ती मानवी नीतिनियमांची मर्यादा आणि हाच तो त्यांनीं स्वतः होऊन मागून घेतलेला पराजय होय.

वैषयिक आकर्षण निसर्गसिद्ध तर खरेंच. पण तें कमीअधिक करणें

हें माणसांच्या हातांत, आणि कमी अधिक होणें हें निसर्गनियमाधीनच आहे. दरेक व्यक्तिमात्राच्या ठिकाणीं हें सारखेंच सांपडणार नाहीं. कित्येक स्त्रिया पाहाण्यात तर त्यांच्या ठिकाणीं कांहीं तरी विलक्षण प्रकारचें वैषयिक आकर्षण असतें. सौंदर्याची मदत आकर्षणाची तीव्रता वाढविण्यात होईल, पण निव्वळ सौंदर्य हें एकच्या एक आकर्षणाचें अधिष्ठान मात्र असूं शकत नाहीं. कित्येक मध्यम स्वरुपाच्या आणि रंगानें काळ्यासांवळ्या स्त्रियांत हें वैषयिक आकर्षण असें कांहीं जबरदस्त असतें, कीं पुरुषांची नजर अव्यंग सौंदर्यापासून आपोआप त्यांच्याकडे खेंचली जाते. स्त्रिया केवळ मत्सरानें त्याला नटवेपणा, पुढें पुढें करण्याची खोड, लचकणें, मुरडणें, चटोरपणा अशा शब्दांनीं संबोधतील, त्याची किंमत कमी करतील. पण केवळ सौंदर्यावरहि मात करणारें, सामान्य स्वरुपाच्या स्त्रीचें असलें जबरदस्त वैषयिक आकर्षण नजरबंदी करतें, ही सत्यकथा शेवटीं भुरळ पाडणारें यश तिच्याच पदरांत टाकते. 'आकर्षण हें प्रयासानें कमावतां येण्यासारखें कसब आहे, वाढवितां येण्याजोगती ती एक कला आहे.' नीटनेटकें राहणें, स्वच्छता संभाळणें, शरीराची निगा ठेवणें, त्याची मर्यादा तंतोतंत राहणें, बोलण्याबसण्यांत संयम ठेवणें, हालचालींत मोहक हलूवारपणा असूं देणें, दुसऱ्याबद्दल सहानुभूति बाळगणें व दाखविणें, आणि आकर्षणाची देवघेव करण्याबद्दल उत्सुकता दाखविणें, ह्या वैषयिक आकर्षण हस्तगत करण्याच्या हमखास युक्त्याच होत. आणि त्या युक्त्या ज्या स्त्रीपुरुषांना साधल्या त्यांच्याकडे सहचाऱ्याचेंच काय, पण सर्व जगाचे डोळे लागून राहतील.

हें वैषयिक आकर्षण निरनिराळ्या गोष्टींतून निर्माण होत असतें. जगांत सौंदर्याची मागणी जिकडे तिकडे फार, तर अव्वल दर्जाच्या अव्यंग सौंदर्याचा पुरवठा रेडियम धातूइतकाच अतीशय दुर्मिळ ! तेव्हां या दुर्मिळ सौंदर्याच्या पाठीमागें लागलेले बहुतेक सर्व स्त्रीपुरुष निराशच होत असतील असें मानणें मात्र चुकीचें ठरेल. नुसतें शरीरसौंदर्य घेतलें तरी त्याला विचारसौंदर्याचें तेजोवलय अधिक आकर्षक करीत असतें; आणि स्वतःच्या सुखावर पाणी सोडून दुसऱ्याच्या सुखासाठीं झटण्याची प्रवृत्ति ही दुसऱ्यास कृतज्ञतेच्या अक्षय धाग्यादोऱ्यांनीं कायमचें करकचून एका खुंट्यास बांधून

ठेवतें. तेव्हां वैषयिक आकर्षण या शब्दयोजनेंत केवळ हीन कामुक प्रवृत्तींना उत्तेजन देणाऱ्या गोष्टींचाच समावेश केला आहे असें समजूं नये.

खुद्द शरीरसौंदर्याबद्दल पाहिलें तरी आपणांस काय दिसेल ? वैगुण्य काढायलाच बसलें तर नितान्त सुंदर माणसांतहि कांहींतरी कमीपणा आढळेलच; आणि अगदीं कुरूप दिसणाऱ्या माणसांतहि कांहीं बाबती अव्वल दर्जाच्या सौंदर्यदर्शक सांपडतील. हींच तीं इतस्ततः विखुरलेलीं सौंदर्यस्थानें पतिपत्नी परस्परांतून शोधून काढीत असतात, त्यांच्या प्राप्तीच्या आनंदानें हरळून जाऊन इतर बाबतींतील कुरूपपणा विसरून दुसऱ्याचे ते बंदे गुलाम होतात. रंग काळा, त्यांत देवीच्या वणांनीं तोंडाला टांकी लावलेली आणि एका डोळ्यांत वडस असा पुरुषहि आपल्या पिळदार आणि भरदार शरीरकाठीनें आपल्या पत्नीच्या अखंड आकर्षणाचें अधिष्ठान होतो. काळ्या किडकिडीत स्त्रीचा नवरा तिच्या काळ्याभोर विपुल केशभारावर, टपोऱ्या डोळ्यांतून ओसंडणाऱ्या कामुक तेजकिरणांवर अगर अवयवांच्या नाजुक बांध्यावर बेहोष खूष झालेला आढळेल. वैषयिक आकर्षणाचीं स्पष्ट स्थानें अमुक अवयवांच्या ठिकाणीं निश्चित व कायमचीं बसवितां येत नाहींत. तिऱ्हाइताच्या नजरेस न पडणारीं, लपून दडून बसलेलीं, सौंदर्यस्थळें शोधून काढलीं तरच सांपडणारीं अशीं आकर्षणकेंद्रें पुष्कळच असतात. वैषयिक तृप्ति दुसऱ्या व्यक्तीपासून जितक्या प्रमाणांत जास्त आणि हुकुमी होते, तितक्या प्रमाणांत त्या व्यक्तींतलें वैषयिक आकर्षणहि अधिक आणि अखंड ठरतें. बहुतेक बाहेरख्याली पुरुषांच्या लग्नाच्या बायका स्वरुपानें सुंदर असतात, पण त्यांचीं प्रेमपात्रें निखालस कुरूपच सांपडतील. ज्या परपुरुषांवर सुवासिनी आसक्त झालेल्या आढळतील, ते त्यांच्या नवऱ्यांच्या मानानें कुरूप, हलकट आणि त्याज्यच आढळतील. पण या प्रकारच्या लग्नाव्यतिरिक्त संबंधांतलें वैषयिक आकर्षण मात्र दुर्दमनीय असतें हेंहि तितकेंच खरें. तें आकर्षण कशांत आहे हें तुम्हांआम्हांला दिसत नाहीं एवढेंच. मात्र ओळखीच्या माणसास तें सदैव भुरळ घालीत असतें. मुद्दा असा, कीं वैषयिक आकर्षण नुसत्या सौंदर्यावरच अवलंबून असतें हें म्हणणें तितकेंसें खरें नाहीं.

मनुष्यस्वभाव हा एखाद्या झारेकऱ्याप्रमाणें केरकचऱ्याच्या उकिरड्यांतून

मौल्यवान् सुवर्णरज गोळा करीत असतो. अशा मोठ्या मेहनतीनें गोळा केलेल्या अमोल जिनसांच्या साहाय्यानें सांसारिक आनंदाचें सुवर्णमंदिर तो सजवीत असतो. दांपत्यांत शारीरिक आकर्षण उत्पन्न व्हावें ही निसर्गाची करणी तर खरीच पण दुसऱ्याच्या ठिकाणीं लपून बसलेलीं कित्येक अवर्णनीय, आकर्षक ठिकाणें आपल्या एकट्याला हस्तगत झालीं, आपल्या एकट्याच्या कायमच्या मालकीचीं ठरलीं, या आनंदातिशयांत तो दंग असतो. दुसऱ्यांत सांपडणाऱ्या गुणांच्या राईचा डोंगर करून त्याकडे एकसारखे डोळे भरून पाहत असतां शाश्वत संपूर्ण मालकीच्या उन्मादानें पतिपत्नी स्वतःस कृतकृत्य मानीत असतात. शारीरिक आकर्षण मूळचें असें थोडेंच असतें, आणि त्याची निगा ठेवली नाहीं तर तें नष्टहि होतें. केंसाची जोपासना केली तर ते स्वरुपास सौंदर्य आणतात, आणि त्यांची आबाळ केली तर ते सौंदर्यासहि ओंगळ आणि हिडीस कळा आणतात. बरीचशीं शारीरिक आकर्षणें वयोमानानें कमी होत जातात, तर कित्येक केवळ श्रमसाध्य असतात. वैवाहिक आयुष्यांत निर्भेळ आनंद उत्पन्न करावयाचा असेल, त्या आनंदास शाश्वत बनवावयाचें असेल, तर हें वैषयिक आकर्षण जतन करून ठेवलें पाहिजे, वाढविलें पाहिजे, नवीन उत्पन्नहि करीत गेलें पाहिजे.

शारीरिक सुखाच्या श्लील-अश्लील, शिष्ट-अशिष्ट, थिल्लर-संभावित, कामुक-भारदस्त, अशा सर्व प्रकारच्या आकांक्षा वैवाहिक जीवनांत पुरेपूर फिटल्या पाहिजेत असा चालू पिढीचा कटाक्ष आहे. ह्या त्यांच्या प्रामाणिक आणि आदरणीय प्रवृत्तीची सोंवळ्या आणि ढोंगी सनातन्यांनीं कितीहि निंदा केली तरी वस्तुतः आणि तत्वतः त्यांच्या त्या योग्य हट्टाचें कौतुकच करावेंसें वाटतें. अगदीं जुन्या पिढींतील लोक आपल्या वैषयिक आकांक्षा अंधारांत आणि घराबाहेरच पुरवीत असत आणि हीं त्यांचीं कृष्णकारस्थानें काय कमी थिल्लरपणाचीं होतीं ! केवळ जीवनकला न समजणाऱ्या अगर ती समजून केवळ संकोचामुळें ती हस्तगत न करणाऱ्या कितीतरी संभावित सुवासिनींच्या हातांतून प्रथम पतिप्रेम आणि शेवटीं खुद्द पति निसटून जात असत, हें पाहिलें म्हणजे वैषयिक आकांक्षांची बंडाळी पूर्वापार चालत आलेली स्पष्टपणें दिसते.

तरुण पिढी भाबडी आणि प्रामाणिक; त्याबद्दल त्यांनाच नादान ठर-

वून त्यांच्या न्याय्य आकांक्षांची टिंगल करणें हाच सनातन्यांचा हेतु व विजय असेल तर गोष्टच निराळी. बदलत्या काळानेंहि या आकांक्षांना एकसारखें उंच उंच उडावयास लाविलेलें दिसेल. सभोंवार सौंदर्याचीं, आकर्षणाचीं, विषयोपभोगाचीं प्रतीकें एकसारखीं जीं मांडलीं जात आहेत, त्यांच्या आधारानें यांच्या आकांक्षा भलत्याच लांब झेंपा टाकीत आहेत. वाऱ्यानें धुमसणारा अग्निच प्रज्वलित होतो, विझलेले कोळसे जास्तीच थंडगार होतात. या कामोद्दीपक वातावरणानें तरुण पिढी बेफाम होईल तर वृद्धांना थंडीची हुडहुडी भरेल. तरुणांना वृद्धांनीं आतां उपदेश केला कीं, 'बाबांनो, बाहेर थंडी फार पडली आहे, वैराग्याची वांकळ घेऊन रामनामाचा जप करीत पडून राहा कीं हा सोसाट्याचा वाराहि निघून जाईल' म्हणून तरुणांनीं तो का मानावयाचा ! कादंबऱ्यांनीं गेल्या पन्नास वर्षांत जी जीवनकला शिकविली नसेल, ध्येयसृष्टि निर्माण केली नसेल; नाटकांनीं गेल्या चाळीस वर्षांत जो भावनांचा थयथयाट दाखविला नसेल, आत्मप्रकटीकरणाचा हट्ट चालूं दिला नसेल; चित्र आणि संगीत या आवळ्याजावळ्या बहिणींनीं सतत पंचवीस वर्षें आंजारूनगोंजारून सौंदर्यदृष्टि जागृत केली नसेल, आदर्श जीवनाविषयीं गोड हुरहूर उत्पन्न केली नसेल तो सर्व भावनांचा थयथयाट, ध्येयवादाची हुल्लड, सौंदर्य-दृष्टीचे अजब आरसेमहाल, व्यक्तित्वाचा महिमा, एकट्या सामाजिक बोल-पटांनीं गेल्या तीन चार वर्षांत घरोघरच्या आबालवृद्धांना दाखवला आहे.

वैवाहिक जीवनांतील अमोल अपेक्षा आणि त्यांच्या प्रत्यक्ष कडेलोट निराशा यांचीं प्रतीकेंच मुळीं चित्रपटमंदिर आणि घर हीं होत. चित्रपट-मंदिरांत आपण आकांक्षेच्या पंखावर बसून कथानकाशीं समरस होऊन वारेमाप भराऱ्या मारीत असतों, सौंदर्याची मजा लुटीत असतों; पण तेथून परत घरीं येतांच त्या गोड भराऱ्यांतून एकदम कोसळून सर्व नावडत्या गोष्टींच्या रौरवांत येऊन पडल्यासारखें आपणांस वाटतें. नमुनेदार जीवनाची हुलकावणी बोलपट दाखवीत असतां, उत्तान भावनांचे खेळ खेळत असतां, सौंदर्याचीं आकर्षक आणि आच्छादलेलीं नाजूक ठिकाणें बेधडक मोकळीं झालेलीं पाहत असतां आणि शेवटीं निरनिराळ्या वैषयिक व्यापारांतील उघडा उन्माद अनुभवीत असतां, आमच्या तरुण पिढीच्या

वैवाहिक जीवनाच्या आकांक्षा मात्र सोंवळ्या राहिल्या पाहिजेत असा हट्ट धरणें हें किती वेडेपणाचें !

लग्नसंबंधास शरीरसंबंध असें दुसरें शिष्टसंमत नांव आहे; आणि शरीर-संबंध या शिष्टसंमत संबोधनांत शिष्टच काय पण सर्व अशिष्ट प्रेमव्यापारांचाहि समावेश केलेला असतो. याच शरीरसंबंधामुळें जिवलग मैत्री ही पतिपत्नी-संबंधाहून हलकी ठरते. मित्र कितीहि जिवलग झाले म्हणून त्यांची एक-मेकांच्या अंगासरपटी जाण्याची इच्छा नसते. पतिपत्नी यांच्यामध्यें, विशेषतः वैषयिक आकांक्षेच्या सफलतेसाठीं, शरीरसंबंधाचेंच मुख्य अंग असतें. वैषयिक आकांक्षा शरीरांतून उत्पन्न होत असून त्यांची तृप्तीहि शरीरा-मार्फतच व्हावयाची असते. तेव्हां वैवाहिक आयुष्यांत शरीराचें, शरीराच्या आकर्षणाचें, सौष्ठवाचें व स्वच्छतेचें महत्त्व वर्णन करावें तेवढें थोडेंच. उभयतां पतिपत्नींनीं आपलें संबंध शरीर व शरीराचा प्रत्येक अवयव अत्यंत स्वच्छ ठेवला पाहिजे. उभयतांच्या शरीराचा कोणता भाग केव्हां दुसऱ्याच्या नजरेखालीं येईल, स्पर्शिला जाईल, उपभोगिला जाईल याचा नेम नसतो. यासाठीं इतर मित्रमंडळींत वावरतांना नवीन कपडे आणि सुवासिक अत्तरें यांच्यावर भिस्त ठेवून स्वच्छतेची छाप पाडणारी मंडळी दांपत्यसंबंधांत खऱ्याखुऱ्या शारीरिक स्वच्छतेच्या अभावीं दुसऱ्यास नावडती होतीलहि.

शरीराच्या सांधीकोंपऱ्यांतून दर्प मारणारी घामाची दुर्गंधी अत्तरांच्या फवाऱ्यांनीं तिऱ्हाइतांपासून लपवितां आली तरी पतिपत्नी एकमेकांपासून ती कशी लपवूं शकणार ? पायोरियामुळें अगर दांत न घासल्यामुळें तोंडास येणारी दुर्गंधी तिऱ्हाइतांच्या लक्षांतहि येणार नाहीं; पण खात्रीनें त्या दुर्गंधीमुळें उभयतांस नुसतें तोंडाजवळ तोंड नेणें टाळावें लागेल; प्रणय-व्यापारांतील अर्धेमुर्धे देवघेवीच्या सुखाचे अनुभव आपोआप त्यांना पारखे होतील. विकारवशतेच्या क्षणीं शरीरप्रांतांची अस्वच्छता इतक्या ठळकपणें दुसऱ्याच्या लक्षांत येत नाहीं पण विकारतृप्तीसरशीं त्या अस्वच्छतेबद्दल दुसऱ्याच्या मनांत शिसारीच उत्पन्न होते. ह्या स्वच्छास्वच्छतेच्या गोष्टी कोणी कोणाजवळ बोलत नाहीं, त्या मनांत गुप्त ठेवून तज्जन्य व्यापारांसच टाळा देण्याचा प्रयत्न पुढें पुढें दुसऱ्याकडून होऊं लागतो.

तिऱ्हाइतांना भेटण्याच्या वेळीं आपण चांगलें दिसावें, स्वच्छ वाटावें म्हणून आपण किती काळजी घेत असतों! पण पतिपत्नी एकमेकांस भेटतात त्या वेळीं इटकून मळके आणि जुने कपडे, अस्वच्छ व घामानें डबडबलेलीं शरीरें असा त्यांचा थाट असतो! हीं आकर्षण उत्पन्न करण्याचीं, वाढविण्याचीं, वाढ कायम ठेवण्याचीं बारीकसारिक अवश्य साधनें होत; पण आपल्या जीवनकलेंत त्या साधनांची इटकून आणि हट्टानें उपेक्षाच आपण करीत असतों. पतिपत्नींत आकर्षण कधींच उत्पन्न होत नसलें तर विधाता काय रडेल तिथें! पुरुष पाहावेत तर रात्रीं फाटकीं जुनींपानीं धोतरें नेसलेले, मळके सद्रे घातलेले, तोंडाला विड्यांची दुर्गंधी येत असलेले, अंग खराखरा ओरबाडीत असलेले, अश्लील आणि हिडिस बीभत्स बोलणीं बोलणारे; आणि स्त्रिया पाहाव्यात तर पडदणीचें जुनेर लावून घेतलेल्या, झांकपाक आंवराआंवर करतांना घामाघूम झालेल्या, तशाच घामानें निथळत असलेल्या, सर्वांगाला, कपड्यांना, केंसांना शिसारी आणणारी घामाची कुबट घाण येत असलेल्या! असें हें दांपत्य एकत्र आलें, एकान्त भोगूं लागलें तर अखेर पाशवी वृत्तीच्या तृप्तीपुरतेंच तें जवळ येत असलें तर नवल काय! लग्नानंतर एकमेकांची सौंदर्यदृष्टि तृप्त ठेवली पाहिजे, परस्परांना वाटणारें कामुक आकर्षण नेहमीं जागृत आणि तेवत ठेवलें पाहिजे, याची जाणीवच मुळीं आमच्या जोडप्यांना नसते. त्यांच्या वागण्यांत भलताच पोक्तपणा येतो व शेवटीं भलतीच बेफिकिरीची पशुवृत्ति तेवढी शिल्लक राहते. हीच अवस्था वैवाहिक असंतोषाच्या वावटळी उठविते, प्राणांतिक वैषयिक निराशेनें त्यांना घेरून टाकते. तेव्हां नखशिखान्त शरीराची व दरेक अवयवाची स्वच्छता राखण्याची उभयतांनीं दक्षता बाळगली पाहिजे. पोषाखाची टापटीपहि डोळ्यांत तेल घालून संभाळली पाहिजे. आपले अवयव शक्य तों आच्छादलेले ठेवण्यांत पुष्कळच गोष्टी आपोआप साधतात. कुरूपपणा अगर शिसारी आणणाऱ्या अनेक वैगुण्यांवर अनायासें झांकण पडतें; शिवाय आच्छादित भागाबद्दल वाटणारी आकांक्षा कपड्यांच्या फटीसांधींतून डोकावून पाहूं लागली म्हणजे पाहणाऱ्याच्या मनांत भलतेंच आकर्षण उत्पन्न करते. दर्शनोत्सुकता स्त्रीपुरुषांना जवळ जवळ ओढूं लागते. उलट, सताड निर्लज्ज असें अशोष

अवयवदर्शन शिसारीच आणतें.

शारीरिक आकर्षण हें शरीरसौष्ठवप्रधान असतें आणि सौष्ठव हें आरोग्याच्या पोटीं वाढतें. तारुण्य हें कोणत्याहि व्यक्तीस कोणत्याहि अवस्थेंत आकर्षक रंगाचा डूब देतें, तें तरी आरोग्यामुळेंच. तारुण्यांत सर्व शरीर मोहक दिसतें. सौंदर्यांत जवळ जवळ निम्मे घटक आरोग्याचे असतात. तरुण पण रोगी, आणि पिकलें पान झालेली पण निरोगी, अशा दोन व्यक्ति शेजारीं शेजारीं उभ्या केल्या, तर सर्व डोळे म्हाताऱ्या व्यक्तीवर खिळून राहतील. पण ही निकोप शरीरप्रकृति, जी सौंदर्याची खरी जडीबुट्टी होय तिच्याकडे दांपत्यें हट्टानें पाठ फिरवून बसलेलीं असतात. स्त्रियांनीं पावडरी, अत्तरें चोपडलीं, केशरचनेच्या तऱ्हांची आणि भपकेदार नव्या कपड्यांची लयलूट चालविली, तरी एखादी काळी पण निरोगी, ठाकठीक बांध्याची मोलकरीणच घरमालकाची नजरबंदी करून त्याला आपल्या मागोमाग घराबाहेर घेऊन जाईल. शरीराची ठाकठीक ढब, सुदृढ (लठ्ठ नव्हे आं) शरीराची ठेवण, चेंडूप्रमाणें उशी खात राहणारें शरीरचापल्य, हीं सर्व नितान्त आकर्षणलक्षणें होत आणि तीं एकट्या आरोग्याचींच लेणीं होत.

स्त्रियांचें सौंदर्य त्यांच्या तेजस्वी आणि निरोगी शरीरकांतींत व भरदार निकोप शरीरबांध्यांत सांठविलेलें असतें. नाकाडोळ्यांची ठेवण, केशकलाप, अंगाचा रंग, हीं त्या मानानें कमी प्रतीचीं होत. कवींनीं त्यांची कितीहि तारीफ केली तरी त्यांनीं वैषयिक अपेक्षेची तृप्ति होत नसते, आणि संसारांत निढावलेला पुरुष स्त्रीच्या निकोप व भरदार निरोगी शरीरावरच बेहद्द खूष असतो. पुरुषांनींहि शरीरसंपत्ति कमावण्याकडे पहिल्यानें लक्ष पुरविलें पाहिजे. स्त्रीपुरुष सांस्कृतिक उत्क्रांतीच्या पायऱ्या कितीहि झपाट्यानें चढोत, स्त्रियांचें नाजुक शरीरसौंदर्य आणि पुरुषाची राकट भरदार शरीरप्रकृति हींच एकमेकांचीं मुख्य आकर्षणस्थानें कायम राहणार; हींच तीं उभयतांना दुसऱ्यांत असावींशीं वाटणारीं ध्येयात्मक लक्षणें होत. शारीरिक व्यायाम उभयतांनीं घेतल्यास शरीर निरोगी होऊन बांधेसूद राहील यांत शंका नाहीं.

उभयतांचें शारीरिक आकर्षण वयपरत्वें कमी होत जातें हें उघड आहे.

तथापि त्यांना प्राप्त होणारें अकालीं वार्धक्य खात्रीनें पुढें ढकलतां येतें. वयपरत्वें शरीरें बोजड झालींच पाहिजेत असें थोडेंच असतें ! या शरीर-जोपासनेच्या बाबतींत स्त्रिया विशेषतः बेफिकीर असतात. संसारी स्त्री, विशेषतः चारदोन मुलेंबाळें झालीं कीं, साहजिक स्थूल होत जाते. तथापि या शरीराच्या बेडौल वाढीवर जर तिनें योग्य ती करडी नजर ठेवली नाहीं, तर नविनच एक कुरूपपणा आपण होऊन ती अंगावर ओढवून घेईल. तसेंच तिचें वागणेंहि आजीबाईसारखें होऊं लागलें, म्हणजे ती तरुण असतांहि निस्तेज होऊन म्हाताऱ्यांच्या पंक्तीला जाऊन बसते. इतरांशीं वागतांना वयपरत्वें तिनें पोक्तपणाचा आव आणणें योग्य ठरेल आणि तसा पोक्तपणा तिच्या अंगीं आलाहि पाहिजे; पण, नवऱ्याच्या मानानें त्याची बायको ही नेहमींच लहान वयाची असणार आणि ती सतत मनानें व शरीरानें तरुण राहील तरच ती त्यास आवडणार. सभोंवार बळजबरीनें लादलेले प्रौढपणाचे आचारविचार पसरले आहेत व मनाविरुद्ध शिष्टपणाची सामाजिक अपेक्षा पुरी करावी लागत आहे अशा कोंडमाऱ्यांत सांपडलेल्या पुरुषाच्या मनांतील बालिश अल्लडपणास जर त्याच्या पत्नीनें सारखें उत्तेजन देऊन सांभाळलें नाहीं, तर त्याची आयुष्यांतील उसळी व उमेदच खचेल; संसाराविषयीं तो निरुत्साही बनेल.

पुरुषांचें मन नेहमींच तरुण असतें. निसर्गाच्या पक्षपातीपणामुळें संसाराचा त्याला वीट यावा, थकवा यावा, अशी स्थिति नसते. आणि त्याच्या त्या तरुण मनाच्या विषयवासनेचे चोजले जोंपर्यंत त्याच्या पत्नीला पुरे करतां येतील, तोंपर्यंत तो वैवाहिक आनंदांत राहील. ही पुरुषांची नैसर्गिक प्रवृत्ति स्त्रियांनीं कधींहि डोळ्यांआड करून चालावयाचें नाहीं. ज्या ज्या स्त्रियांनीं शेवटपर्यंत आपल्या नवऱ्याला मुठींत वागविलें, त्यांच्या त्या कलेचें बारकाईनें निरीक्षण केलें तर त्या स्त्रियांकडून कामुक आकर्षणाचे सहेतुक प्रयत्न थेटपर्यंत होत राहिलेले असतात असें दिसेल. तेव्हां शरीर वातानें बोजड आणि कुरुप होऊं द्यायचें नाहीं; पोक्तपणाच्या आविर्भावानें चेहेरा उदास होऊं द्यावयाचा नाहीं; अवयव निर्जीव आणि शिथिल होऊं द्यावयाचे नाहींत; तसेंच मनहि निराश आणि बुरसलेलें होऊं द्यावयाचें नाहीं ही संसारसुखाची गुरुकिल्ली प्रत्येक व्यक्तीनें मनांत

वागविली पाहिजे.

शरीराची निगा ठेवण्याचे अनेक प्रकार आहेत. ते कोणकोणते हें स्त्रियाच विशेषेंकरून सांगूं शकतील. पोशाखहि करण्याच्या तितक्याच नानाविध तऱ्हा आहेत. बोलण्याचालण्यांतील आविर्भावाचे तितकेच अनेकविध आकर्षक प्रकार असतात. ह्या सर्वांत मुख्य गोष्ट गृहिणींनीं ध्यानांत ठेवावयाची असेल तर ती ही, कीं आपल्या यजमानांच्या मनावर वैषयिक आकर्षणाचा ताण सारखा राहील, त्यांना त्या हव्याहव्याशा वाटतील अशा गोष्टींचा शक्य तितका आविष्कार त्यांनीं करीत राहावें. सर्वांनाच छचोर चाळे आवडतील असा नियम नाहीं, तसेंच अगदीं संभावित वृत्तीबद्दल दरेकाला तिटकारा वाटेल असेंहि नाहीं. व्यक्तिमात्राच्या आवडीनिवडी संभाळून आपल्या आवडीनिवडींची जोपासना करण्याच्या मार्गानें अहोरात्र जाणाऱ्या भार्या शेवटीं आवडत्या होतात. स्त्रियांचा कल नटण्यामुरडण्याकडे जात्याच असतो. तसेंच पाहिलें तर उमलत्या सौंदर्याची आणि मावळत्या सौंदर्याची जाणीव स्त्रियांना तेव्हांच होते व याबद्दल त्या नेहमींच दक्ष असतात. मुद्दा एवढाच, कीं स्वतःच्या आवडीनिवडीचे चोजले फार न करतां नवऱ्याची आवडनिवड आणि वैषयिक आकर्षण या अनुरोधानेंच वागण्याबद्दल त्यांनीं दक्षता ठेवावी. शरीरांतील स्थूलत्व आणि शैथिल्य हींच महत्त्वाचीं कुरूप लक्षणें होत. त्यासाठीं व्यायाम आणि उपोषणें करण्याकडे स्त्रियांचा कल वाढत आहे ही एक आनंदाचीच गोष्ट आहे म्हणावयाची.

केवळ स्त्रियांनीं वैषयिक आकर्षण कायम ठेवण्याची जबाबदारी पत्करली तर दांपत्यांचे संसार थोडेच सुखाचे होणार आहेत! आणि त्यांच्या त्या एकांगी प्रयासाला उत्तेजन तरी कसें मिळावें! त्याला संसारसुखाचीं गोड फळें तरी कशीं लागावींत! पुरुषानेंहि आपल्या शरीरांतील तेजस्वीपणा आणि पराक्रम कायम ठेविला पाहिजे. पुरुष हा स्त्रीच्या दृष्टीला मोठा आधार असा वाटतो. त्याच्या संपत्तीच्या आणि वैभवाच्या मोठेपणापेक्षांहि त्याचें शरीरसौष्ठव हेंच त्याच्या पत्नीस प्रत्यक्ष उपभोगितां येणारें म्हणून अधिक लोभनीय वाटत असतें. सर्वसाधारण जनता घेतली तर पुरुष हा आपल्या भरदार आणि तेजस्वी शरीरानें व अचाट शक्तीनें त्याच्या पत्नीस

हवाहवासा वाटत असतो. म्हणून पुरुषानेंहि तिच्या त्या अपेक्षा पुऱ्या केल्या पाहिजेत. तेजोहीन होणें, गबाळ वागणें, आळशी होऊन पडून राहणें, ह्यांसारखे दुर्गुण पुरुषांत असले, तर त्याच्या बायकोनें तरी अशा मालव-लेल्या देवाची पूजा बांधण्यासाठीं एवढी यातायात आणि खटपट कां करावी ? हा गबाळ आणि आळशी झाला म्हणजे याची बायकोहि तितकी-च गबाळ होणार. तेव्हां पुरुषानेंहि व्यायाम, मिताहार आणि विहार यांनीं शरीर चपल आणि तेजस्वी ठेवलें पाहिजे.

शारीरिक गोष्टींचाच विचार केला तरी त्यांतहि विजोडपीं असतातच, आणि तीं वैवाहिक दुःखाचे कढत सुस्कारे एकसारखीं टाकीतच असतात. किरकोळ-जाड, उंच-ठेंगू, कुरूप-सुस्वरूप, सशक्त-अशक्त अशा विजो-डप्यांचे संसार म्हणजे वेदान्तांतील द्वंद्वांचाच एकत्र निवास आणि त्यांतून जणूं वैराग्यच उत्पन्न व्हावें अशी विधिघटनाच दिसते.

पति-पत्नी तुल्यबळ असलींच पाहिजेत; तसें नसेल तर उभयतांनाहि वैषयिक सुख लाभणार नाहीं; संसारांत समाधान राहणार नाहीं. विजोड्यां-तून ज्या तक्रारी निघतात त्या सर्वांचें मूळ वैषयिक बाबतींत झालेल्या हिरमोडांत रुजलेलें असतें. आणि ह्याच्याच जोडीला वैषयिक गोष्टींबद्दलचें अज्ञान हेंहि पुष्कळ वेळां उभयतांत अकारण तिटकारा उत्पन्न करतें. वैवाहिक जीवन हें तरी एक शास्त्रच आहे. स्त्री-पुरुषांच्या प्रकृत्यनुसार त्यांच्या भावनांचा उत्कर्षापकर्ष निरनिराळ्या अंतरावर आणि निरनिराळ्या कारणांनीं होत असतो. उभतांच्या भावना, सुखोपभोगाचे उत्कर्षाचे परमोच्च बिंदु, एकाच वेळीं एकाच ठिकाणीं येऊं शकले नाहीत, म्हणजे उभयतांचीहि निराशा होते. संसारसुखाचा आनंद हा उभयान्वयी असतो. एकट्यानेंच भोगलेला आनंद दुसऱ्याच्या दृष्टीनें पशुवृत्तीचा ठरेल आणि एकट्यानेंच भोगलेला मतलबी एकेरी आनंद स्वतः त्या व्यक्तीलाहि अपुराच वाटत राहील. त्या आनंदप्राप्तीचे ते मार्ग आहेत, उभयतां स्त्रीपुरुषांनीं त्या आनंदाच्या प्राप्तीसाठीं स्वतः तयार होऊन दुसऱ्यास तयार करण्याचे जे निरनिराळे मार्ग आहेत, जे कांहीं शरीरशास्त्राचे नियमसिद्धान्त आहेत, त्यांचा अभ्यास आणि प्रचार उभयतांनींहि दक्षतेनें केला पाहिजे, तरच त्यांच्या हातीं संसारसुखाचा सांठा येणार आहे.

वैवाहिक सुखाचें खरें अधिष्ठान शरीरच आहे. सौष्ठव, सौंदर्य, तारुण्य, स्वच्छता व ताकद, हीं त्याचीं मुख्य मुख्य अंगें होत. हीं मुख्य अंगेंउपांगें उभयतां पतिपत्नींनीं संभाळलीं तर सुख आणि समाधान यांचा अवीट आस्वाद तीं जन्मभर घेत राहतील, याची दोघांपैकीं कुणीहि हेळसांड केली तर निराशेच्या व निरुत्साहाच्या आहारीं तीं दोघेंजण जातील आणि दोघांनाहि संसार नकोसा होईल.

# ६

## पतिपत्नींतील रहस्यकथन खुल्या दिलानें व्हावें कीं होऊं नये ?

प्रौढविवाहाच्या वाढत्या अमदानींत, विवाहपूर्व प्रेमरहस्यें ज्यांचीं त्यांचीं स्वतंत्र असणें अगदींच असंभवनीय नाहीं. लग्नाचीं वयें आर्थिक अडचणींमुळें आपण एकसारखीं वाढवींत चाललों आहोंत. तथापि निसर्ग इतका चालढकल्या थोडाच असणार ! शरीरवाढीबरोबर त्यांत पेरलेल्या प्रवृत्तीहि वाढूं लागतात. वेलीची वाढ होण्याच्या अगोदर तिच्या तंतूंची वाढ होत असते, आणि ते तंतूच अगोदर शेजारच्या आधारावर झेपा टाकून त्याला विळखा मारतात व नंतर त्याच्या आधारानें वेली फोफावूं लागते. मानवी प्रवृत्तीहि शरिराच्या अगोदर वाढतात, जवळपासच्या ऋणानुबंधावर खिळूं लागतात, आणि त्या ऋणानुबंधाच्या बळकटीनें शरीर वाढूं लागतें, पोसूं लागतें असा मनोविश्लेषणशास्त्राचा सिद्धान्त आहे. तेव्हां या कोष्टकांतून प्रणयव्यापार थोडेच सुटून जाणार आहेत ! प्रणयाचा दुरूनच फुंकर, आपण दुसऱ्यावर अगर दुसऱ्यांनीं आपणांवर, टाकण्यापासून तों अगदीं शरीरसंबंध घडण्यापर्यंत यशस्वी, अपेशी, आल्हादकारक वा क्लेशदायक थोडाफार अनुभव दरेक व्यक्तीला तारुण्याच्या पहिल्या मोसमांत आलेला असावयाचाच. मात्र या गोष्टी जो तो स्वतःशीं सुद्धां कबूल करीत नाहीं. ज्या भेसूर आठवणीपासून मन लांबवर धूम ठोकीत पळून जातें ती अशीच एखादी नाजूक गोष्ट असते. तेव्हां प्रश्न असा, कीं हें पहिलें रहस्य लग्नानंतर पतिपत्नींनीं परस्परांस सांगावें कीं कसें !

पहिलेवहिले अनुभव नेहमींच अनुपम आनंद देतात, आणि त्यांच्या

आल्हादकारक आठवणी सर्व आयुष्यभर मनोहर पार्श्वसंगीताच्या लहरींनीं मनाला मधून मधून सारख्या खेंचत असतात. हातांतून निसटून गेलेल्या आनंदाची, अगर त्याच्याऐवजीं ठाणें देऊन राहिलेल्या पश्चात्तापाची, चुटपूट मनांत सलत राहते. तशाच प्रकारचे अनुभव घेत असतांना शरीर बेहोष झालें म्हणजे मनहि गाफील बनून आठवणीच्या पोतडींतील अनुभवांची एकेक जादू मनांतल्या मनांत मांडूं लागतें आणि काळवेळ, जबाबदारी, दूरवर परिणाम, हीं सर्व विसरून तें त्याबद्दल बरळूं लागतें. कित्येक वेळां फाजील मनमोकळेपणा, तर इतर वेळां बेहद्द विश्वास, यांच्या भरांत पतिपत्नी एकमेकांस इतरत्र मिळालेले अनुभव पटकन् सांगून टाकतात.

कित्येक वेळीं बारीकसारीक वैषयिक कुशलतेच्या पाठीमागें पूर्वानुभव आहेत कीं काय, हें जाणण्याच्या कुतूहलाच्या खोदून खोदून विचारण्यानें आपण विश्वासस्थानाच्या बुडाशीं पेरलेले सुरुंग उघडे आणि जिवंत करतों. कोणाच्याहि गाफीलपणामुळें असो, पण पतिपत्नींना पूर्वरहस्यें एकमेकांस सांगण्याची पाळी येते, व त्यांनीं तीं सांगितलेलीं असतात. आणि तीं तशीं रहस्यें सांगावींत कीं नाहीं, याबद्दल परस्परविरोधी दोन मतें आहेत. पतिपत्नीं-मध्यें चोरून असें कांहीं असूं नये, त्यांचें पूर्वचरित्रच काय पण विवाहि-तांना परस्परांबद्दल वाटणारी प्रीति, अप्रीति, या सर्वांची खुल्या दिलानें देवघेव व्हावी, असा एक भडभडयांचा पंथ आहे; पूर्वरहस्यें हीं अवश्य एकमेकांनीं सांगावींत असा यांचा हट्ट आहे.

प्रेमांत स्पर्धाच काय, पण तुलनाहि खपत नाहीं. पत्नीनें तिच्या एखाद्या ओळखीच्या स्नेह्याच्या अगर लांबच्या नातेवाइकाच्या गुणांची, औदार्याची स्तुति केली, तरीसुद्धां तिचा नवरा कान टवकारून कावराबावरा होऊन पाहूं लागतो ! नवऱ्याकडे येणाऱ्या एखाद्या मैत्रिणीचीं त्यानें स्तुतिस्तोत्रें गाण्यास सुरवात करतांच, त्याची पत्नी तितकीच कासावीस होते. लग्ना-पूर्वीची ओळख काढून भेटण्यास येणारी व्यक्ति दुसऱ्याच्या मनांत संशय आणि अप्रीति उत्पन्न करते. इतक्या तर पति व पत्नी यांच्या भावना हळव्या असतात. आपल्या हातांतील जिवाहून प्रिय अशी किंमती वस्तु दुसरें कोणी तरी झडप घालून, हिसकावून घेऊन जाणार अशी भीति त्यांना विकल करते. प्रेमाचा व्यापार असा असतो कीं, तो निखालस विश्वास,

नितळ पावित्र्य, स्वच्छ भावना, या उभयतांमध्यें वास करीत असेल तरच त्याला बरकत येते. साधी धंद्याची भागीदारी घेतली तरी, सर्व भागीदारांचीं मनें स्वच्छ असावीं लागतात. तर जेथें सर्व सुखदुःख वाढविणें, कमी करणें हाच ज्यांच्या संबंधाचा हेतु तेथें किती निर्मळ मनें पाहिजेत !

मनाचें मालिन्य उघडकीस कोणी जर आणात असल तर ता बोलण्या-चालण्यांतील गाफीलपणा होय. थट्टेंत अगर आत्मप्रौढी सांगण्यासाठीं मनुष्य बेसावधपणें गुप्त विचारांची तिजोरी खोलतो. अशा प्रकारचें थोडेंसें जरी कुणी चुकून एखादे वेळेस बोलून गेलें तरी त्या बोलण्याच्या किल्लीनें गुप्त विचारांची तिजोरी वारंवार उघडून त्यांत डोकावून पाहण्याचा पोरचाळा दुसऱ्या व्यक्तीस लागतो. परिणाम असा होतो कीं, सर्व हकीगत सांगून अधिक अप्रियता तरी पत्करावी लागते, नाहीं तर घुमेपणाबद्दल दुसऱ्याचा राग तरी सोसावा लागतो. खुद्द मनाबद्दल पाहिलें तर प्रत्यक्ष परमेश्वराच्या मनांतहि दुष्ट विचार येऊन जातातच. ते विचार बोलून दाखविणारा मूर्ख, दुराचारी ठरतो; ते मनांतल्या मनांत दाबून ठेवणारा देवमाणूस समजला जातो. नुसत्या दुष्ट विचारांनीं मनाला जो मलिनपणा येतो, त्याच्या हजार पटीनें शारीरिक मालिन्याच्या आठवणींनीं मनाला मालिन्य येतें. मन जसें स्वप्नें विसरतें तसें दुष्टसुष्ट विचार पार विसरून जातें. परंतु देहानें अनुभवलेले स्वैर सफरींचे अनुभव आणि त्यांचीं मनांत रुतून उमटलेलीं पावलें हीं पश्चात्तापानें धुतलीं जात नाहींत; कालावधीलाहि पुसून टाकतां येत नाहींत. आणि अशीं हीं पूर्वानुभवांचीं प्रतिबिंबें ज्याला त्याला एका-न्तांत चैन पडूं देत नाहींतच, पण दुसऱ्या व्यक्तीच्या मनात अविश्वासाचीं भुतें उभीं करतात. पूर्वचरित्र आदरणीय असेल तेवढेंच दुसऱ्यास सांगावें, आणि तसें केलें तरच उत्तरचरित्र सुखासमाधानांत जाण्याची आशा. सर्व ऐहिक व्यापारांत, आचारांत, वागण्यांत थोडीफार फसवाफसवीहि करावी लागतेच. 'सत्याचे प्रयोग करणारा' चिमणराव जोग सांपडणें कठीण, होणें वेडेपणाचेंच. पूर्वचरित्र दुसऱ्यास न सांगणें ही फसवेगिरी आहे असें मानलें, तरी कित्येक वेळीं ज्याला फसविलें त्याच्या मनाच्या स्वास्थ्याकरितां तें पाप क्षम्य ठरेल. दुसऱ्यास फसविलें म्हणून आपण स्वतः पाहिजे तर थोडे

ओशाळे होऊं, पण आपण सर्व डाव उघडा मांडून खेळूं लागलों आणि आपला मिडू डाव फेंकून देऊन तिटकारा व द्वेष यांमुळें मुठी आंवळीत तेथून निघून गेला तर काय उपयोग! विवाहित प्रथमवर पतिपत्नींतच काय, पण पुनर्विवाहित जोडप्यांत व केवळ प्रेमसंबंधानें एकत्र—तात्पुरते वा कायमचे—राहणाऱ्या स्त्रीपुरुषांतहि, हाच गौप्यगोपनाचा नियम सारखाच लागू पडतो. पहिल्या पत्नीबद्दल अगर पतीबद्दल प्रशंसेचे उद्‌गार काढण्यांत मनाचा मोठेपणा, जिव्हाळ्याचा जिवंतपणा दिसतो असें कोणी म्हणेल; विश्लेषणशास्त्राप्रमाणें तें खरेंहि असेल; परंतु याच उद्‌गारांनीं स्पर्धेचे सुरुंग पेट घेतात, मन आणि शरीर यांच्यावरचें अज्ञात पावित्र्याचें पांघरूण काढून त्यांचा मलिनपणा उघडा केला जातो. विस्तवानें इमारती जळल्या तरी माणसें शाबूत निघूं शकतात, पण गैरसमजाच्या फुफाट्यांत कुटुंबेंच्या कुटुंबें जळून खाक होतात. पूर्वचरित्रांतील उद्‌गार ऊन ऊन पाण्याच्या फवाऱ्याप्रमाणें भावनांची राखरांगोळी करणारे होत. तेव्हां ज्यांचीं त्यांनीं आपलीं रहस्यें मनांत ठेवावींत, दुसऱ्या व्यक्तीस सांगूं नयेत, हें उचित.

रहस्यभेदाच्या बुडाशीं गाफीलपणा तर असतोच, पण तो गाफीलपणा दरेक माणसाच्या हातून नकळत व्हावा असें मनोविश्लेषणात्मक तत्त्व त्याच्या पाठीमागें असतें. प्रेमाच्या निशेनें माणूस बडबड्या होतो. आपल्या-प्रमाणेंच आपल्या आवडत्या माणसांचें दुसऱ्यांनीं, निदानपक्षीं दुसऱ्यांच्या देखत, कोडकौतुक आपण करावें अशी अनिवार इच्छा त्याला उत्पन्न होते. दुपारच्या प्रहरीं यजमानाच्या आवडीनिवडीबद्दलच्या शिळोप्याच्या गप्पा मारणाऱ्या पोक्त बायकांचीं बोलणीं ऐका, अगर आवडत्या मित्राबद्दल एकमेकींच्या कानांत कुजबुजणाऱ्या कुमारिकांच्या खाणाखुणा, बोलणीं ऐका किंवा विवाहापूर्वी व लगेच नंतर मित्रांजवळ आपल्या पत्नीबद्दल बोलबोलून कंटाळा आणणाऱ्या तरुणांचीं बोलणीं ऐका, सर्वांच्या बुडाशीं हीच दुर्दमनीय प्रवृत्ति दिसेल. माझें प्रेमाचें माणूस येवढें गुणाचें गोड, आणि सभोंवारचें जग त्याची कशी किंमत करीत नाहीं! स्तुतिस्तोत्रें गात नाहीं! अशा त्वेषानें चिडून कधीं कधीं स्तुतीची परमावधिच काय पण प्रतिक्रियाहि करण्याची इच्छा होते. कित्येक वेळां मनुष्य उलटतपासणी करणाऱ्या वकिलाप्रमाणें बाह्यतः प्रेमाच्या माणसांवर इतरांच्या समोर लटके

हल्ले चढवीत असतो. त्यांत उद्देश एवढाच असतो कीं, स्वतःच्या मनांत घोळणारे बचावाचे उत्तमोत्तम गुण दुसऱ्यांनीं बोलून दाखवावेत. त्याची परीक्षा एकच. दुसऱ्यानींहि तितक्याच तीव्रतेनें निंदा करून पाहावी म्हणजे रागाचा पारा किती एकदम चढतो तें समजेल. तेव्हां ही नैसर्गिक प्रवृत्तिच आहे, येवढें खरें. विधवा, विधुर अगर गुप्तपणें एकमेकांवर प्रेम करणारे स्त्रीपुरुष मनांत जास्त कष्टी कशानें होत असतील तर याचमुळें. त्यांना या स्वाभाविक प्रवृत्तीचे पांग उघड उघड स्तुतिस्तोत्रें गाऊन फेडतां येत नाहींत म्हणून.

आणि हीच प्रवृत्ति पुष्कळ वेळां गाफीलपणानें रहस्यभेदाच्या कोठाराला संशयाची ठिणगी लावून देते; आणि एकदां संशयाग्नीनें घेरल्यावर पतिपत्नीसंबंध सहीसलामत थोडाच बचावणार आहे ! करितां, निदान स्वार्थाच्या दृष्टीनें तरी प्रत्येक स्त्रीपुरुषानें आपल्या पूर्वचरित्रांतील रहस्यावर कुलूप ठोकून सील करून ठेवावें व त्याचा मागमूसहि समोरच्या व्यक्तीला लागूं देऊं नये. बायकांची म्हण आहेच 'साप म्हणूं नये बापडा, नवरा म्हणूं नये आपला'. हें जाणून नवऱ्याशीं सुद्धां साप समजून जपून वागावें. ही म्हण स्त्रियांच्यांतच रूढ असण्याचें कारण त्यांची पराधीनता आणि बहुपत्नीकत्वाची अमंगल चाल. पण या म्हणींत ग्रथित केलेलें मानसशास्त्र उभयतांना सारखेंच लागू आहे. आणि या रहस्यकथनाच्या बाबतींत तर तें तंतोतंत पटण्यासारखें आहे.

---

# ७
# हिमालयाचे हुंदके !

दंवानें डंवरणाऱ्या, उन्हानें कोमेजणाऱ्या, वाऱ्यानें डुलणाऱ्या, झळीनें झुरणाऱ्या कळ्यांनीं समाजवृक्ष आजकाल त्रिफुल्ल झालेले दिसतात. कळ्यांना भावना कोंडून ठेवतां येत नाहींत, म्हणून त्यांचे निश्वास लोकांना जाणवतात. त्यांचे निश्वास खोटे आहेत अगर ढोंगीपणाचे आहेत असें मुळींच नाहीं. हिमालयाच्या पोटांत सर्व आघात गिळून टाकण्याइतकी जागा असते. त्याच्या अंगावरचें कवचच येवढें भक्कम असतें कीं, त्याच्या पोटांत चाललेली कालवाकालव बाहेर समजतहि नाहीं. त्याला भावना नाहींत, निराशांचें दुःख नाहीं अशी कळ्यांची आणि वेलींची समजूत होणें साहजिक आहे. हिमालय अजस्र, पाषाणहृदयी मानला गेला, मख्ख म्हणून ठरला, म्हणून त्यालाहि कांहीं होतच नसेल असें पाहिजे तर अल्लड कळ्यांनीं आणि आपमतलबी वेलींनीं म्हणावें; पण आघात सोसण्याची किमान मर्यादा पोंचल्यामुळें हिमालय गदगदां हलूं लागतो, आसपासची भूमीहि हालवितो आणि नसांनसांतून पोटांत पेटलेली आग बाहेर फेंकूं लागतो. हिमालयाचे धाकटे भाऊ जे ज्वालामुखी ते भाबडेपणानें आपल्या पोटांतील आग ज्याच्या त्याच्याजवळ वेळीं अवेळीं ओकत असतातच ना !

माझ्या एका स्नेह्याचीच गोष्ट. लहानपणीं त्याचे वडील निवर्तले. त्याच्या आईनें व आजीनें आणि वडील बहिणीनें त्याला लहानाचा मोठा केला. त्यानेंहि हालअपेष्टा सोसून विद्याभ्यास केला व तो थोडा नांवलौकिकाला येऊं लागला. तोंपर्यंत त्या कुटुंबांत सलोखा, आनंद, एकोपा नांदत असे.

तो नाहीं म्हणत असतांनाहि सगळयांनीं मिळून त्याच्या लग्नाची मोट बांधली. श्रीमंत सोयरिक मिळून आपल्या हौशी फिटाव्यात अशी सर्वांची इच्छा, म्हणून त्यानें आपलें ध्येय गुंडाळून ठेवलें. रूपानें साधारण, शिक्षणांत मागासलेली, अशा श्रीमंत बापाच्या एका मुलीशीं लग्न करण्याचें त्यानें कबूल केलें. लग्नांत त्याच्या आईनें जो अडाणी हट्ट दाखविला आणि व्याह्यांनीं त्यामुळें तिचा जेव्हां अपमान केला त्या घटकेपासून माझ्या मित्राची ग्रहदशा सुरू झाली.

पुढें त्याची बायको घरांत नांदायला आली. माझ्या मित्राला पोटापुरती नोकरी लागली आणि कुटुंब पुनः सांवरलें. मी त्याला धन्य म्हणूं लागलों व मानूं लागलों; पण तो आपलें मन मजजवळ जेव्हां जेव्हां बोलून दाखवितो, तेव्हां तेव्हां उल्हासापेक्षां उछ्वासच मला अधिक ऐकूं येतात. मनुष्यस्वभावाची खोडच आहे. दुःखांत सुद्धां क्षणिक सुख त्याला जरूर असतें. तसेंच सुखांतहि त्याला लटक्या दुःखाचीं रडगाणीं गावींशीं वाटतात. माझ्या मित्राच्या बायकोनें बारीकसारीक कुसपटांचा बाऊ करून मित्राजवळ घळघळ एकसारखें रडत असावें. त्याचें संसारसुख म्हणजे, ओक्साबोक्शीं रडणाऱ्या बायकोचें सांत्वन करणें, सुनेला टोंचून बोलणाऱ्या जाज्वल्य आईची आपण बायकोचा कड घेत आहोंत असें न दाखवितां समजूत घालणें अगर वेळीं फूस दिल्याचा आरोपहि निमूटपणें लादून घेणें, हें होय. बहिणीनें कुरूप व अशिक्षित बायकोबद्दल त्याला खजील करावें, हें सर्व त्यानें निमूटपणें सहन केलें. माझा स्नेही बायकोला बोलत नाहीं म्हणून आईनें दिवसभर डोळ्यांतून पाणी काढावें आणि सासूनें भलत्याच गोष्टी अंगीं लावल्यामुळें सारी रात्र त्याच्या बायकोनें रडून काढावी. रात्रंदिवस अश्रुधारांच्या वर्षावापुढें त्याच्या संसारसुखाच्या कणसाचा फुलोरा धुवून गेला आणि बिनदाण्याचें ताट जसें लौकर वाकावें व सुकावें तसा माझा मित्र निरुत्साही होऊन खंगून गेला.

सासवासुनांचे बेबनावाचे मुद्दे इतके क्षुल्लक असत कीं, त्यांत चीर करून तो बोलला असता तर माझा मित्र मूर्खच ठरला असता. आई-बहिणींचे त्याच्यावरती इतके उपकार झालेले कीं, स्त्रीसुखाचीच काय पण स्वतःच्या जीविताची त्यानें आहुति दिली असती तरी तो त्याचा स्वार्थ-

त्याग उपकाराच्या फेडीपायीं यःकश्चित् ठरला असता. मित्राची आईहि समजूतदार. पण मुलाच्या सुखासाठींच त्याचें लग्न केलें ही कल्पना तिला नीटशी पटली नसावी. तिनें आपण होऊन सुनेस व मुलास मोकळीक दिली नाहीं. वडील मंडळींची अदबी, शेजाऱ्यापाजाऱ्यांनीं चांगलें म्हणावें ही महत्वाकांक्षा, तेव्हां त्यांनीं उभयतांनीं मोकळीक घेतली नाहीं. बायकांच्या मनांत मत्सर सारखा वावरत असतो. आईला मुलगा चोवीस तास हवाहवासा वाटतो. मग त्यांत भाग पाडणाऱ्या सुनेबद्दल तिला मत्सरच वाटूं लागतो नाहीं तर काय! वडील मंडळींची अप्रतिष्ठा होत आहे, असें म्हणून तिनें त्याच्या वर्तनास आळा घातला तरी अंतर्यामीं पेटलेला मत्सरच तिच्या तोंडून हें वदवीत होता. याच्या उलट कुटुंबांतील इतर मंडळींशीं बोलण्यासवरण्यांत नवऱ्याचा काल वायफळ जाऊं लागला कीं त्याची बायको चडफडत असे, ती मत्सरानेंच ना! अशा तऱ्हेनें दुहेरी कात्रींत माझ्या मित्राच्या भावनांचे एकसारखे कपटे उडत असत. जिव्हारीं जखमा होऊन त्यांतून अश्रूंचे पाट वाहतांना पाहून मीं किती वेळां तरी त्याला धीर दिला असेल, शांत केलें असेल.

मित्राचा संसार वाढला; मुलेंबाळें झालीं. तीं आजारीं पडूं लागलीं; त्यांतील एक दोन गेलीं; मोठीं मुलें दांडगाई करूं लागलीं. या दरेक बाबतींत सास्वासुनांचे खटके उडूं लागले. त्याची बायको दुःखानें व संतापी वागणुकीनें मित्राला भंडावून सोडूं लागली. सासूनें सुनेच्या कागाळ्या व बायकोनें मुलांच्या कागाळ्या सांगण्याची वेळ ठरलेली. सकाळची जेवणाची वेळ, संध्याकाळीं ऑफिसांतून आल्याबरोबर व रात्रीं जेवण्याची वेळ, अशा हटकून वेळीं घरांत कचकचाट सुरू करण्याचा त्या दोघींनीं जणूं विडाच उचलला होता. माझ्या मित्रांत आईला घराबाहेर घालवून देण्याचें धैर्य नाहीं, बायकोला बेदम झोडपण्याची ताकद नाहीं, म्हणूनच त्या दोघी त्याचे लोळेबोके तोडून त्याला नकोसें करीत आहेत असें मला वाटतें. त्याचें मन तो ज्या ज्या वेळीं मजजवळ बोलून दाखवितो, त्या त्या वेळीं येवढ्या मोठेपणींहि त्याच्या डोळ्यांतून घळघळ अश्रू वाहूं लागतात. माझा मित्र धैर्याचा मेरु. जगाशीं झगडतांना त्यानें कितीतरी कष्ट सोसले, वर्मी घाव सहन केले; पण त्याचें मनोधैर्य सुटलें

नाहीं; त्याची समाधानी आणि उल्हसित वृत्ति नाहींशी झाली नाहीं. दीर्घोद्योग, प्रामाणिकपणा, लोकसेवा, वक्तशीरपणा या गुणांमुळें त्याला त्याच्या बरोबरचे लोक आदर्श समजत. पण याच धैर्याच्या मेरूच्या पोटांत कोण ही कालवाकालव ! आणि त्याच्या प्रचंड स्वार्थत्यागाचें हेंच का बक्षीस त्याची मंडळी त्याला देतात !

पुरुषांचीं मनांतलीं दुःखें क्वचितच नजरेस पडतात. बारीक वैयक्तिक दुःखांचें प्रदर्शन देवळाच्या कट्टयावर, भगिनीसमाजाच्या मैदानावर, नदीच्या पाणवठ्यावर, धुण्याच्या चौकांत, स्त्रिया जशा बिनदिक्कत मांडतात, तसें पुरुषाला करतां येत नाहीं. त्याच्यावर कुटुंबाची जी सर्व जबाबदारी येऊन पडते, त्यामुळें त्याला गंभीरपणा धरावा लागतो. बाहेर जगाशीं संबंध म्हणून त्याला बारीकसारीकच काय, पण मोठमोठीं दुःखेंहि गिळून फस्त करावीं लागतात. तो उठल्यासुठल्या बायकांप्रमाणें डोळ्यांतून पाणी काढीत नाहीं, आदळआपट करीत नाहीं, सर्व आळीला ऐकूं जाईल इतकें स्वतःच्या मनाशीं त्याला बोलतां येत नाहीं, बेमालूम कांगाव करतां येत नाहीं, ही त्याच्यांत मोठीच कमतरता आहे. स्त्रियांना घरांतच अहोरात्र वागावयाचें असतें, जगाची त्यांना पर्वा नसते, आणि ज्या जगाबद्दल साळूताईला भ्यावेंसें वाटतें, तें जग तरी तिच्यासारख्याच बाळूताईनीं भरलेलें ! पुरुष याचा वचपा खजिन्याच्या किल्ल्या आपल्या ताब्यांत ठेवून, खर्चाची रसीद तोडून, घरांतील मंडळींशीं अबोला धरून करतोच; पण या झटापटी वीरवृत्तीच्या पोषक असल्या तरी संसारसुखाच्या ठिकऱ्या उडविणाऱ्या आहेत, आणि पुरुषांच्या मनाच्या चिंध्या करणाऱ्या आहेत.

पुरुष हा कुटुंबाचा पोशिंदा असतो. ज्याच्याजवळून पुष्कळ काम करून घ्यावयाचें आहे, अशा मार्कणीच्या बैलाला सुद्धां यथास्थित व पूर्ण विश्रांति द्यावी लागते; पण हे मूलभूत महत्त्वाचे हक्क किती पुरुषांच्या वांट्यास येतात ! पुरुषाला ज्या गोष्टी आवडावयाच्या नाहींत त्या हट्टानें करावयाच्या, सासूवरचा रोष काढण्यासाठीं बायकोनें नवऱ्याला टोंचून बोलावयाचें, आणि सुनेवरचा सूड उगवण्यासाठीं आईनें मुलाची कानउघाडणी करावयाची, असले आततायी प्रकार मुद्दाम करणाऱ्या स्त्रिया कांहीं कमी नसतात. दक्षिणी कुटुंबाची घटनाच दुःखमूलक आहे. एक पुरुष कमाव-

णारा असला तर त्याच्यावर अवलंबून राहणाऱ्या तीनचार तरी बायका असावयाच्या. त्यांतील कांहीं म्हाताऱ्या, कांहीं विधवा, कांहीं नवऱ्यानें टाकून दिलेल्या, तर कांहीं अविवाहितच ! या सर्वांचा रिकामपणचा कार्यक्रम कर्त्या पुरुषाला त्रास देऊन, त्याच्या गृहसौख्याची राखरांगोळी करावयाची हाच होऊन बसतो. विधवाविवाह रूढ होत नाहीं हें महाराष्ट्रीय कुटुंबीयांचें दुर्दैव होय. तो रूढ झाला असता तर रिकामटेकड्या, असंतुष्ट आणि परोपजीवी बालविधवांनीं घरोघर जी कचकच चालविली आहे ती एकदम नाहींशी झाली असती, कुटुंबें सुखी झालीं असतीं.

कुटुंबांत जर कोणी अप्रिय माणूस असेल तर तो कुटुंबाचा कर्ता आणि पोशिंदा. इतर प्रत्येक व्यक्तीस तो निष्ठुर, पक्षपाती, आपमतलबी, चिक्कू, घुम्या, क्रूर आणि बेफिकीर असा दिसत असतो. परोपकाराच्या अनाठायीं वर्षावानें कृतघ्नतेच्या पावसाळी छत्र्या उगवतात. मनुष्य जर कोणाचा अगदीं कळकळीनें द्वेष करीत असेल तर तो त्याला अन्नाला लावणाऱ्याचा व अन्न घालणाऱ्याचा. प्रत्येक व्यक्तीस असें वाटतें कीं, कमावत्या पुरुषानें आपल्याच हौशी फेडाव्यात. पण ज्याला कुटुंब चालवावयाचें असतें त्याला समदृष्टीचें, न्यायीपणाचें, स्वार्थत्यागाचें जर कांहीं बक्षीस मिळत असेल तर सर्वांकडून होणाऱ्या एकजिनसी तिरस्काराचें होय. सर्वांचें पुरें करण्यासाठीं बहुतेक वेळीं त्याला स्वतःला कोरडेंच राहावें लागतें. जेमतेम अंगावर चिरगूट, कोणाच्याच उपयोगाची नाहीं असल्या अडगळीच्या जागीं बसलेला, इतरांच्या सोयीप्रमाणें दोन घांस गुपचूप खाऊन आपल्या कामावर झटकन निघून जाणारा इसम हाच हटकून कुटुंबाचा कर्ता असावयाचा. सगळयांना भिऊन भिऊन वागणाऱ्या या प्राण्याला इतरांनीं पायदळीं तुडविला नाहीं तरच नवल ! कुटुंबसंग्रह हेंच त्याचें एक ध्येय असतें. क्षणिक विकारवशतेच्या आधीन होऊन जिव्हाळ्याचे संबंध तोडण्यास तो तयार होत नाहीं. इतरांच्या परोपकाराच्या दडपणांतून तो निघाला असें बजावणारा त्याचा भूतकाळ, सर्वांच्या समाधानावर स्वतःचें समाधान आहे असें सांगणारा त्याचा वर्तमानकाळ, आणि इतरांच्या सहानुभूतीच्या पाखरणीखालीं आपल्यामागें उघडा पडलेला संसार नांदेल असें आश्वासन देणारा त्याचा भविष्य-

काळ, हे त्याला पक्षपाती होऊं देत नाहींत. पण ही व्यापक दृष्टि इतरांना नसते. त्यामुळें प्रत्येकजण आपापल्यापरी अद्वातद्वा वागून कर्त्या पुरुषास रंजीस आणतो. "मीच कां मग कमी करूं?" असें म्हणून दरेकजण बेताल वागत असतो, उधळपट्टी करीत असतो. त्यामुळें कर्त्याच्या मनाचें कांबळें नेहमीं निष्ठुर वितंडवादी व्यक्तींच्या कांटयांवर टाकलेलें दिसतें. त्या कांबळयाच्या चिंध्या चिंध्या झाल्या नाहींत तर त्या इतरांच्या केवळ दयेमुळेंच.

सख्खेसावत्र हें तर सर्व भांडणाचें मूळ असतें. आणि त्या पुरुषाची विटंबना अशी कांहीं होते कीं, मूर्खपणाची त्याला अद्दलच घडावी. घडघडीत पहिलीं मुलें जिवंत असतां पुरुषाशीं लग्न करणाऱ्या बाईला त्यांचा द्वेष करण्याचा काय अधिकार आणि कारण? पहिल्या मुलांनीं तरी बापानें आपल्यासाठीं कष्टी राहावें असा का हट्ट धरावा? बाप कष्टी राहिला तर त्याचें कामधंद्यांतलें मन कमी होईल, पर्यायानें त्यांनाच नुकसान होईल, हें जाणण्याची बुद्धि त्यांच्या ठिकाणीं नसली तरी त्यांना बापाविरुद्ध चिथावून देणाऱ्या उपद्व्यापी शेजाऱ्यापाजाऱ्यांनीं या गोष्टीचा विचार नको का करायला? ज्या ज्या वेळेला पहिल्या मुलांचा सावत्र आई हेवा करते, त्या त्या दरेक वेळेला मृत पत्नीची करुण विनवणी त्याच्या दयेचा अंत पाहात असते. पहिल्या मुलांचा द्वेष करतांना अशा दुसऱ्यापणच्या बायका एकटया मुलांचाच छळ करीत नसून प्रत्यक्ष नवऱ्याचेहि हाल हाल करीत असतात. पण मत्सर हा नेहमीं आंधळा असतो. तो डोळे मिटूनच आपला खंजीर चालवितो. मग तो शत्रूला कंठस्नान घालो कीं जिव्हाळयाच्या माणसाच्याच काळजाचा ठाव घेवो, त्याची त्याला पर्वा नसते.

पुरुषाच्या भावना दुखावल्या तरी तो बाहेरून तसें दाखवीत नाहीं, दीन होऊन कोणाला शरण जात नाहीं. दरेक कुटुंबवत्सल पुरुषाला कुटुंबकलहाची चांगलीच झळ लागलेली असते. पुरुष हा अजून तरी कुटुंबाचा पोशिंदा आहे. त्याच्या श्रमांच्या मानानें त्याला समाधान आणि शांति हीं मिळालीं पाहिजेत. अगदीं मतलबी विचारानें पाहिलें तरी त्याचें मन न दुखावणेंच अधिक फायद्याचें होईल. त्याला समाधान असलें तर तो जास्त हुरुपानें कामधंदा करील. त्याला जर एकजुटीचा पाठिंबा

असला तर तो यशस्वी रीतीनें घराबाहेरील लढा लढेल व कुटुंबाच्या वैभवांत एकसारखी भर टाकीत राहील. याच्या उलट त्याला असंतुष्ट ठेवल्यानें सर्व कुटुंबच असंतुष्ट राहील, वेळीं दुःखांतहि राहील. कुटुंबांतील दरेक व्यक्तीनें बायकामुलें, वृद्ध वडील-मातोश्री, विधवा बहीण-भावजया, अविवाहित बहिणी व मुली, भाऊ, या सर्वांनीं आपापला खरा दर्जा ओळखावा. न्याय्य मागण्या असतील तेवढ्यापुरताच हट्ट धरावा म्हणजे सहसा कुटुंबक्लेश उद्भवणार नाहींत. आपल्या हक्कांची फाजील महती वाढविल्यानें दुसऱ्याची एकतर गळचेपी होईल, नाहीं तर दुसऱ्याशीं झुंज तरी करावी लागेल. पुरुषाला घरांतल्या घरांत दुसरें कोणी गळचेपी करणारें अगर झुंज खेळणारें नको असतें. घराबाहेर पाऊल टाकतांच तीव्र जीवनकलहात त्याला अहोरात्र दोन्ही हातांनीं पट्टा चालवीत लढावें लागतें. दमल्याभागलेल्या पक्षाला घरट्यांतून कोणीं हुसकून लावलें तर तो टपकन् मरून पडतो. कर्त्या पुरुषाला कुटुंबकलहाचा वणवा जाळून खाक करतो. दुनियेच्या लज्जेनें तो स्वतःचें दुःख दुसऱ्याजवळ बोलून दाखवीत नाहीं; पण त्याच्या होरपळलेल्या भावनांचा आगभडका त्याला शांति लाभूं देत नाहीं. त्या भावना त्याच्या मनाशीं आपलें दुःख अगदीं हुंदके देत देत ओकतात. हिमालयाचे हुंदके हे पोटांतल्या पोटांतच असावयाचे. त्याचें वरचें पाषाणकवच इतकें जाड आहे कीं, हुंदक्यांना तें बाहेर पडूं देत नाहीं. आपणाला दिसले नाहींत म्हणून काय झालें! हुंदक्यांनीं तो बेजार होऊन निश्चेष्ट पडला आहे. निरुत्साहानें त्याचे हातपाय, डोकें ह्यांचें गारठून बर्फ होऊन तो थंड पडलेला आहे. कुटुंबक्लेशानें होरपळलेला पुरुष असाच कर्तव्यशून्य होतो आणि असाच कुचकामाचा बनतो.

# ८

# वंशवेलीचीं फळें

आर्थिक ताण आणि वैयक्तिक सुखाच्या लालसेचा अतिरेक ह्यांच्या तडाख्यांत एक अत्यंत जिव्हाळ्याची, हौसेची, मानववंशाच्या सातत्यतेची एक बाबत अशी सांपडली आहे, कीं ह्या दोन्ही आपत्ति दूर झाल्या तरच एकंदर मानवजातीचा निभाव लागणार आहे. ही बाबत म्हणजे संततीची होय.

स्त्रीपुरुषसंबंधांतून संतति निर्माण व्हावी ही नैसर्गिक क्रिया. आणि वैषयिक बाबतीच्या आकर्षणाकरवीं प्राणिमात्रांकडून वंशवृद्धीचें काम करून घेणाऱ्या निसर्गाची योजना कौतुकास्पद नाहीं असें कोण म्हणेल ! पण निसर्ग संतति निर्माण करूनच थांबत नाहीं. प्राणिमात्राच्या ठिकाणीं अपत्यप्रेम त्यानें निर्माण केलें आणि तें अपत्यप्रेम प्राणिमात्राचा एक अवश्य स्वभावघटक झाला. माणसाला बुद्धि जास्त. त्या बुद्धीच्या योगानें त्यानें मानववंश निरनिराळे वेगळे पाडले. त्या मानववंशाच्या वृक्षावरील स्वतःच्या कुटुंबवंशवृक्षाच्या फांद्या निरनिराळ्या निवडल्या तरी त्या फांद्यांच्या शेवटाचीं पानें नवीन धुमार उत्पन्न होऊन तो वंशवृक्ष अबाधित चालू ठेवतील म्हणून आतुरतेनें वाट पाहत असतात. कुटुंबाचा सांस्कृतिक इतिहास, शारीरिक सामर्थ्य, लौकिक, प्रतिष्ठा हीं अखंड सतेज राहावींत ह्यासाठीं माणसानें नैसर्गिक अशा विषयलालसेला किती तरी बंधनें घातलीं आहेत. कुटुंबवृक्षाची अबाधित वाढ होत राहावी, त्याला फुटणाऱ्या निरनिराळ्या फांद्यांतहि एकच सांस्कृतिक रस खेळावा, त्यांना कुटुंबाची प्रतिष्ठा, ऐश्वर्य, संपत्ति प्राप्त व्हावीं ह्यासाठीं विवाहसंस्था निर्माण झाली असेंहि

म्हणतां येईल. जगांतील विवाहसंस्थेकडे आपण जर साकल्यानें पाहिलें, तर त्या संस्थेभोंवतीं विधिनिषेधाच्या उभारलेल्या तटबंदी ह्या दरेक कुटुंबाच्या वंश-रक्षणासाठीं, त्याच्या वंशाच्या उत्कर्षासाठींच निर्माण केलेल्या दिसतील. व्यभिचाराचा निषेध हा वैवाहिक गुन्हा ठरविण्यांत आला, तो तरी कुटुं-बाच्या संततींत रक्ताची सरभेसळ होऊं न देण्यासाठींच. ही संततीची बाबत स्त्रीपुरुषाची अत्यंत जिव्हाळ्याची पवित्र आणि सोज्वळ अशी अनादि-कालापासून होऊन राहिली आहे, आणि पुढेंहि अनंत कालापावेतों तशी ती राहणार हें निःसंशय. स्त्रीपुरुषांचे प्रेमसंबंध कितीहि उत्कट असोत कांहीं विवक्षित कालानंतर तेहि नीरस वाटूं लागतात. त्यासंबंधाचें फळ म्हणजे संतति ह्याबद्दल तीं उभयतांहि कासावीस होऊं लागतात. स्त्रीपुरु-षांच्या मनांत, विशेषतः स्त्रियांच्या मनांत, प्रेमाची जी कांहीं भरघोंस पालवी फुटत असते तींत स्त्रीपुरुषप्रेमाबरोबरच अपत्यप्रेमाची कोंवळी पालवी फुटत असते. स्त्रीपुरुष एकमेकांना कंटाळण्याच्या अगोदर दोघांचेंहि तिसऱ्यावर म्हणजे त्यांच्या संततीवर प्रेम जडूं लागतें. मूल म्हणजे तरुण स्त्रीपुरुषांचें प्रेमाचें दृश्य फळ; प्रौढ स्त्रीपुरुषांच्या कौतुकाचा विषय; वृद्धांचा आधारस्तंभ. स्त्रीपुरुषांच्या अवस्था जसजशा पालटतात, त्यांच्या ठिकाणचें तारुण्य, शक्ति आणि आकांक्षा, ज्या प्रमाणांत कमी कमी होत जातात, त्या प्रमाणांत त्यांच्या संततीची अवस्था पालटत जाते, तिच्या ठिकाणची शक्ति वाढत जाते, आईबापांच्या स्वतःच्या अपुऱ्या आकांक्षा पुऱ्या करण्याचें सामर्थ्य त्यांच्या ठिकाणीं आपोआप निर्माण होतें. वंश-वृक्ष हा अंबाडीच्या दोरखंडाप्रमाणें असतो. मूळच्या बटांचीं शेवटें बारीक होऊं लागण्याच्या ठिकाणींच नवीन बटांचीं टोकें सुरू होतात आणि असा हा क्रम एकसारखा भरघोंसपणें चालत असतो. वंशवृक्षाची ही अशी स्थिति असते. स्त्रीपुरुषांचें सामर्थ्य-तेज कमी होण्याच्या अगोदर त्यांच्या कुटुंबांत चिमुकले जीव निर्माण होतात. वडील मंडळींचा ऱ्हास होण्याच्या अगोदर तरुण मंडळींचा उत्कर्ष झालेला असतो. आणि अशा तऱ्हेनें दरेक कुटुंब अखंडित आणि भरघोंस वंशवृक्ष जतन करीत असतें.

संततीची पैदास, तिची समृद्धि होणें आणि तिची सुस्थिति राहणें ह्या गोष्टी तर मानववंशाच्या दृष्टीनें अत्यंत जरूरीच्या होत. जगांतील स्वतंत्र

देशांनीं राष्ट्राच्या भौगोलिक मर्यादेंत होणाऱ्या संततीची पैदास, तिचा उत्कर्ष आणि तिचें स्वास्थ, ह्या एका महत्त्वाच्या बाबीवरच भार देऊन आपले राष्ट्रीय कार्यक्रम आंखले आहेत. दुसऱ्याचे राष्ट्रीय कार्यक्रम हाणून पाडण्याच्या ते युक्त्या योजीत आहेत. वंशवृद्धि हें अगदीं पुण्यकर्म आहे, आणि जीं निरनिराळीं ऋणें दरेक माणसानें अवश्य फेडलीं पाहिजेत त्यांतील संतति निर्माण करणें हें पितृऋण फेडल्यावजा समजलें जातें. एवढें ह्या विषयाचें महत्त्व आहे. परंतु ही वंशवृद्धीची बाब चालू काळांत आम्हां हिंदवासीयांना एक मोठीच आपत्ति वाटत आहे. सगळ्या जगांतच लोकसंख्या वाढत आहे, पण इतर राष्ट्रें आपापल्या वाढत्या लोकसंख्येसाठीं दुसऱ्यांच्या मालकीचे प्रदेश हिसकावून घेऊं पाहत आहेत आणि आम्ही आमची लोकसंख्या कमी करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगीत आहोंत ! तेजहीन, बलहीन आणि परकी सत्तेचे गुलाम असलेल्या हिंदु लोकांनीं निःसत्त्व प्रजा वाटेल तितकी निर्माण करावी आणि अन्नान्नदशा सर्वांचीच आपोआप होऊं द्यावी असें कोणीच शहाणा माणूस म्हणणार नाहीं. आपल्या देशांत मावेल तेवढीच प्रजा उत्पन्न करावी असा दंडक कोणतेंच स्वतंत्र राष्ट्र स्वतःला घालून घेत नाहीं. राष्ट्राच्या दृष्टीनें वाढती प्रजा हें एक वैभवाचें चिन्ह आहे; पराक्रमाचें साधन आहे; राष्ट्राचें बल आहे. राष्ट्रीय दृष्ट्या पाहिलें तर संततिनियमनाची चळवळ घातुकच ठरेल. त्यांतून संततिनियमनाची चळवळ आणि यातायात करणारे लोक पांढरपेशा सुखवस्तू समाजांतील, कीं ज्यांची सुसंस्कृत संतति जितक्या जास्त प्रमाणांत पैदा होईल तितक्या प्रमाणांत एकंदर राष्ट्राची प्रगति आणि दर्जा वाढणार !! खालच्या वर्गांतील, अशिक्षित, अज्ञानी, गरीब आणि अनेक शारीरिक व्याधींनीं जर्जर झालेले लोक बिनदिक्कत प्रजा यथेच्छ पैदा करीत आहेत, भुकेनें मरणाऱ्या अनंत जीवांचें पोषण करण्याचें ओझें समाजाच्या गळीं बांधून निरुद्योगी भिक्षेकरी वर्गांचें पालनपोषण करण्याची जबाबदारी त्याच्याकडून पुरी पाडवून घेत आहेत. ज्याला आपल्या संततीची जोपासना करण्याचें सामर्थ्य नाहीं, संतति कमावती होईपावेतों पोसण्याचें सामर्थ्य नाहीं, तिला कामधंद्याला लावून देण्याची ज्यांच्या अंगांत शक्ति नाहीं, अशांनीं खुशाल समाजांत अनाथ आणि उपाशी मरणारीं मुलें

आणून सोडून देणें ह्यासारखी मोठी सामाजिक आपत्ति नाहीं. समाजाच्या उत्कर्षाच्या दृष्टीनें पाहावयाचें तर व्याधिष्ट, विकृत प्रकृतीच्या अगर प्रवृत्तीच्या स्त्रीपुरुषांना संतति निर्माण करण्याची आणि तिच्या निमित्तानें स्वतःच्यांतील दोष समाजांत पिढ्यानुपिढ्या चालू ठेवण्याची बंदी असली पाहिजे. संततिनियमन जर कोणीं करावयाचें असेल तर तें खालच्या जातींनें व निराधार कंगालांनीं करावें. पांढरपेशा समाज अशाच प्रकारें अधिकाधिक संततिनियमन करीत राहील आणि खालचा समाज संततिनिष्पत्तीबद्दल बेफाम बेफिकीर राहील तर चार दोन पिढ्यात असेहि दृष्टोत्पत्तीस येईल कीं सर्व समाज हलक्या प्रवृत्तीच्या, किडक्या प्रकृतीच्या, बुद्धिहीन, कंगाल आणि निस्तेज व्यक्तींचा होईल. संततिनियमनाची सामाजिक दृष्टीनें मर्यादा हीच ठरवावी लागेल. ही आपत्ति डोळ्यांआड करून चालावयाचें नाहीं.

पांढरपेशा समाजांत अलिकडे एकाएकीं जो संततीबद्दलचा मोठा प्रश्न येऊन पडला आहे तो थोडाफार बिकट आर्थिक परिस्थितीमुळें व स्वतःच्या सुखाच्या लालसेच्या अतिरेकामुळें होय. मुलांची जोपासना, त्यांचें शिक्षण वगैरे करण्यापुरतें तरी आईबापांच्या जवळ द्रव्य पाहिजे; नाहीं तर बुद्धिमान् आणि कर्तबगार मुलेंहि शिक्षणास पारखीं होऊन समाजांतील स्वतःच्या जन्मजात उच्चस्थानास अंतरतात. पण मुलांचें शिक्षण आणि संगोपन ह्यासंबंधींच्या कमावत्या पांढरपेशा लोकांच्या कल्पना घेतल्या तर त्या तितक्याशा योग्य मर्यादशील नसतात. शेंदोनशें रुपये मिळवणाऱ्यानें आपला मुलगा आय्. सी. एस्. झाला पाहिजे अगर आपली साधारण स्वरूपाची मुलगी संस्थानिकाकडे पडली पाहिजे अशा बढाईच्या महत्त्वाकांक्षा ठेवणें हा मोठाच वेडेपणा होय. पांढरपेशा समाजास आज जास्तींत जास्त खर्चिक अशा हिंदुस्थानांतील अगर परदेशांतील शिक्षणक्रमांचीं सुखस्वप्नें पडत आहेत. मुलांचें कौतुक करण्याच्या भरांत ते भलत्याच भरीस पडत आहेत असें म्हणावें लागतें. मुलांस शिक्षण देऊन स्वावलंबी करावयाचें, त्यांच्या शरीराची काळजी घेऊन त्यांस बळकट करावयाचें, त्यांच्या शीलाबद्दलची खबरदारी घेऊन त्यांना तेजस्वी करावयाचें, आणि अशा या कर्तबगार, बळकट तेजस्वी तरुणांना स्वतःच्या कर्तबगारीनें आपला उत्कर्ष साधतां

यावयाचा नाहीं थोडाच ! आपली महत्त्वाकांक्षा मुलांच्यावर लादण्यात मुलांचा उत्कर्ष आपण करीत नसून स्वतःच्या अनाठायी महत्त्वाकांक्षा त्यांच्याकडून बळजबरीनें पुऱ्या करून घेत आहोंत हें दिमाखखोर श्रीमंत आईबापांनीं पुरें ध्यानांत आणावें. त्यांच्या ह्या अवास्तव महत्त्वाकांक्षा त्याच्यापाशीं असलेल्या मर्यादित आर्थिक साधनांत पुऱ्या व्हावयाच्या तर त्यांना एकापेक्षां अनेक मुलें परवडणार कशीं ! आणि म्हणून मोठमोठ्या श्रीमंतांच्याकडेहि ह्या संततिनियमनाचा प्रचार अगदीं झपाट्यानें होत आहे. आपलें वैभव विभागलें जाऊन हलकें दिसूं नये, आपलीं मुलेंबाळें मिळकतीचे अनेक भाग पडल्यानें गरीब होऊन मध्यमप्रतीच्या लोकांत जाऊन पडूं नयेत, ह्या उद्देशानें श्रीमंत कुटुंबेंहि आज संततिनियमन करीत आहेत. वैभवाबद्दलचा केवढा हा वृथाभिमान ! आपल्या मुलांबाळांच्या कर्तबगारीचा केवढा हा उपहास ! आपल्या मुलांना नवीन वैभव वा ऐश्वर्य स्वतःच्या कर्तबगारीनें कमावतां येणार नाहीं ही कल्पनाच केवढी उपमर्दक आहे ! तसेंच एकट्या सुखलालसेच्या मागें लागलेल्या मंडळींना वरचेवर होणाऱ्या संततीची मोठीच अडचण होते, त्यामुळें त्यांचा बराच हिरमोड होतो. संततीमधील अंतर हें ज्यांनीं त्यांनीं मुलाची आणि त्याच्या आईची शरीरप्रकृति पाहूनच कमीजास्त नियंत्रित करावयाचें असतें आणि तेवढें दरेकानें करावेंहि. पण केवळ आपल्या विषयसुखाच्या आड संतति येते म्हणून संततिनियमन करणारे हे समाजाचे व स्वतःचे अनेक प्रकारें गुन्हेगार होत असतात. समाजाला तेजस्वी मुलांची जास्तींत जास्त संख्या पाहिजे ही सामाजिक अपेक्षा केवळ विषयसुखाच्या लालसेनें निष्फळ ठरविणारे स्त्रीपुरुष हे राष्ट्राचे गुन्हेगार होत. विषयवासना ही कांहीं वयापर्यंतच प्रखर राहते. ती मालवण्याच्या सुमारास जर वात्सल्यप्रेमाची ज्योत तेवत राहिलेली नसेल तर माणसाचें उतारवयांतील आयुष्य अगदीं कष्टमय जाईल. अपमृत्यु, आकस्मिक आपत्ति, अपघात ह्यांचीहि मोजदाद दरेक आईबापांनीं घेतली पाहिजे. माझ्या पाहण्यांत तरी तीन चार उदाहरणें अशीं आहेत कीं, दोन तीन मुलें होतांच त्यांनीं संततिनियमनाचे (शस्त्रक्रियेचे) अंतिम उपाय योजले. दुर्दैवानें त्यांचीं मुलें (अत्यंत श्रीमंती थाटांत आणि काळजींत जोपासना होत असतांनाहि) त्यांच्या देखत अल्पवयांत निवर्तलीं

आणि आज ते निपुत्रिक आईबाप पुत्रशोकांत दिवस काढीत आहेत. संतति थोडी असावी हें एक जें बंड अलिकडे निघालें आहे त्यामुळें कमींत कमी संतति किती असावी ह्याचाहि धरबंध राहिला नाहीं. पांढरपेशा समाजानें पितृऋण फेडण्यांत जाणूनबुजून कुचराई चालविली आहे असें म्हणावें लागेल. पन्नास वर्षांपूर्वीच्या लोकांच्यांत मोठमोठे संसार चालविण्याची धमक होती, त्यांना अनेक मुलें झालीं तरी त्यांच्या शिक्षणाची अगर लग्नाची जबाबदारी पुरी पाडण्याची त्यांच्यांत हिंमत होती आणि कांहीं कांहीं कुटुंबांत आठ आठ मुलगे व तितक्याच मुली एवढा विस्तार असूनहि त्यांच्या आईबापांनीं सर्वांचें यथास्थित चालविलें असल्याचीं उदाहरणें जुन्या पिढींत आढळतात. सुप्रजाजनशास्त्राचा नियम पाहतां उत्तरोत्तर होणारीं मुलें हुषारींत आणि कर्तबगारींत जास्त लायक निपजतात. हे सर्व नियम आणि सिद्धान्त लक्षांत घेतां एक दोन मुलें होतांच अजिबात संततिनियमन करणें धोक्याचेंहि ठरेल.

सामाजिक जरूरीच्या बाबतीहि थोड्या फार लक्षांत घेतल्या पाहिजेत. तथापि आपणांस मुलें किती असावींत व केव्हां व्हावींत हा प्रश्न ज्या त्या व्यक्तींनीं सोडवावयाचा असतो. व्यक्तीची दृष्टि समाजहिताकडे तितकीच लागलेली असली पाहिजे आणि होतां होईतों सामाजिक जरूरी आणि व्यक्तीची गरज या दोन कोष्टकांत व्यक्तिमात्रानें आपले सर्व व्यापार बिनबोभाट बसविले पाहिजेत. मुलें किती असावींत हा प्रश्न ठरवितांना माणसानें अपघात, अपमृत्यु ह्यांचीहि मोजदाद घेतली पाहिजे. मुलांची मृत्युसंख्या, विशेषतः पंधरा वर्षांपर्यंत, अधिक असते; तर त्या अपमृत्यूंतून आणि दुसऱ्या आकस्मिक अपघातांतून बचावून शेवटीं निदान दोन तीन मुलें तरी शिल्लक राहावींत असा साधारण ज्यानें त्यानें विचार ठेवल्यास दरेक जोडप्यास पांच मुलें तरी व्हावींत असा नियम ठरवून देण्यास हरकत नाहीं. पांचीच्या पांची मुलें जरी जगलीं तरी तीं जड होणार नाहींत. अनेक मुलांतून एखादाच मुलगा नांव कमावून जातो, सात पिढ्यांचा उद्धार करतो आणि तो कितवा मुलगा हें सांगतां येत नाहीं. उभयतां नवराबायकोंच्या दृष्टीनें निदान दरेकानें स्वतःच्या दुप्पट तरी प्रजा निर्माण केली पाहिजे. संततीची संख्या कोणीं कितीहि ठरविली तरी दोन मुलांच्यांतील

अंतर दोन वर्षांच्या आंतले असूं नये आणि तीन वर्षांपेक्षां जास्तहि असूं नये. मुलाच्या आईला विश्रांति मिळण्यास आणि पूर्ववत् शक्ति येण्यास दोन अडीच वर्षांचा काल पुरे होतो. मूल साधारणतः वर्षसव्वा वर्षाचें होईतोंवर अंगावर असतें. तोंपर्यंत आईची शक्ति वाढत नाहीं. मूल सुटतांच हटकून गरोदरपण येतें व यामुळें मातांची तब्येत सुधारावी तितकी सुधारत नाहीं. ह्यासाठीं मूल तुटल्यानंतर दोन वर्षांचा काल जाणें जरूर आहे. दोन मुलांच्यांतील अंतर जर फार असलें तर मोठ्या मुलांचा लहान मुलाला सोबती अगर मार्गदर्शक म्हणून उपयोग होईनासा होतो; लहान मुलांची बौद्धिक आणि शारीरिक वाट खुरटते. म्हणजे साधारणपणें प्रजोत्पादनाची मर्यादा संतति संख्येपुरती पांच आणि कालापुरती सुमारें पंधरा वर्षे अशी ठरते. यानंतर संतति स्त्रीपुरुषांना कोणत्या वयांत व्हावी हा प्रश्न राहतो. स्त्रियांची शरिराची वाढ विसाव्या वर्षी संपूर्ण होते पण मुलें होण्याचें त्यांचें वय त्याच्या अगोदरच सुरू होत असतें. गरोदरपणांतहि तिच्या शरीराची अनेक प्रकारें वाढ होत असते आणि ती वाढ शरीराची वाढ थांबली नसेल तावत्कालपर्यंत विशेष अनुकूलतेनें होत असते. विशीच्या आंतील पहिलटकरणींची बाळंतपणें अधिक सोपीं जातात आणि पंचवीस वर्षांनंतरच्या पहिलटकरणींचीं विशेष अवघड जातात ह्याचें कारणहि हेंच होय. शरीराचे सर्व स्नायु संपूर्ण वाढून आपापल्या ठिकाणीं कणखर होऊन राहिले अशा स्थितींत गरोदरपणाच्या विवक्षित वाढीला वाव मिळत नाहीं, स्नायूंच्यांतील लवचिकपणा उपयोगास येत नाहीं. तीस वर्षांच्या आंत जिला मुलें होऊं लागलीं आहेत तिची संततीहि जास्त सकस आणि मोठाड असते ह्याचें कारण तिच्या गर्भास संपूर्ण वाढ होण्यास वाढत्या शरीराचा लवचिकपणा बराचसा उपयोगांत येतो हें होय. स्त्रियांना साधारणपणें पस्तीस वर्षांपुढें संतति होत नाहीं हें लक्षांत घेतां स्त्रीच्या दृष्टीनें वयाच्या विसाव्या वर्षी पहिलें मूल तिला व्हावें आणि पस्तीसाव्या वर्षी तिला शेवटचें मूल व्हावें अशा तऱ्हेचा काल ठरवितां येईल. पुरुषाचा प्रजोत्पादनाचा असा काल ठरलेला नसतो. तथापि कौटुंबिक गरजा लक्षांत घेतां त्याचाहि कांहींतरी काल ठरवावा लागेल. माणसाचें आयुष्य सर्वसाधारण साठ वर्षांचें धरलें तर त्याच्या मृत्यूच्या वेळीं

मुलांचें शिक्षण आणि मुलींचीं लग्नकार्यें हीं कांहींहि व्हावयाचीं बाकी राहतां कामा नयेत. अशा लहान भावंडांच्या जबाबदाऱ्या वडील भावंडांच्या अंगावर लोटल्या तर वडील भावंडें उमेदीच्या संसारांतच खचतात आणि त्यांच्याच पैशांतून शिक्षण घेऊन शिरजोर झालेलीं धाकटीं भावंडें त्यांना म्हातारपणीं विचारीतहि नाहींत. नाहीं तर वडील भावंडें लहान भावंडांची वास्तपुस्तहि घेत नाहींत आणि त्यांचें अपरिमित नुकसान होतें. आई-बापांची जबाबदारी स्वतः त्यांनीं पुरी केली पाहिजे. आपली जबाबदारी आपल्या मुलांच्या गळ्यांत अडकवून देणें सर्वांच्याच दृष्टीनें घातुक होय. म्हणूनच पुरुषाला शेवटलें मूल ४०।४२ व्या वर्षी व्हावें व तत्पूर्वी पंधरा वर्षांपासून म्हणजे सुमारें पंचविशीच्या आंतबाहेर पहिलें मूल व्हावें असा अगदीं सरळ नियम ठरवितां येईल.

अर्थात् जे स्त्रीपुरुष शरीरानें निरोगी, मनानें निकोप आणि बलवान् आहेत त्यांनाच हे वर सुचविलेले नियम लागू पडतील. स्वतःच्या कुटुंबांत, पितृवंशांत अगर मातृवंशांत, मानसिक वा शारीरिक विकृति वा असाध्य रोग ह्यांपैकीं कांहीं जरी असतील तरी अशांनीं संतति न होऊं दिलेली बरी. स्वतःला रोग नाहीं एवढ्यावरूनच आपणाला होणारी संतति निकोप निपजेलच असा नियम नसतो. शारीरिक व्यंगें, मानसिक विकृत्या, कुत्सित व्याधि, हे सर्व दोष दोन दोन पिढ्या टाकून एकदम प्रकट होतात. मूल ही नेहमींच हौसेची, जिव्हाळ्याची आणि आधाराची बाबत. पण तेंच जर किडलेलें अगर किडकें निपजलें तर त्यापरत्या असह्य यमयातना दुसऱ्या कोणत्या असणार ? आपलें मूल जन्मान्ध, मुकें, बहिरें, लुळें, खुजें निपजावें अगर कोड, महाव्याधि, उपदंशादि रोगांनीं पिडलेलें निघावें, हें दृश्य किती उद्वेगकारक आणि आईबापांना मरणतुल्य आहे ! आनुवंशिक अवगुण आपण मुद्दाम झांकून ठेवतों तरी ते केव्हांना केव्हां तरी संततींत प्रकट होतातच ही गोष्ट आपण दृष्टिआड करतों म्हणून थोडीच ती आपत्ति टळावयाची आहे ! उलट अशा दुर्दैवी संततीला जन्माला घालण्याचें पातक आपल्या हातून घडूं नये, आपल्याच हातानें आपल्या सुखसर्वस्वावर निखारा ठेवूं नये हा विचार अशा दुर्दैवी स्त्रीपुरुषांनीं मनांत आणावा; सर्व व्याधि, व्यंगें आणि विकृत्या ह्यांची समाजांत पुढें परंपरा

चालूं न देण्यासाठीं संतति निर्माण करण्याच्या हौसेला थांबवावें; स्वतःचें दुःखहि टाळावें.

वेलीची वाढ फळ लागेपावेतों होत असते. तिच्यांतल्या सर्व गुणावगुणाचा उत्कर्ष फळांच्या ठिकाणीं प्रकट होत असतो. तिची वाढहि फळ येतांच थांबते. स्त्री-पुरुष मिळून एक वंशवेली होय. त्यांच्या ठिकाणीं ज्या कांहीं बऱ्यावाईट प्रवृत्त्या असतील, जीं कांहीं व्यंगें आणि रोग असतील, त्या सर्वांचा उत्कट उत्कर्ष संततीच्या ठिकाणीं होत असतो. आणि त्या फळांतूनच वंशवृद्धीचीं नवीन बीजें निर्माण होऊन त्या बीजांपासूनच वंशवेली निर्माण होते, आणि अशा प्रकारें वंशवेलीचें सातत्य दरेक कुटुंबागणिक पिढ्यानुपिढ्या एकसारखें चालत राहतें. आजची वेल ही कालच्या वेलांतील गुणावगुणांची फलश्रुति आहे आणि उद्यांच्या वेलीची जननी आहे. तेव्हां ह्या वंशवेलीला फळें किती धरावींत, केव्हां धरावींत व केव्हां मुळींच धरूं नयेत, ह्याचा विचक्षणा दरेक जोडप्यानें आपापल्या सोबत्याच्या सहविचारानें ठरवावयाची आहे. सर्व मानवजातीची उत्पत्ति, अस्तित्व व उद्धार ज्या संततीवर अवलंबून आहे ती संतति निर्माण करतांना थोडा तरी समाजाचा व आपला विचार केला पाहिजे; केवळ नैसर्गिक प्रवृत्तींचे पट्टे डोळ्यांना बांधून आंधळेपणानें संततिनिष्पत्तीचें कार्य निसर्गावर सोंपवून देणारे हे समाजाचे हितशत्रू आहेत; स्वतःचे गुन्हेगार आहेत. आणि तशाच प्रकारचे गुन्हेगार संतति होण्याचें अजिबात थांबवून वंशवृक्ष वठविण्याच्या घातुक कार्यक्रमाचें अनुकरण करणारे लोक होत.

## १

# समाजरचनेंतील सुवर्णमंदिर

समाज सुसंघटित अगोदर झाला कीं लग्नसंस्था अगोदर निर्माण झाली, ह्याचा निर्णय आज कोणालाच देतां येणार नाहीं. अन्नाच्या बरोबरीनें विषयाची भूक अगदीं रानटी लोकांतहि तितकीच तीव्र दिसून येते. आणि ह्या दोन्ही भुका निभावण्याचीं साधनें दुसऱ्यापासून हिसकावून घेण्याची आणि हस्तगत झालेल्या साधनांना आपल्या हातांत ठेवावयाचें हीहि प्रवृत्ति मानवाची जन्मजात आहे. अशक्तांनीं लग्नसंस्था निर्माण केली का सशक्तांमुळे ती चिरस्थायी झाली, हा वाद आपणांलाहि आज सुटत नाहीं. एवढें खरें, कीं मनुष्यजातीला माणुसकी प्राप्त झाल्यापासूनचा इतिहास घेतला तर विवाहसंस्था ही एकच्या एक आद्य आणि अक्षय घटना समाजाची आजवर धारणा करीत आली आहे. ही संस्था निर्माण केल्याबद्दल मानवांना पश्चात्ताप कधींच झाला नाहीं. उलट दुर्मिळ मौल्यवान् जिन्नस आपण जशी नेहमीं साफसूफ करून अनंत प्रकारच्या मजबूत कडेकोट बंदोबस्तांत जतन करून ठेवतों, तद्वत् ह्या दुर्मिळ संस्थेस अनेक प्रकारच्या विधिनिषेधांनीं साफसूफ ठेवून तिच्या-भोंवतीं धार्मिक, व्यावहारिक, आणि कायद्याची अत्यंत बळकट अशी एकाहून एक बंदोबस्ताची तटबंदी रचली गेली आहे. लग्नविधि हा व्याव-हारिक असला तरी धार्मिक संकल्पाचा थोडासा तरी देखावा आजवर चालू राहिला आहे. स्त्रीपुरुषांचे आर्थिक संबंध कुटुंबांतच निर्माण होतात. ह्या आर्थिक ऋणानुबंधांनींहि लग्नसंबंधांना आजतागायत भरभक्कम ठेवलें आहे. स्त्रीपुरुषांच्या अरसपरस जबाबदाऱ्या ह्या ठरवून देऊन त्यांचें उल्लं-

घन करणारांना अगर पतिपत्नींच्या संसारी जीवनांत ढवळाढवळ करणाऱ्या तिऱ्हाइताला कायदा शिक्षा ठोठावतो. ह्या कुटुंबांत विवाहितांच्या औरस मुलांना त्यांची—आईबापांची—मालमिळकत वारसाहक्कानें मिळण्याची योजना कायद्यानेंच केली. अशा प्रकारें समाजशासन कायद्यानें निर्माण केलें. सामाजिक नीति कायद्यानें नक्की करून प्रस्थापित केली. ह्या निरनिराळ्या मजबूत आधारांनीं लग्नसंस्था त्रिकालाबाधित ठरली आहे, ठरणार आहे. ह्या संस्थेवर जमा होणारीं कोळिष्टकें, पडणारा आपद्धर्माचा पालापाचोळा, कोसळणारा असंतुष्टांचा शिव्याशाप, यांपासून तिला शक्य तोंवर अलिप्त ठेवण्यासाठीं वधूवरपसंतीचे विधिनिषेध, घटस्फोटाची सवलत ह्याहि आजवर मानवांनीं पराकाष्ठा केली आहे. समाजांतील मुख्य घटक लहान लहान कुटुंबें. कुटुंबें लग्नांतून निर्माण होतात, लग्नामुळें प्रस्थापित होतात. राष्ट्र जसें कोणत्याहि एका राज्यतंत्राशिवाय अस्तित्वांत येणें अगर टिकणें शक्य नाहीं तसा लग्नसंस्थेशिवाय कोणताहि सुसंघटित समाज अस्तिवांत येणार नाहीं व फार दिवस टिकणार नाहीं. लग्नसंस्थेची वैयक्तिक आणि सामाजिक अशा दोन दृष्टींनीं पाहणी केली तर निरनिराळ्या प्रकारच्या आकांक्षा पुऱ्या करण्याच्या योजनांचा अंतर्भाव तिच्यांत झालेला दिसेल. सामाजिक आणि सार्वजनिक दृष्टींनीं पाहतां लग्नसंस्था समाजाची परंपरा, त्याचे संस्कार व सातत्य ह्यांची जोपासना करून समाजाचा अखंड विस्तारहि साधते. निरनिराळे समाज उच्च नीच असे पराक्रमानें ठरतात, उत्कर्षाला पोहोंचतात अगर विनाश पावतात ते त्या त्या समाजाच्या अनेक प्रकारच्या परंपरांमुळें होय. पराक्रमी वर्ग थेटपर्यंत तेजस्वी राहतो, बुद्धिमान् वर्ग आपलें बुद्धिचापल्य आपल्या समाजांत पुरेंपुरें जतन करूं शकतो, व्यापारी कसब विशिष्ट समाजांत जन्मजात आढळून येतें, हें सर्व संस्कारांच्या परंपरेमुळें होय. अखिल मानवजाति जरी घेतली तरी अनेक दर्जांचे व विविध प्रकारचे मानववंश मिळून ती झालेली आहे. हे अगणित मानववंश असंख्य अशा समाजाचे मिळून झालेले आढळतील आणि त्या समाजांतहि जातिपरत्वें व देशपरत्वें निरनिराळे गट निर्माण झालेले आढळतील. ह्या गटांतील लोकांनीं आजवर फक्त त्या गटांतच लग्नें केलीं. समान दर्जाचीं, समान संस्काराचीं, समान गुणाव-

गुणांचीं स्त्रीपुरुषें लग्नाच्या योगानें निगडित झालीं तेव्हां त्यांची प्रजा आईबापांचे गुणावगुण घेऊनच जन्माला आली. आजहि रजपूत, शीख, चित्पावन ब्राह्मण, तेलंगे ब्राह्मण, काश्मिरी ब्राह्मण वगैरे कोणत्याहि जातीचे गट घेतले तरी त्यांनीं आपली संस्काराची एक विशिष्ट परंपरा कायम ठेवलेली असल्यामुळेंच तिचा परमोत्कर्ष त्यांना साधतां आला. इंग्लिश, फ्रेंच, जर्मन, अमेरिकन वगैरे समाज हेहि आपापल्यापरीनें संस्कारानें, शरीरानें एकमेकांपासून भिन्नभिन्नच होत आणि हें जें सातत्य त्या समाजांत राहूं शकलें त्याचें कारण एकजातीय स्त्रीपुरुषसंबंध तर खरेंच, पण ते संबंधहि लग्नसंस्थेनें कायम केले म्हणूनच तें साधलें. लग्नसंस्था नाहीं अशी आपण कल्पना केली तर आपल्या कुत्रीला दरवर्षी जशीं निरनिराळ्या रंगाचीं आणि जातीचीं पिलें होतात तशींच मुलें स्त्रियांना झालीं असतीं. त्या मुलांच्यांत मातेचें जें काय सातत्य असेल तेवढेंच राहिलें असतें. बाकी कोणत्याच प्रकारचें सातत्य नसलेलीं मुलें शरीररचनेनें, मनोधर्मानें, बुद्धीनें एकमेकांपासून अगदीं भिन्न असणारच. तीं एकत्र वाढलीं तरी त्यांच्या आकांक्षा, मनोधर्म, प्रवृत्ति भिन्न भिन्न असणार. अशा सरभेसळींत सुसंस्कारी जीवांचा कोंडमारा होऊन ते नामशेष होतात. एका जातीचींच नरमादी असलीं तर पैदासहि त्याच जातीची होते असें कोणत्याहि जनावराचें उदाहरण घेऊन सिद्ध करून दाखवितां येईल. अरबी घोड्यांची निपज किती काळजीपूर्वक करतात अगर हौशी युरोपियन लोक कुत्र्यांच्या जातीहि किती नेकीनें संभाळतात हें पाहिलें म्हणजे एकजातीय स्त्रीपुरुषसंबंध कां व्हावेत, ते कायमच्या स्वरूपाचे कां असावेत व तें चांगली प्रजा निर्माण होण्याच्या दृष्टीनें किती अवश्यक असतें हें समजेल. निरनिराळ्या कुटुंबांची सांस्कृतिक परंपरा आजवर टिकून राहिली असेल तर त्याचें श्रेय ह्या लग्नसंस्थेसच द्यावें लागेल. स्वैराचार हा मानवजातीनें स्वतःच्या बाल्यावस्थेंत यथेच्छ करून पाहिला पण समाज जसजसा सुसंघटित होऊं लागला तसतसा स्वैराचार त्याज्य म्हणूनच विवाहसंस्था निर्माण झाली. ज्या स्वैराचाराच्या अत्यंत अमंगल चालीला आळा घालण्यासाठीं विवाहसंस्था निर्माण झाली, तिचें ध्येय स्वैराचार हें कधींच होऊं शकणार नाहीं. स्वैराचाराला चटावलेल्या त्या वेळच्या समाजालाहि स्त्रीपुरुषांचे एकाकी

आणि कायमचे संबंध जोडणाऱ्या लग्नसंस्थेचें महत्त्व पटावें, त्यांनीं स्वतःच्या सवलती सोडून देऊन मुकाट्यानें त्या संस्थेंत दाखल व्हावें एवढी ती किंमती संस्था, त्या अडाणी, स्वैराचारी, आडदांड आणि रानटी लोकांनाहि वाटली. पण सामाजिक सुधारणेच्या आघाडीवर आपण उभे आहोंत अशा डांगोरा पिटून त्याच्या तालावर नंगा नाच करणारे आजचे बदफैली लोक विवाहसंस्थेचें अंतिम ध्येय स्वैराचार ठरवूं पाहात आहेत ! मानवजातीच्या परंपरेची, जिव्हाळ्याची, नात्यागोत्यांची राखरांगोळी करून अनिर्बंध संभोगाकडे सर्व समाजास कूच-कदम घेऊन जाण्याची भाषा बोलत आहेत. आत्यंतिक अशा घाणेरड्या आणि टाकाऊ कल्पना समाजापुढें मांडण्यास फारसें धैर्य लागत नाहीं, विद्वत्ता असण्याची गरज नसते. विवाहसंस्था मोडून टाकली म्हणजे ह्या टोळीचे हात गगनाला पोहोंचणार आहेत. वास्तविक ह्या टोळीलाच काय पण कोणत्याहि पशुवृत्ती-बदफैली टोळीला आज स्वैराचाराच्या कर्दमांत यथेच्छ लोळण्याची मुभा असतांना आजच्या लग्नसंस्थेवर त्यांचा आरोप असण्याचें कांहींच कारण नाहीं. अनिर्बंध स्वैराचार हेंच जर त्यांचें ध्येय असेल तर बहीण-भाऊ, आई-मुलगा, बाप-मुलगी अशा पवित्र नात्यांचीहि प्रीति बाळगूं नये. तो त्यांच्या आचार-स्वातंत्र्याचा, आवडीचा, संस्कारांचा व अतिखुषीचा सवदा होईल. पण समाजापुढें स्वैराचाराची किंवा अनिर्बंध संभोगाची प्रथा आदर्श म्हणून मांडण्यांत प्रामाणिकपणाचा निखालस अभाव व मानवजातीच्या सुष्ठुतेबद्दलची अक्षम्य बेदरकारी, हीं दिसून येतात. आजच्या लग्नसंस्थेचें स्वरूप ज्या ज्या बाबतींत अनिष्ट प्रकारचें भासत असेल त्या त्या बाबतींत सुधारणा करण्याची भाषा बोलणाऱ्यांनीं लग्नसंस्था पाडून टाकून नीतीचें खैदान-मैदान करून, स्त्रीपुरुषांच्या अनिर्बंध स्वैराचाराची कल्पना पुढें मांडली पाहिजे अशी भलतीच समजूत ह्या लोकांनीं स्वतःची करून घेतली असली पाहिजे व ते दुसऱ्यावर विनाकारण तत्त्वभ्रष्टतेचा आरोप करीत आहेत. समाजाचें सातत्य व परंपरा हीं लग्नसंस्थेमुळें टिकून राहतात.

समाजस्वास्थ्य व आरोग्य संभाळण्याचें अवघड कार्य लग्नसंस्थेनेंच पार पाडलें आहे, स्वैराचारानें नाहीं ! वैषयिक बाबतींत माणसांच्यांत स्पर्धा, हेवा आणि क्रूरता बेफाम स्वरूपांत उत्पन्न करतात. आज जीं सुखी जोडपीं

एकमेकांच्या आधारानें आनंदांत संसार करीत आहेत, तीं तरी त्यांच्या भोंवतीं वैवाहिक कायद्याच्या रक्षणाचें सुदर्शन चक्र फिरत आहे म्हणूनच तीं निर्धास्तपणें राहत आहेत. तसें जर कांहीं कायद्याचें रक्षण नसतें तर स्त्री-प्राप्तीसाठीं किती तरी खून आणि दरोडे दिवसाढवळया पडले असते. आणि स्त्रीपुरुष-शिकारीच्या धुमश्चक्रीपुढें समाजाला दुसरें कांहींच सुचलें नसतें. समाजस्वास्थ्य समाजाची प्रामाणिक नीतिमत्ता वाढविण्यानें साधते. स्वैराचाराचा उदोउदो केल्यानें समाजस्वास्थ्य साधण्याऐवजीं समाजसंकट मात्र ओढवणार आहे. मानवांचें आरोग्य हें आईबापांच्या आरोग्यावर आणि त्यांच्या सलोख्याच्या, काळजीच्या आणि जपणुकीच्या वागणुकीवर अवलंबून राहणार. स्त्रीपुरुषांच्या एकाकी संबंधांत कुत्सित रोग होण्याची भीति नाहीं, फैलावण्याचा धोका कधींच नाहीं. कुत्सित रोगांचें उच्चाटण शास्त्रीय संशोधनानें करतां आलें म्हणून तेवढ्यावरूनच लग्नसंस्था निरुपयोगी ठरणार नाहीं. मुलांबाळांचीं शरीरें, त्यांची ठेवण, बलाबल, मानसिक वा शारीरिक आरोग्य हीं सर्व त्यांना त्यांच्या आईबापांपासून वारशांत मिळत असतात. अनुवंशिकतेचें शास्त्र वरवर पहाणारासहि लग्नसंस्थेच्या महत्त्वाची कल्पना सहज पटेल. स्त्रीपुरुषांच्या समाधानाच्या दृष्टीनें पाहिलें तर एकाकी आणि कायमचे संबंध हेच त्यांना हवेहवेसे असतात. स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य नसल्यानें त्यांना बिचाऱ्यांना स्वैराचाराचें स्वातंत्र्य मिळत नाहीं म्हणून त्यांची भलतीच कुचंबणा होत आहे ह्या काल्पनिक भीतीनें कासावीस झालेले नग्नपंथी लोक स्त्रियांच्या आकांक्षांचा जाणूनबुजून विपर्यास करीत आहेत; त्यांच्या माणूसकीची बदनामी करीत आहेत. स्त्रियांचा ओढा स्वैराचाराकडे असतो हें म्हणणें वस्तुस्थितीला धरून नाहीं आणि प्रत्यक्ष व्यवहारांत दिसूनहि येत नाहीं. संततीला जन्म देण्याची आणि पोसण्याची निसर्गानें स्त्रीजातीवर जबाबदारी टाकली आहे. त्या जबाबदारीनेंच त्या इतक्या जिकिरीस आलेल्या असतात कीं त्या विषयपराङ्मुख होतात आणि कोणातरी एका पुरुषाचा आधार घेण्यास उत्सुक असतात. हें स्त्रियांचें मानसशास्त्र आणि प्रत्यक्ष प्रपंचरहस्य दृष्टीआड करून, त्या स्वैराचारांत सामील होत नाहींत म्हणून खंत बाळगणारे दुराचारी लोक त्यांच्या आर्थिक पराधीनतेचें भलतेंच कारण समाजामध्यें

मांडीत असतात. चाळीस वर्षांनंतरच्या वयाच्या गृहस्थास नवीन शिकार साधावयाची नाहीं, चाळीस वर्षांच्या स्त्रीकडे कोणी शिकारीहि ढुंकून पाहावयाचा नाहीं, अशा ह्या प्रौढ स्त्रीपुरुषांना तुमच्या स्वैराचाराच्या सवलतीचा उपयोग तरी काय! लग्नसंस्थाच नउली तर कुटुंब तरी कुठलें असणार! आणि तें कोणाचें समजावयाचें! जनावरांच्यांत जशी जथावळ आपण पाहतों तशी फार झालें तर ह्या नवीन होऊं घातलेल्या स्वैराचाराच्या विश्वामित्री दुनियेंत आपण स्त्रियांची जथावळ पाहूं एवढेंच. आजहि स्त्रीवंश ज्या कांहीं देशांत चालले आहेत, तेथें लग्नसंस्था अस्तित्वांत असून ते वंशहि लग्नबंधनानें निगडित झालेल्या जोडप्यांतूनच उत्पन्न होत आहेत, विस्तार पावत आहेत. स्त्रियांना स्वतःसाठीं आणि स्वतःच्या अपत्यांसाठीं पुरुषांचा आधार लागतो आणि असा हा कायमचा आधार जर त्यांना कोणी मिळवून देत असेल तर ती लग्नसंस्था होय. लग्नाखेरीज स्त्रियांनीं संतति निर्माण करावी व खुशाल वाढवावी, हें एक स्वैराचाराच्या कोटींतलें बाष्कळ मत होय. समाजाच्या जिव्हाळयाच्या बाबतींत पोरकट आणि उथळ युक्तिवाद लढविण्याची महत्त्वाकांक्षा समंजस माणसें तरी बाळगणार नाहींत. अविवाहित मातृपदाची कल्पना पुढें मांडणारांना स्वतंत्र कल्पकतेचें श्रेयहि मिळणार नाहीं. ही कल्पना गेलीं पन्नास वर्षें सुधारलेल्या पाश्चिमात्य राष्ट्रांत चर्चिली गेली असतांनाहि स्वतंत्र, संपन्न, कमावत्या स्त्रियांपैकीं फक्त एकीनेंच आणि तोहि पण एकदांच हा प्रयोग करून पहिला, इतका तो त्याज्य ठरला. ही गोष्ट अविवाहित मातृपदाची तरफदारी करणारांच्या माहितीची नसेल असें थोडेंच! शिवाजीला जिजाईनें स्फूर्ति दिली हें खरें मानलें, तरी तो शहाजीसारख्या प्रतिष्ठित सरदाराचा औरस मुलगा होता. कीं ज्याचें नातें आणि वैभव सांगून कुटुंबाच्या परंपरेला शोभेल अशा तऱ्हेचा पराक्रम गाजविण्यास शिवाजीला सांगण्यांत तिला आनंद आणि अभिमान वाटला असेल. हाच जर शहाजी तिचा क्षणिक इच्छापति असता आणि तो जर कुणा नीच कुळांतला मोतद्दार असता तर त्याच्या आईला मुलाला पराक्रमाचा उपदेश करतांनाहि कुणासारखें व्हावें आणि कुणाच्या कुटुंबाची अब्रू वाढविण्यास सांगावें ह्याचा खात्रीनें प्रश्न पडला असता. आणि शिवाजीला समजूं लाग-

तांच त्यानेंहि जिजाईचे कर्णानें कुंतीचे जसे वाभाडे काढले तसे वाभाडे काढले असते.

एकूण समाजाचें स्थैर्य, सातत्य, स्वास्थ, आरोग्य, सुसंस्कार, पराक्रम हीं सर्व लग्नसंस्थेवर या ना त्या प्रकारें अवलंबून आहेत, अतएव लग्नसंस्थेवर हल्ला करणारे हे समाजाचे मोठ्यांतले मोठे शत्रु होत. लग्नसंस्थेबद्दलच्या सामाजिक अपेक्षा अनेक प्रकारच्या असल्यामुळें त्या अपेक्षा विवाहसंस्थेकडून ज्या प्रमाणांत पुऱ्या होतात त्या प्रमाणांत तो समाज उन्क्रान्त होत असतो. लग्नसंस्थेचें असें हें व्यापक सामाजिक स्वरूप नियमांच्या शैथिल्यानें, दुराचारांच्या वावटळीनें, राजकीय जरूरीच्या कार्यक्रमानें, धार्मिक कल्पनांच्या अनुरोधानें मधून मधून मलिन होऊं लागतें आणि खुद्द लग्नसंस्थेवरहि समाजास अवनतीला नेल्याबद्दलचा आरोप लादावासा वाटतो. पण हा सर्व दोष खुद्द लग्नसंस्थेचा नसून तिच्यावर अनेक कारणांनीं येऊन पडलेल्या केरकचऱ्याचा, पालापाचोळयाचा असतो. लग्नसंस्थेला सुधारण्यासाठीं आजवर जगांत जे प्रयत्न होत आले ते तिच्यावर चढलेलीं हीं कोळिष्टकें काढून टाकण्यासाठींच झाले होते. स्त्रीपुरुषांचा एकाकी आणि अखंड संबंध हा लग्नसंस्थेचा आदर्श म्हणून सदैव राहीलच. ह्या आदर्शाला पोटाशीं धरणाऱ्या धर्मानें लग्नसंबंध हा संस्कार ठरवून त्या संस्कारामुळें तो संबंध वज्रलेप समजला गेला पाहिजे असा हट्ट धरला इतकेंच नव्हे तर, दुःखी जीवांचा कोंडमारा त्या अभेद्य लग्नबंधनाच्या धर्मतत्त्वानें अनेक शतकें केला. सामाजिक स्वास्थ आणि व्यक्तींचें सौख्य ह्यांच्या जबरदस्त मागणीपुढें धर्माला नमतेंहि घ्यावें लागलें. प्रॉटेस्टंट पंथानें घटस्फोटाला मोकळीक देऊन तीनचतुर्थांश जगापुरता तरी प्रश्न केव्हांच सोडविला आणि बाकी राहिलेल्या जगांतहि तो प्रश्न कमीअधिक प्रमाणांत सोडविण्यांत आला आहे. समाजांतील नीतिमत्तेचें रक्षण होण्यासाठीं, समाजास स्वास्थ्य आणण्यासाठीं, दरेक स्त्रीपुरुषाचें लग्न झालेंच पाहिजे असें तत्त्व प्रतिपादण्यांत येऊं लागलें. त्या तत्त्वाच्या परिपालनाचा अतिरेक बालविवाहांत झाला, पण समाजाचें आरोग्यच बिघडूं लागल्याबरोबर विवाहोत्सुकांच्या वयोमर्यादेला बांध घालावा लागला. अनुकूल स्त्रीपुरुषांचीं लग्नें व्हावींत, त्यांच्या पसंतीनें व्हावींत, या तत्त्वाचा पुरस्कार

होत असतांनाच सांस्कृतिक परंपरेची जोपासना तितक्याच नेकीनें झाली पाहिजे, याहि तत्त्वबोधाची उठावणी जोरानें होऊन वधूवरांची निवड एका जातींतूनच होऊं लागली असावी. संस्काराची परंपरा ही समान दर्जाच्या आणि एकजातीच्या कुटुंबांतून आजहि जितकी तंतोतंत मिळती सांपडते तितकी विजातीय कुटुंबांत सांपडत नाहीं. जो प्रश्न सांस्कृतिक परंपरेचा तोच पराक्रमाचा अनुवंशतेच्या. स्वतःच्या कुटुंबाचा अगर जातीचा पराक्रम कायम ठेवण्यासाठीं विशिष्ट कुटुंबांतील स्त्रीपुरुषांचे शरीरसंबंध घडून आले अशी इतिहास ग्वाही देतो. लग्नसंस्था निर्माण करणारांनींच तिचा आदर्श इतका उत्तुंग, इतका सोज्वल, निर्मळ रचून ठेवला आहे कीं आज हजारों वर्षें लोटून गेलीं पण त्याच्यावर अधिक मौल्यवान् व उंच कळस चढविण्याचें धैर्य कोणाहि महात्म्याला झालें नाहीं. महान् समाजसुधारक होऊन गेले, त्यांनीं आपापल्या परीनें त्या आदर्शाच्या शिखरावर जमलेली धूळ घालविण्यासाठीं, आपल्या देहकार्याची कुर्बान केली.

सामाजिक दृष्टीनें आजच्या आपल्या हिंदु लोकांच्या लग्नसंस्थेकडे पाहिलें म्हणजे तिच्यांत पुष्कळच वैगुण्यें दिसून येतील. जातिभेदांनीं सांस्कृतिक परंपरेचीं डबकीं त्या त्या जातींच्या स्वाधीन केलीं खरी, पण त्यामुळें कित्येक जातींची वा जातींतील मंडळींची वाढ अजिबात खुंटली तर दुसऱ्या जातींतील लोकांची सांस्कृतिक वाढ होण्यासच जागा नसल्यानें त्यांची कुचंबणा झाली. आज सर्व जाती सारख्याच विचारक्रांतींतून, आचारधर्मांतून वावरत आहेत. पूर्वीचा जातीय उच्चनीच भाव झपाट्यानें नाहींसा होऊन लायकीच्या चाळणीमुळें नालायक खड्यासारखे निवडले जाऊन निराळे पडूं लागल्यानें अशा नालायकांचीच एक जात निर्माण करावी लागेल. तेव्हां या निरनिराळ्या जाती लायकीच्या एका चाळणींत घालून चाळण्याची आणि त्यांची लायकीप्रमाणें प्रतवार ठरवून त्यांच्या निरनिराळ्या जाती निर्माण करण्याची वेळ आली आहे. ब्राह्मणांतील निर्बुद्ध आणि क्रूर व्यक्तींना त्या जातींत राहण्याचा काय हक्क आहे असें विचारावेंसें वाटतें. व असाहि सवाल करावासा वाटतो कीं, कांहीं लोकांना त्यांना खालच्या जातींत कायमच्या डांबून ठेवण्याचा काय अधिकार असावा ! तुल्यबल आणि समानगुण व्यक्तींचीं लग्नें झालीं तर समाज पराक्रमी होणार

आहे, अशा वेळीं आंतर्जातीय विवाह जेवढे जास्त होतील आणि अशा या विवाहांच्या निमित्तानें एकाच संस्काराचीं विजातीय निवडक माणसें जेवढ्या जास्त प्रमाणांत एकत्र येतील तेवढ्या प्रमाणांत सर्व जातींची गल्लत करून त्यांतून नवीन जाति निर्माण करणें सोपें जाईल. पण अशा या विजातीय लग्नांत सांस्कृतिक परंपरा एका दर्जाची असण्याकडे कटाक्ष ठेवावा. फक्त दोघें नवरा-बायको शिकलेलीं असलीं अगर सुसंस्कृत असलीं तरी त्यांच्या संततीच्या ठिकाणीं खुद्द आईबापांचे गुण उतरतील त्याच्या कितीतरी पटीनें त्या उभतांच्या कुटुंबपरंपरेचे गुणावगुण उतरतील. संस्कृतीची बाब संस्कारांवर अवलंबून असते आणि संस्कार नैतिक ध्येयावर ठरविलेले असतात. म्हणून विजातीयांचीं लग्नें झालीं तरी विधर्मीयांचीं तरी होऊं नयेत, कारण अशा विधर्मीय लग्नांत वधूवरांची सांस्कृतिक परंपरा त्यांच्या अपत्यांच्या ठिकाणीं विकृत मनोवृत्ति अगर अनुचित प्रवृत्ति निर्माण केल्याशिवाय राहणार नाहींत.

दुर्दैवी विवाहितांना घटस्फोट मिळविण्याचा हक्क नसणें ही एक सामाजिक आपत्ति होय. व्यक्ति आणि समाज ह्यांचें हिताहित कायमचें निगडित झालेलें असतें. वाटेल तशीं पतिपत्नी असलीं, वाटेल तीं कारणें असलीं तरी त्यांची जन्मगांठ तोडतां येत नाहीं ह्या धार्मिक संस्काराच्या आधारानें रूढ झालेला खुळचट प्रकार व्यक्तीचें जितकें अपरिमित नुकसान करतो तितकेंच अपरिमित नुकसान समाजाचें करतो. लग्नसंस्थेभोंवतीं जें प्रामाणिक आणि आनंदी वातावरण खेळत राहिलें पाहिजे, जें एक सुखाशेचें वलय तिच्याभोंवतीं पसरलेलें असलें पाहिजे, आणि समाधानी संसाराचें सोज्वळ जें तेज पसरलेलें असलें पाहिजे, त्या सर्वांवर घटस्फोटाच्या अभावानें पोतेरें फिरतें म्हणानात ! नपुंसकाला लग्न करण्याचा अधिकार असावा आणि त्याच्याशीं झालेलें लग्न अभेद्य गणलें जावें हा केवढा सामाजिक अन्याय ! वंशवृद्धि, सुखोत्पत्ति, सातत्य आणि संस्कारपरंपरेची अभिवृद्धि, ह्यांतील एक तरी सामाजिक अपेक्षा यांत सफल होत आहे का ! त्याच्याच खालोखाल महत्त्वाची बाबत विधवांच्या पुनर्विवाहाबद्दलची होय. विधवाविवाहाला कायद्यानें मुभा दिली असली तरी समाजानें ती सुधारणा केवळ अवहेलनेनें ठार केलेली दिसते. कर्तबगार

विधवांची बुद्धिमत्ता, संस्कारक्षमता, मातृपदाची योग्यता, या सर्व गुणांचें बीज न होतां मातेरें होतें. असंतुष्ट विवाहित आणि उपाशी कोंडून ठेवलेल्या विधवा हीं सामाजिक संकटें होत. नैसर्गिक गरजा लग्नाच्या मार्गानें राजरोस ज्यांना भागविण्याची मोकळीक नसते त्या व्यक्ति दुःखीकष्टी राहून स्वतःची आणि पर्यायानें समाजाची आत्महत्या करीत असतात. वंशाविस्ताराच्या निसर्गयुक्त कार्यापासून आलिप्त राहणाऱ्या ह्या व्यक्ति वंशवृद्धीचा उच्छेद केल्याबद्दल जबाबदारच राहतील. नाहीं तर अनेक क्षुधांनीं बेफाम झालेलीं हीं माणसें घरोघरीं संसारी स्त्रीपुरुषांनीं मांडलेल्या सुग्रास अन्नावर झडप घालून अनेक व्यक्तींना दुःखांत आणि काळजींत लोटतात. हीच काळजी अतिप्रौढ विवाहाबद्दलहि वाटूं लागावी अशी परिस्थिति निर्माण झाली आहे. प्रौढविवाहोत्सुक समाज अविवाहित राहणाऱ्या कार्यक्रमाच्या पायऱ्या एकसारख्या झपाट्यानें ओलांडत आहे. पांढरपेशा समाज पुढेंमागें अविवाहित राहण्याच्या कार्यक्रमानें नामशेष होईल कीं काय असेंहि वाटतें. समाजांत आजन्म अविवाहित राहणारे लोक हे वाढत्या संख्येनें निर्माण होत राहावेत हें समाजनीतीला आणि सामाजिक स्वास्थ्याला धोक्याचें होय. अविवाहित लोक हे आपापल्यापरी सुखी संसारी स्त्रीपुरुषांचे शत्रुच होत. सामाजिक नीतिमत्ता ही क्षुधाशमनाचे राजमार्ग घालून देण्यानें व समाजांतील बहुतेक व्यक्तींना त्या मार्गानें हाकीत नेण्यानें अबाधित राहत असते. सामाजिक दृष्टीनें विचार करता आपण एखाद-दुसऱ्या अपवादात्मक मनाचा विचार करीत नसतों पण चांगलें वाईट अशा सर्व मनांचें मिळून एक साधारण मानवी मन म्हणून जें आपल्याला कल्पना करतां येईल त्या मनाला काय रुचेल, काय पचेल ह्याचाच विचार करीत असतों. मानवी मन हें प्रवृत्तिपर आहे. नैसर्गिक क्षुधा शमविण्यासाठीं तें हपापलेलें आहे. ह्या क्षुधा सरळ मार्गानें न भागल्या तर वाममार्गानेंहि त्या क्षुधा शमविणारे लोक निघणारच. ह्या क्षुधांच्या तृप्ती-अतृप्तीवर समाजाचें सौख्य आणि सुसंघटित रचना अवलंबून आहे. हा मुद्दा कोणत्याहि प्रश्नाचा विचार करतांना दृष्टीआड करून चालावयाचें नाहीं. संततिनियमनाच्या साधनांची वाढती लोकप्रियता, अविवाहित आणि विधवा ह्यांच्यांत त्यांचा होणारा मनस्वी खप, ह्यांकडे दृष्टि टाकली म्हणजे

आमची नीतिमत्ता कशी घरंगळत जात आहे ह्याची कल्पना येईल. क्षेत्राची मालकी पुरुषाकडे असल्यानें त्यांत अनपेक्षित येऊन पडलेलें बीज रुजलें तर तें वाढवावें लागतें, त्यानें पेरलेल्या रोपांबरोबर तें वाढूं लागतें, सर्व प्रकारच्या अनुकूलतेंत वांटणी मागूं लागतें, म्हणून विवाहित स्त्री-पुरुषांचा स्वैराचार हा दूषणीय समजला गेला असेल. आज संततीच्या पैदाशीचें नियमन करतां येऊं लागलें, औरस मुलांच्याबरोबर भाग मागणारीं अनौरस मुलें उत्पन्न होण्याची भीति नाहींशी होण्यासारखीं साधनें आपल्या हस्तगत झालीं, तेव्हां व्यभिचाराची व्याख्या बदलली पाहिजे असाहि एक बुद्धिवाद करतां येण्यासारखा आहे. तो युक्तिवाद सर्व समाजाला पटवून सामाजिक नीतीचीं मूल्यें तशा प्रकारचीं ठरण्यास किती तरी शतकांचा काल जावा लागेल. आजचा समाज घेतला तर संततिनियमनाची लोकप्रियता अविवाहितांना आणि विधवांना लग्नसंस्थेच्या मंदिरापासून मागें फिरवीत आहे. त्यांच्या हातीं निर्धास्त सुख मिळविण्याचीं साधनें असतांना संसारसुख पदरांत पाडून घेण्यासाठीं लग्नसंस्थेच्या मंदिरांत जाण्याचें कारणच उरलें नाहीं. या संततिनियमनाच्या साधनांचा विवाहित स्त्रीपुरुष मुलांबाळांचा विस्तार स्वतःच्या आर्थिक स्थितीच्या आटोक्यांत आणण्याच्या लोभानें बराच दुरुपयोग करीत आहेत तर कंगाल आणि विकृतिग्रस्त असे तळच्या थरांतील लोक त्या साधनांवर बहिष्कार घालून बेगुमानपणानें स्वतःच्या वैगुण्यांची, विकृतींची, रोगांची, असंस्कारांची व दारिद्र्याची परंपरा चालविण्यासाठीं बेसुमार प्रजोत्पादन करीत आहेत ! नालायकांचें खच्चीकरण केलें पाहिजे अशी हांकाटी सर्व जगांत माजून राहिली आहे. जग वाढत्या लोकसंख्येनें जितकें मेटाकुटीस आलें नसेल तितकें या किडक्या संततीच्या अगणित संख्येनें रंजीस आलें आहे. हिंदुस्थानांत नालायकांचेंच काय पण कंगालांचेंहि खच्चीकरण करणें जरूर होऊन बसलें आहे. संततीचें पालनपोषण आणि ती कामधंदा करूं लागेपर्यंत रक्षण करण्याची परिस्थिति अगर साधन नसतांना बेसुमार प्रजोत्पत्ति करून समाजांत कंगालांची संख्या वाढवावयाची आणि सुखवस्तू लोकांच्या गळ्यांत आपली किडकी प्रजा पोसण्याचें कार्य अडकवून द्यावयाचें असा आजचा जो अगदीं खालच्या वर्गांतील लोकांचा कार्यक्रम

अव्याहत चालला आहे त्याला सामाजिक दृष्ट्या कांहीं तरी आळा घातला पाहिजे. नाहीं तर पुढें मागें आपलें राष्ट्र बुद्धिमान्, पराक्रमी, तेजस्वी अशा लोकांचें न राहतां किडलेल्या कंगाल प्रजेनें गजबजलेलें दिसेल. जोंवर प्रजा ही राष्ट्राची संपत्ति आहे, आणि ती वाढविणें, रक्षण करणें, तिचें पालनपोषण करणें हें सरकारचें आद्य कर्तव्य आहे असें राज्यतंत्र निर्माण झालें नाहीं, तोंवर प्रजोत्पादनाच्या मर्यादा सर्व समाजानें व व्यक्तींनीं ठरवावयाच्या आहेत.

विवाहसंस्थेपासून वैयक्तिक आकांक्षाहि अनेक प्रकारच्या असतात. व्यक्तीची कोणतीहि आकांक्षा आणि सामाजिक जरूरी ह्यांची होतां होईतों झुंज लावूं नये अशाच प्रकारचे नीतीचे अगर कायद्याचे नियम घडविलेले असतात. स्त्रीपुरुषांचे संबंध घेतले तरी त्यांतील एकानें दुसऱ्यास जर्जर करूं नये अगर दोघांनीं मिळून सामाजिक नीतिमत्ता बिघडवूं नये, ह्या-साठीं कायदा हातांत शिक्षेचा दंडा घेऊन उभा असतोच. पण कायद्याच्या कचाट्यांत सर्वच सामाजिक उल्लंघनांचा समावेश होत नाहीं. अशा वेळीं वैयक्तिक आकांक्षा कोणत्या बाळगाव्यात, आणि त्यांतील कोणत्या टाका-व्यात आणि ठेवाव्यात ह्याचा विचार होणें जरूर असतें. लग्न म्हटलें म्हणजे तरी काय! व्यक्तीच्या जरूरी आणि सामाजिक अपेक्षा ह्यांचा मेळ घालून स्त्रीपुरुषसंबंधांचें नियंत्रण करण्याची योजना अशी अगदीं थोडक्यात त्याची व्याख्या करतां येईल. व्यक्तिमात्रानें आपल्या आकांक्षा आणि त्या पुऱ्या पाडण्यासाठीं योजावयाचे कार्यक्रम अशा रीतीनें योजावेत, कीं त्यांचा सामाजिक अपेक्षांशीं विरोध उत्पन्न होऊं नये. समाजाची सांस्कृतिक परंपरा कायम राखण्याची जरूरी जास्त का स्वतःच्या आवडीनिवडीची किंमत जास्त, असा प्रश्न सौंदर्योपासक विवा-हेच्छु विचारतील. परंतु त्याचें उत्तर ज्याच्या त्याच्या समंजसपणानें ज्यानें त्यानें द्यावयाचें आहे. परंपरेचें सातत्य आणि सौंदर्याबद्दलची उपा-सना हीं दोन्ही साधतां आलीं तर बरीं आणि ज्याला त्यांतील एकाच तत्त्वाचा जास्त मोह पडतो त्यानें त्याप्रमाणें खुशाल वागावें. परंतु कांहीं कांहीं वैयक्तिक अपेक्षा अशा स्वरूपाच्या असतात कीं त्या सामाजिक आरोग्याच्या विरुद्ध जाणाऱ्या असतात. उदाहरणार्थ बहीणभावांचीं राजरोस

लग्नें लावणें ह्या गोष्टी सामाजिक आरोग्याच्या दृष्टीनें घातुक असून त्या कायद्यानें निषिद्ध मानल्या आहेत. अशा वेळीं ज्याप्रमाणें वैयक्तिक आकांक्षेला सामाजिक जरूरीपुढें मान वांकवावी लागते, तशाच प्रकारें इतरहि बाबतींत व्यक्तीनें आपल्या अपेक्षांना मागें घेतलें पाहिजे. लग्नापासूनची अपेक्षा ही अत्यंत उदात्त आणि सोज्वळ अशा प्रकारची असून व्यक्तिमात्रांनींहि तितक्याच एकनिष्ठ गांभीर्यानें त्या अपेक्षांकडे आदराच्या दृष्टीनें पाहिलें पाहिजे. आपला जोडीदार निवडण्यांत माणूस आपल्या भविष्यकालाचा बरावाईट चित्रपट आगाऊ रंगवीत असतो. लग्नापासूनचे होणारे परिणाम हे त्याला ह्या जन्मींच भोंवतात इतकेंच नव्हे तर त्याच्या वंशाला पिढ्यानुपिढ्या भोंवतात. हें लक्षांत घेऊन वधूवरांची जेवढी काळजी घ्यावी आणि कसोशी करावी तेवढी थोडीच. लग्नसंस्थेचा उद्देश आणि उत्कर्षाचा आदेश दोन्ही लक्षांत घेतां स्त्रीपुरुषांची परस्परनिवड ही शेवटीं ज्यांचीत्यांनींच केली पाहिजे असा निष्कर्ष निघतो. प्रीतिविवाह आज रूढ नसला म्हणून काय झालें ! पण प्रीतिविवाह हीच एक पद्धत संस्कारी लोकांचीं लग्नें ठरविण्याची होऊन बसेल ह्यांत शंका नाहीं. निदान लग्नसंस्थेचा आदर्श तरी प्रौढ प्रीतिविवाहाकडे नाइलाजानें आज झुकत आहे. प्रीतिविवाहांतहि बऱ्याच खबरदाऱ्या घ्याव्या लागतात. त्यांपैकीं अनुरूप तरुणतरुणी एकत्र आणण्याची जबाबदारी वडील मंडळींच्यावर असली तरी परस्परांचीं ध्येयें आणि मनें तंतोतंत जमतील कीं नाहीं हें अजमावून पाहण्याची जबाबदारी विवाहोत्सुकांच्यावरच पडते. लग्न झाल्यानंतरहि प्रपंचाच्या गरजा समजून उभयतांनीं एकजीव होऊन जीवनकलह लढविण्याची जरूरी स्वतःच्या मनांत बिंबविली तर त्यांच्या मतांची, आवडीनिवडींची आणि मनाची एकरूपता होण्यास वेळ लागणार नाहीं. व्यक्तिमात्राचा एकंदर आयुष्यक्रम घेतला तर लग्न हीच कांहीं त्याची इतिकर्तव्यता अगर परिसीमा नसून तें एक फक्त साधन आहे. व्यक्तीचा विकास होण्याचें लग्न हें एक साधन आहे. व्यक्तिविकासाच्या अढळ ध्रुवताऱ्यावर लक्ष ठेवून जीं सुज्ञ जोडपीं ऐहिक जीवनपथ आक्रमितील त्यांना एकमेकांचा आधार अमोघ वाटत राहील. लग्नाच्या बाबतींत वैयक्तिक अपेक्षांचा हिरमोड होतांच स्वतःचें बलिदान

करणारे अगर आपल्या व्यक्तिविकासाची हेळसांड करून स्वतःला धुळीस मिळविणारे हळवे माथेफिरूहि कांहीं कमी नसतात. जगांत व्यक्तिप्रकटीकरण प्रत्येकानें साधलें पाहिजे असें निसर्गहि आपल्या पर्यायानें दरेकास फर्मावीत असतो. मग धर्म अगर नीतीशास्त्र अगर पुराण अगर आदिभौतिक शास्त्र ह्यांनीं ह्या व्यक्तिविकासाबद्दल काढलेल्या फर्मानाकडे जाण्याचें कारणच नाहीं. हा व्यक्तिविकास लग्न न करतांहि साधतां येतो. फार झालें तर तो गृहस्थाश्रमाच्या अनुभवावांचून एकांगी असेल, वंशवृद्धीच्या लाभाच्या दृष्टीनें अपुरा असेल. तेव्हां हा व्यक्तिविकास साधणें हें अंतिम ध्येय दरेकानें पुढें ठेवावें. लग्नाच्या सर्वच बाबती सर्वांच्याच मनाजोगत्या घडून येत नाहींत, चालू राहत नाहींत. पण त्या क्षुल्लक निराशेतच गुरफटून घेऊन स्वतःच्या चारित्र्याची धूळधाण करणें हा मोठा सामाजिक गुन्हा आहे.

समाजरचनेंत लग्नसंस्था हें एक मध्यवर्ती सुवर्णमंदिर आहे. ह्या सुवर्णमंदिरांत तरुण मंडळी खेळण्यासाठीं येतील, प्रौढ स्त्रीपुरुष त्याच्या थंडगार गाभाऱ्यांत विश्राति घेण्याकरतां येऊन बसतील आणि वृद्ध माणसें त्यांच्याभोंवतीं प्रदक्षिणा घालतील. त्या मंदिराच्या उज्वल शिखराकडे पाहून तरुणांना आपलीं मनोराज्यें मूर्तस्वरूपांत प्रत्यक्ष दिसत आहेतशीं वाटतील, प्रौढांना मुलांबाळांच्या संसाराचें पालनपोषण एकमेकांच्या आधारानें करण्याच्या गोष्टी आठवतील, तर वृद्धांना तरुणांच्या आणि प्रौढाच्याकडे पाहून निरनिराळे सुखद अनुभव आठवतील. आणि या सुवर्णमंदिरात आल्यानें आजवरच्या आयुष्यांत आपणांला सौख्य आणि समाधान लाभलें तसेंच तें सर्व इतस्ततः क्रीडा करणाऱ्या नवपरिणितांना लाभो असा आशीर्वाद देत वृद्ध माणसें सुवर्णमंदिराच्या प्रदक्षिणा करीत असतात. नवीन गांव वसलें म्हणजे जो तो स्वतःच्या मालकीचें घर बांधतो, पण सर्वांच्या मालकीचें असें मंदिर त्या वस्तींत मध्यभागीं बांधणारा कोणी तरी परोपकारी निघतोच. समाजांतील आपमतलबी व्यक्तींनीं आपल्या कुटुंबापुरत्या, जातीपुरत्या, गटापुरत्या, मानववंशापुरत्या कोंदट आणि मजबूत अशा निरनिराळ्या संघटनेच्या योजना निर्माण केल्या आहेत; पण त्या सर्व योजनांपेक्षांहि कल्पनेनें आणि उंचीनें खुद्द ताऱ्यांना जाऊन

भिडणारें ह्या सुवर्णमंदिराचें शिखर सर्वांना आपला संदेश पोंचवीत आहे; या सुवर्णमंदिरामुळेंच सर्व समाज सुखांत आहे असें बजावीत आहे. मंदिर नको असें म्हणणारे लोक मनापासून नास्तिक नसतात. नास्तिकाला मंदिर असलें काय अगर नसलें काय दोन्ही गोष्टी सारख्याच ! पण जे त्या मंदिराकडे पाहून दिपतात, स्वतःच्या आचरणाबद्दल भेदरतात, त्यांनाच तें मंदिर पाडून टाकावें अशी ईर्षा वाटूं लागते. पण समाजाला स्वतःच्या स्वास्थ्याची, सातत्याची, आरोग्याची, सांकृतिक परंपरेची आणि उत्कर्षांच्या वाढत्या परिसीमेची जोंवर चाड आहे, जोंवर वाढ आहे, तोंवर स्थानमाहात्म्यानें समाजाच्या मध्यभागीं आणि मार्गदर्शकत्वाच्या दृष्टीनें अग्रभागीं शोभणारें हें लग्नसंस्थेचें सुवर्णमंदिर तळपत राहणार यांत शंका नाहीं.